# विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक मंडळ

# मार्कंडादेव चर्चासत्र-२००६



**दिनांक** : २४ व २५ नोव्हेंबर २००६

**स्थान** : मार्कंडादेव, ता. चामोर्शी, जिल्हा-गडचिरोली (विदर्भ)

Scanned by CamScanner

# विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक मंडळ

# चर्चासत्र : २००६

स्थान

मार्कंडादेव,

ता. चामोर्शी, जिल्हा-गडचिरोली विदर्भ

संपादक

प्रा. रमेश हिंमते

सी.पी.ॲन्ड बेरार महाविद्यालय

नागपूर

सहसंपादक

प्रा. दत्तात्रय सोनेगांवकर

व्ही.एम.व्ही. कॉलेज

नागपूर

Scanned by CamScanner



# स्वागताध्यक्षांचे मनोगत

दक्षिणेची काशी समजल्या जात असलेल्या पवित्र उत्तरवाहिनी वैनगंगेच्या तीरावर तसेच महामूनी मार्कंडेश्वराच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या 'मार्कंडादेव' येथे कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षकांचे 'चर्चासत्र' आयोजित व्हावे ही बाबच आमचेसाठी आनंदाची आहे. 'मार्कंडादेव चर्चासत्र २००६' आलेल्या सर्व प्राध्यापकांचे मी स्वागत करतो.

गडचिरोली जिल्हा नैसर्गिक साधन संपत्तीने नटलेला असतांना, वैनगंगा-गोदावरी-प्राणहिता सारख्या बारमाही प्रचंड पाणी वाहणाऱ्या नद्या असतांना या क्षेत्राचा आर्थिक विकास कां झाला नाही? हे एक कोडेच आहे. शैक्षणिक दुर्लक्ष म्हणा किंवा मूलभूत ज्ञानाचा अभाव म्हणा ही त्यामागील गारणे असावीत ? ग्रामीण क्षेत्रातील विद्यार्थ्यांना जो पर्यंत नैसर्गिक साधनसंपत्तीच्या उपयोगा संबंधी परिपूर्ण ज्ञान मिळणार नाही तो पर्यंत त्यांच्या जिवनात तो आर्थिकदृष्ट्या सक्षम होवू शकणार नाही. सोबतच वाणिज्याची जोड असणे ही भावी काळाची आत्यंतीक गरज असल्याने 'अर्थ-वाणिज्य' विषयाचे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना युवकांना ज्ञान असणे अनिवार्य झाले आहे. या दृष्टिने आपण आयोजित केलेले 'मार्कंडादेव चर्चासत्र' फलदायी ठरो अशी अपेक्षा करीत पुन्हा एकदा आपले मन:पूर्वक स्वागत करतो.

आर्थिक क्षेत्रात समाज व देशाला सक्षम बनविण्याचे आपले कार्य सिद्धीस जावे अशी मार्कंडेश्वराचे चरणी प्रार्थना करतो.

**दिगंबरराव पालारपवार**

Scanned by CamScanner



# जिल्हाध्यक्षाचे मनोगत

महाराष्ट्राच्या टोकावर असलेल्या ग्रामीण व आदिवासी बहुल परंतू नैसर्गिक संपतीने नटलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील 'मार्कंडादेव' सारख्या ऐतिहासीक, अध्यात्मिक व पर्यटन स्थळी विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक मंडळ द्वारा 'चर्चासत्र २००६' चे आयोजन होत आहे याचा मलाअभिमान वाटतो.

जागतिकीकरणाच्या व स्पर्धेच्या काळात भविष्यातील आव्हाने स्विकारू शकणारा समाज निर्माण करण्याच्या प्रक्रियेत 'मार्कंडादेव-चर्चासत्र २००६' द्वारे ठोस कार्य पार पडावेत ही अपेक्षा आहे. ज्ञानाचा विस्फोट होत असतांना माहिती व तंत्रज्ञाना सोबतच अर्थ व वाणिज्य क्षेत्रात पाय रोवून उभे राहणे आवश्यक आहे.

भावी समाज निर्माण करू पाहणाऱ्या आजच्या विद्यार्थ्याला किंबहून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अर्थ-वाणिज्याची केवळ ओळखच नव्हे तर परिपूर्ण ज्ञान असणे ही काळाची गरज आहे. या क्षेत्रात आपला विद्यार्थी परिपक्व कसा होवू शकेल ? ग्रामीण भागातील उपलब्ध साधन-संपत्तीचा पूर्ण उपयोग करून आर्थिक क्षेत्रात स्वत:चे अढळ स्थान निर्माण कसा करेल ? स्वत:, समाज, गावासोबतच देशाला आर्थिक क्षेत्रात सधन व सामर्थ्यशाली कसा बनवेल ? या संबंधीचे विचार मंथन 'मार्कंडादेव चर्चा सत्र -२००६' मध्ये होवून ग्रामीणक्षेत्राच्या आर्थिक विकासासाठी नव्या अर्थव्यवस्थेची मूहुर्तमेढ रोवल्या जाईल यात शंका नाही.

प्रा. रत्नाकर बोमिडवार

Scanned by CamScanner



# जिल्हा सचिवाचे मनोगत

विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य, शिक्षण मंडळाची इ.स. २००० मध्ये स्थापना करून नागपुरचे सन्माननिय मंडळी, प्रा. राजाभाऊ दुरुगकर, चंद्रशेखर पाध्ये, डॉ. हसनअली हुद्दा, प्रा. दत्तात्रय सोनेगावकर, डॉ. अरुण सोनेगावकर, प्रा. रमेश हिमते आणि इतर सन्माननिय मंडळींनी या अर्थ-वाणिज्य शिक्षक मंडळांची मुहुर्तमेढ रोवली व या मंडळाचे कार्य आजतागायत यशस्वीपणे सुरू आहे. त्याचीच फलश्रृती म्हणजे गडचिरोली जिल्ह्यात, चामोर्शी तालुक्यातील मार्कंडादेव या पावनभुमीत विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक मंडळ द्वारा संपन्न होत असलेले अर्थ- वाणिज्य शिक्षकांचे हे चतुर्थ चर्चासत्र. हे चर्चासत्र म्हणजे आपल्या संपूर्ण जिल्हावासियांसाठी आत्यंतिक आनंदाची व अभिमानाची गोष्ट होय.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे देशाच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व राजकिय क्षेत्रात झपाट्याने आमुलाग्र परिवर्तन घडून येत आहे. आपल्या भारत देशाने संगणक व माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती करुन जगातील इतर विकसित राष्ट्रांचे लक्ष वेधून घेतले आहे. ही बाब आपल्या सर्वांसाठी निश्चितच गौरवाची व अभिमानाची आहे. परतू ज्याला आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेचा मूळ कणा समजला जातो, तो शेतकरी मात्र अख्या विदर्भात आत्महत्येस प्रवृत्त होत आहे. ही बाब आपल्या सर्वांसाठी अत्यंत गंभीर व अंतर्मूख होण्यास भाग पाडणारी आहे. त्यामुळे जागतिकीकरणाची ही प्रक्रिया भारताला कितपत झेपेल ? हा महत्वाचा मुद्दा आहे.

विदेशीकरणाच्या या युगात सहकारी क्षेत्रासमोर निर्माण झालेली आव्हाने, नैसर्गिक साधनसामुग्रीने नटलेल्या, परंतु अत्यंत मागास, आदिवासी अशा गडचिरोली जिल्ह्याचे आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत काय स्थान आहे ? आणि या बदलत्या शहरी वैभवशाली व्यवस्थेत सर्व सामान्य माणुस कुठे आहे ? या सारखे अनेक प्रश्न आपल्यासमोर आहेत.

या चर्चासत्राच्या अनुषंगाने अनेक महत्वाच्या मुलगामी विषयावर मार्गदर्शन होणार आहे. एकविसाव्या शतकात निर्माण होणारी आर्थिक आव्हाने पेलण्यास सक्षम असा विद्यार्थी वर्ग निर्माण करण्याच्या हेतूने, शिक्षकांनी सुद्धा सखोल असे अध्ययावत ज्ञान प्राप्त करुन, आपल्या अध्यापन कार्यात, व कौशल्यात सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. तसेच सर्व स्तरावरील बदलत्या व्यवस्थेचे वेध घेऊन, त्या दृष्टीने अभ्यासक्रमात कोणता व कसा बदल करावा लागेल, याबद्दलची यथायोग्य विस्तृतपणे चर्चा होण्याची गरज आहे. ईत्यादी विविध हेतू, दृष्टिसमोर ठेवून मार्कंडादेव (चामोर्शी) या ठिकाणी संपन्न होत असलेले हे दोन दिवसीय अर्थवाणिज्य विषयाचे चर्चासत्र अत्यंत महत्वाचे आहे.

आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करुन, अर्थ-वाणिज्य विषयातील नवीन प्रवाह विद्यार्थ्यांमध्ये पोहचविण्याची आणि त्यांना कृतिशील शिक्षण देण्याची अत्यंत महत्वाची जबाबदारी आपल्या सर्व शिक्षक वर्गाची आहे. ही जाण आपल्या सर्व शिक्षकांना सदैव ठेवायची आहे.

या सर्व दृष्टिने मार्कंडादेव (चामोर्शी) येथे संपन्न होत असलेल्या, अर्थ-वाणिज्य विषयाच्या बहुआयामी चर्चासत्रातील विचारमंथन, हे केवळ अर्थ-वाणिज्य विषय शिक्षकांनाच नव्हे, तर इतरही विषयांच्या शिक्षकांनाही निश्चितच प्रेरणादायी व फलदायी ठरेल, यात यत्किंचितही शंका नाही.

धन्यवाद !


प्रा. दिलीप टेप्पलवार
इंदिरा गांधी क. महाविद्यालय येणापूर
तह. चामोर्शी, जि. गडचिरोली


Scanned by CamScanner

### ❋ निवास व्यवस्था समिती ❋

प्रा. टी. आर. जल्लेवार

(प्रमुख)

प्रा. डी. एस. जगनाळे

प्रा. अरूण खरवडे

प्रा. गिरीश तुमपल्लीवार

प्रा. धनराज मेश्राम

प्रा. एम.एम. मेनेवार

प्रा. रविन्द्र इंगोले

प्रा. संजय खाडे

डॉ. बी.बी. काळपांडे

### ❋ प्रसिद्धी विभाग ❋

प्रा. रत्नाकर बोमिडवार

(प्रमुख)

प्रा. राजाभाऊ दुरगकर

प्रा. जयंत जांभुळकर

प्रा. अशोक गव्हाणकर

प्रा. विजय बालपांडे

### ❋ सदस्य नोंदणी समिती ❋

प्रा. राजाभाऊ दुरगकर

(प्रमुख)

प्रा. सुमित्रा मरस्कोल्हे

प्रा. बोमनवार

श्री. विजय कोमेरवार

प्रा. रमेश बारसागडे

प्रा. अरूण खरवडे

प्रा. तेजिंदरकौर वेणूगोपाल

### ❋ मंच व बैठक व्यवस्था ❋

प्रा. अशोक लांजेवार

(प्रमुख)

प्रा. यु.जी. म्हशायेत्री

प्रा. रजनी तोंडचिरकर

श्री.प्रवीण ब्राम्हणवाडे

डॉ माधुरी लेले

### ❋ सांस्कृतिक कार्यक्रम ❋

प्रा. जी.पी. गोंगले

(प्रमुख)

श्री. मारोतराव इचोडकर

प्रा. रमेश बारसागडे

श्री विजय कोमेरवार

प्रा. रजनी तोंडचिरकर

### ❋ कार्यक्रम संचालन समिति ❋

प्रा. डी. एच. टेप्पलवार

(प्रमुख)

प्रा. रत्नाकर बोमिलवार

कु. आर. पी. म्हशायेत्री

डॉ. माधुरी लेले

प्रा. रजनी तोंडचिरकर

### ❋ स्वयंसेवक समिती ❋

श्री. घनश्याम मनबत्तुलवार, श्री अनिल आक्केवार, श्री दिपक सोमणकर, प्रा. के डब्ल्यू कापगते

# संपादकीय

सस्नेह नमस्कार,

विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षकमंडळ आपले ४ थे द्विवार्षिक चर्चासत्र, मार्कंडादेव चर्चासत्र-२००६ या नावाने मार्कंडादेव, ता. चामोर्शी, जिल्हा गडचिरोली येथे दिनांक २४ व २५ नोव्हेंबर २००६ रोजी आयोजित करीत आहे. यानिमित्ताने अर्थशास्त्र व वाणिज्य विषयाचे प्राध्यापक, अभ्यासक एकत्र येतात व अर्थव्यवस्थेशी निगडित विषयांवर चर्चा करतात. या माध्यमातून विचारांची देवाण-घेवाण होते. नवीन विषयांवरील अभ्यासपूर्ण माहिती कळते व भाग घेणारा प्राध्यापक नकळत संशोधनास प्रवृत्त होतो. प्रस्तुत स्मरणिका यादृष्टिने सहाय्यभूत व्हावी असाच संपादक मंडळाने प्रयत्न केलेला आहे. निवांतपणे चर्चासत्रातील विषय अभ्यासून निबंध लेखनास ही स्मरणिका प्रेरित करणारी ठरेल असा यामुळे विश्वास वाटतो. निबंध लेखकांनी दिलेल्या मुदतीत निबंध पाठविल्यास ही स्मरणिका आणखी चांगली होऊ शकते. निसर्गरम्य परिसरात मार्कंडादेवाच्या पावन भूमीत होणारे हे चर्चासत्र आपणा सर्वांना आनंददायक व प्रेरणादायक ठरो हिच या निमित्ताने शुभेच्छा.

स्मरणिका अधिकाधिक निर्दोष व परिपूर्ण करण्याचा प्रयत्न संपादक मंडळाने केला आहे. या कार्यास आमच्या लेखक मंडळीची उत्तम साथ लाभली आहे. तरीही त्यात काही उणिवा असल्यास, आपण आम्हास उदार अंत:करणाने माफ करावे.

स्मरणिकेला पूर्णत्व लाभण्यास अनेक व्यक्ती, संस्था, जाहिरातदार, देणगीदार, लेखक, शिक्षण उपसंचालक यांची मदत झाली तसेच गडचिरोली जिल्हा संपादक मंडळचे सदस्य, कार्यकारिण अध्यक्ष प्रा. बोमीडवार यांचे तसेच मंडळाचे प्रवर्तक प्रा. राजाभाऊ दूरगकर, डॉ हसनअली हुद्दा यांचे अथक परिश्रम या कार्यास लाभले. मी त्यांचा आणि शिक्षण उपसंचालक श्री श्रीधर साळूंके यांचा संपादक मंडळाच्या वतीने आभारी आहे.

रमेश हिंमते

## स्मरणिका संपादक मंडळ

| संपादक | सहसंपादक |
| --- | --- |
| प्रा. रमेश हिंमते | प्रा. दत्तात्रय सोनेगांवकर |

**सदस्य**

- प्रा. अरूण खरवडे
- प्रा. डी.एच. टेप्पलवार
- प्रा. डी.एस. जगनाडे
- प्रा. जयंत जांभुळकर
- प्रा. प्रकाश भगत
- प्रा. रजनी तोंडचिरकर
- डॉ. माधुरी लेले
- प्रा. सुमित्रा मरस्कोल्हे
- प्रा. विजय मसराम
- प्रा. चंद्रकांत जुळे

Scanned by CamScanner

# "भारताच्या क्षेत्रीय रचनेतील परिवर्तन आणि आर्थिक विकास"

## अध्यक्षीय भाषण

प्रा. राजाभाऊ दुरूगकर
नवप्रतिभा कनिष्ठ महाविद्यालय,
सक्करदरा, नागपूर.

ह्या द्वैवार्षिक चर्चासत्रात मला अध्यक्ष या नात्याने उभे राहून आपल्याशी सुसंवाद साधताना अत्यानंद होत आहे. मला ही संधी दिल्याबद्दल मी संयोजकांचा आभारी आहे. मला याचीही पूर्ण जाणिव आहे की, पूर्वीच्या अध्यक्षांनी अर्थशास्त्रीय विचार प्रणालीचा प्रवाह आपल्या अध्यक्षीय भाषणातून आपणासमोर मांडला त्याला अनुसरूनच मी आपल्यापुढे ही परंपरा कायम ठेवण्याचा प्रयत्न करणार आहे.

माझ्या भाषणात मी भारतीय अर्थ व्यवस्थेतील रचनात्मक बदलविषयी बोलणार आहे. या विषयावर बोलण्याचे यासाठी ठरवले कारण आर्थिक सुधारणांच्या सुरूवातीपासूनच म्हणजे १९९१ पासून आर्थिक विकासाच्या दरात झालेला बदल व त्यासाठी भारतीय अर्थव्यवस्थेने अनुसरलेल्या विकासाचे प्रारूप ऐतिहासिक किंवा परंपरागत विकासाच्या प्रारूपापेक्षाही वेगळे आहे ज्यामुळे भारतातील विलक्षण आर्थिक विकासाचा दर व त्यातील होणारा बदल लक्षात घेऊन त्याकरीता दीर्घकालीन प्रगतीच्या दृष्टिने योग्य व कार्यक्षम, आर्थिक व्यवस्थापकीय धोरणांची आखणी करणे आज गरजेचे वाटते.

भाषणाच्या पहिल्या टप्प्यात मी संक्षिप्तपणे आर्थिक विकास व रचनात्मक बदल यांचा संबंध कृषी उद्योग व सेवा यांच्या संदर्भात असलेले मुख्य सैद्धांतिक विश्लेषण स्पष्ट करणार आहे. दुसऱ्या टप्प्यात विकासाचे ऐतिहासिक नमुने देणार आहे, जे विकासाकरिता विकसित राष्ट्रांनी स्वीकारलेले आहेत. तद्नंतर भारतीय अर्थव्यवस्थेतील मागील अर्धशतकातील रचनात्मक बदलाचे प्रमुख स्वरूप व विशेषत: मागील वीस वर्षातील बदलांच्या संदर्भात आपले लक्ष केंद्रीत करणार आहे. जागतिकीकरणाच्या नवीन वातावरणात भारताने विकासाकरीता जे प्रारूप स्वीकारलेले आहे, तसेच थोड्याफार फरकाने आशिया खंडातील विकसनशील राष्ट्रांनी अंगीकारलेले दिसून येते व शेवटच्या भागात भारताच्या प्रगतीकरीता उपलब्ध असलेल्या विविध विश्लेषणांचा उहापोह करणार आहे. ज्यात प्रामुख्याने विकासाच्या पूर्वावस्थेतील सेवाक्षेत्र ज्याचे मूल्यांकन व परीक्षण स्पष्ट केले असेल व शेवटी काही प्रश्न जे मुख्यत: वर्तमान विकासाच्या प्रारूपातून व समष्टी अर्थशास्त्राच्या दृष्टिकोनातून आर्थिक स्थीरता, व्यापारातील संतुलन, एकूण रोजगार व वितरणाच्या संदर्भात असतील.

### सैद्धांतिक रचनात्मक बदल

आर्थिक प्रगती ही रचनात्मक बदलाशी ऐतिहासिक दृष्ट्या विचारसंगत असून राष्ट्रीय अर्थव्यवस्थेशी



Scanned by CamScanner

संबंधीत असते. प्रत्यक्षात विकासाची व्याख्या जी प्रामुख्याने राष्ट्रीय उत्पन्नातील व श्रमशक्तीमधील वि क्षेत्राचा वाटा स्पष्ट करणारी असते. हे सामान्य रचनात्मक बदल प्रामुख्याने कृषी ते उद्योग व नंतर सेवा या संदर्भात आढळतात. विकसीत व अर्धविकसीत राष्ट्रात राष्ट्रीय उत्पन्नातील कृषीक्षेत्राचा वाटा सर्वा जास्त असतो. विकासाबरोबर उद्योगक्षेत्राचा वाटा वाढतो व कृषीक्षेत्राचा वाटा कमी होतो. उद्योग व निर्माण कार्याच्या युक्ततम विकासाच्या अवस्थेला पोहचल्यावर अर्थव्यवस्थेत सेवाक्षेत्राचा वाटा हळूहळू वाढत जातो व त्यानंतर सेवाक्षेत्र महत्त्वाचे ठरते. ऐतिहासिक दृष्ट्या हे सत्य नाहीतर विविध विकासात्म देशात हीच प्रक्रिया असलेली दिसून येते. रचनात्मक बदल व क्षेत्रीय वाट्यातील बदल प्रामुख्याने राष्ट्री उत्पादन व श्रमशक्ती ह्या दोन्ही घटकातून स्पष्ट होतात.

रचनात्मक बदल हे केवळ आर्थिक विकासाचे निर्देशक नव्हे तर आर्थिक स्थिरीकरणासाठी देखील त्याची आवश्यकता भासत असते. नवपरंपरागतवाद्यांच्या दृष्टिकोनातून संयुक्त क्षेत्रे ही तुलनात्मक दृष्ट्या उत्पादनाकरीता कमी महत्वाचे होय असे स्पष्ट केले गेले, परंतु यामुळे विकासाचा प्रश्न निर्माण होतो या संदर्भात कुझनेटनी असे स्पष्ट केले की, आर्थिक विकास हा केवळ संयुक्त क्षेत्रातील बदलामुळेच घडवून आणला जातो. मागणी व पुरवठा हे त्यातील महत्त्वाचे कारण होय. वेगवेगळ्या अर्थशास्त्रज्ञांनी या संदर्भात वेगवेगळ्या घटकांवर भर दिलेला दिसून येतो. या संदर्भात फिशर व क्लार्क यांनी वेगळ्या पद्धतीने स्पष्टीकरण दिलेले आहे, मुख्यत: कृषी उत्पादनासाठी असलेली मागणीची लवचिकता ही कमी होते व उद्योगाकरिता व सेवा करिता असलेली उत्पन्न मागणीची लवचिकता ही जास्त असते. परिणामत: वाढत्या उत्पन्नाबरोबर तुलनात्मक दृष्ट्या कृषी उत्पादनाची मागणी कमी होऊन औद्योगिक उत्पन्नाची मागणी वाढते व त्यानंतर अधिक तीव्र गतीने सेवा क्षेत्राच्या मागणीत बदल होतो. राष्ट्रीय उत्पन्नातील विविध क्षेत्राचा वाटा मागणीतील बदलानुसार निश्चित होतो. पुरवठ्याच्या बाजूने कृषी ही स्थिर उत्पादनाच्या घटकावर अवलंबून असते. भूमीच्या वाढीवरील मर्यादा व भूमीमधे दिसून येणारा आऱ्हासी उत्पत्ती नियम होय. यामुळे ही मर्यादा येते. उद्योगात प्रामुख्याने निर्माण कार्याचा विचार केल्यास अमर्यादित भांडवल व तंत्रज्ञानाचा वापरकेल्या मुळे तसेच मनुष्य शक्तीच्या प्रयत्नामुळे असिमित उत्पादन निर्माण होते. श्रमाच्या पुरवठ्याला मर्यादा येत असल्याने उद्योगाच्या विस्तारावर मर्यादा येतात. परंतु श्रम बचत तंत्रज्ञानातील बदलाचा वापर करून काही काळासाठी हा प्रश्न सोडवता येऊ शकतो. सेवा क्षेत्राकरीता देखील हेच तत्त्व लागू होते.

राष्ट्रीय उत्पन्नातील सेवा क्षेत्राचा वाटा देशातील औद्योगिकरण होत असताना का वाढतो या संदर्भात कुझनेट्सनी १९६६मध्ये स्पष्ट केले की, तंत्रज्ञानातील बदल व वाढ संख्यागत व्यवस्थेत झालेला बदल हे दोन्ही अनिवार्य घटक होत. तंत्रज्ञानातील बदल विकासामुळे आर्थिकदृष्ट्या व सुलभता निर्माण होऊन बृहतप्रमाणावर उत्पादनाचे केंद्रीकरण, मोठ्या प्रमाणावर वाहतूकीच्या साधनांची गरज, वखार व संग्रहणाच्या सोयी दूरसंदेश व दूरसंचाराच्या सोयी आवश्यक ठरतात. ग्रामीण भागात प्रामुख्याने अन्नधान्याचे उत्पादन हे स्वत:साठीच निर्माण केले जाते. परंतु वाढत्या लोकसंख्येबरोबर शहरीकरणात वाढ घडून आली. यामुळे वाहतुकीच्या साधनांची गरज भासू लागली व उपभोक्त्यापर्यंत अन्नधान्य पोहचवण्याकरीता व्यापारात विस्तार व बदल झाला. नागरीक्षेत्रात आवासाच्या क्षेत्रात वाढ झाली त्यामुळे या संबंधीत

Scanned by CamScanner

बांधकामाकरिता वस्तूंची व संबंधीत आवश्यक वस्तुंच्या मागणीत वाढ घडून आली. उत्पन्न पातळीवरून वरच्या स्तरावरील झालेला बदल यामुळे केवळ शिक्षण, आरोग्य, खेळ, मनोरंजन यांच्या मागणीतच बदल झाला नाही तर नवीन तंत्रज्ञान ज्यांच्या उपयोगामुळे सर्व सेवा घरबसल्या प्राप्त करता येऊ लागल्या. उदा. मनोरंजनाकरिता केल्या गेलेल्या साधनाच्या वापरांद्वारे त्यांना लोकनृत्य, लोकगीते, यात्रा व विविध सणावारांची ओळख झाली या शिवाय रेडिओ, दूरदर्शनमुळे बातम्यांच्या माध्यमातून प्राप्त होणारी माहिती इत्यादी सेवांचा समावेश होतो.

असे असले तरी काही अर्थशास्त्रज्ञांना हे मान्य नाही. त्यांच्या मते प्राथमिकशक्तीच्या संरचनात्मक बदलातून आर्थिक विकास होतो. परंपरागत अर्थशास्त्रज्ञ क्लार्क व फिशर यांनी आपले विवेचन एंजलसच्या नियमाच्या आधारे स्पष्ट केले. त्यांच्या मते कृषीतून उद्योगाकडे स्थानांतरण होण्याचे कारण कृषीतून तयार होणाऱ्या वस्तूंची असलेली कमी लवचिक मागणी व औद्योगिक वस्तुकरीता जास्त किंवा अधिक मागणीची लवचिकता होय.

प्रत्यक्षात उद्योग व सेवाक्षेत्रातील मागणीच्या लवचिकतेतील बदलाचा प्रभाव वेगळा असलेला दिसून येतो. फिशर (१९३९-४६) यांनी उद्योगातून निर्माण होणाऱ्या वस्तुंची विपुलता व त्याची मागणी व सेवेकरीता अधिक मागणीचे कारण जास्त उत्पन्नातील लवचिकता होय असे स्पष्ट केले. हे त्यांचे विश्लेषण प्रामुख्याने परंपरागत गरजा च्या आधारावर आहे. क्लार्क यांनी मागणीतील अंतिम स्थानांतरण सेवाक्षेत्रातील मागणी वाढण्यात होतो हे मान्य केले आहे. परंतु श्रमशक्तीतील स्थानांतरण त्यांच्या अंतर्गत होते. कारण निर्माण क्षेत्रातील अधिक उत्पादकीय क्षमता व सेवेतील कमी उत्पादकता होय. कुझनेट्सनी १९७१ मध्ये प्राथमिक कारणामुळे मागणीच्या उत्पन्न लवचिकतेत व आर्थिक रचनेत बदल घडून येण्यात मदत होते. हे स्पष्ट केले. याचबरोबर तंत्रज्ञानातील व संस्थागत बदल हे देखील घटक कारणीभूत ठरतात. पुरवठ्याच्या बाजूने भर देताना कालडोर यांनी (१९६६-६७) निर्माणीचे क्षेत्र विकासाकरीता अत्यंत महत्त्वाचे होय हे स्पष्ट केले. कृषीमध्ये आऱ्हासी उत्पत्ती नियमाचा प्रभाव असल्यामुळे त्यातून उत्पादनात अधिकवाढ व मोठ्याप्रमाणावर उत्पन्नाच्या निर्मितीची पातळी शक्य होत नाही आणि म्हणून निर्माण क्षेत्रातील विकास कोणत्याही आर्थिक स्थिरीकरणासाठी व विकासासाठी महत्त्वाचे ठरते. निर्माण क्षेत्राचे आर्थिक विकासातील महत्त्व स्पष्ट करताना काल्डोर यांनी तीन नियमांचे स्पष्टीकरण केले आहे. ज्यामध्ये (१) सुदृढ व सबळ असे निर्माण क्षेत्राचे सकल राष्ट्रीय उत्पादनाशी असलेले संबंध (२) निर्माण क्षेत्रातील आदान व निर्माण क्षेत्रातील उत्पादकतेतील विकास (३) निर्माण क्षेत्रातील वृद्धीदर व अन्यक्षेत्रातील वृद्धीदर यांचा समावेश होतो. कालडोरच्या मते सेवाक्षेत्रातील विकास, औद्योगिक विकास व उत्पन्नातील वाढीमुळे प्रेरीत होतो.

उपरोक्त विश्लेषण मागणीच्या बाजूने तपासल्यास मागणीच्या उत्पन्न लवचिकतेतील भिन्नता यामागील कारण प्रामुख्याने सेवाक्षेत्रा करीता होत असलेले श्रमशक्तीचे स्थानांतरण होय हे बॉऊसेल (१९९७-२००१) यांनी स्पष्ट केले आहे. यांच्या मतानुसार रोजगारातील बदल अंतिम मागणीत बदल होण्याचे परिणाम नाही. परंतु विविध उत्पादकतेच्या विकासाचा परिणाम होय असे असले तरी सेवाक्षेत्रातील क्रिया-प्रक्रियापेक्षा सेवा क्षेत्रातील उत्पादकतेत वाढ ही मंद असलेली दिसून येते. रोजगारातील सेवाक्षेत्राची

Scanned by CamScanner

भागीदारीची वाढीची प्रवृत्ती अधिक तीव्र असलेली विकसीत राष्ट्रात आढळून येते. व्हिकटर फ्युकस (१९६८) यांनी त्यांच्या अभ्यासात अर्थव्यवस्थेत प्रभावीपणे निर्माण होत असलेल्या सेवाक्षेत्राचे यु.एस.ए. च्या संदर्भात स्पष्टीकरण देत असताना बाऊमेल यांनी सेवाक्षेत्रातील मोठ्या प्रमाणावर स्थानांतरण होण्याचे कारण म्हणजे उत्पादकतेतील भिन्नता होय हे स्पष्ट केले. या सर्व प्रक्रियेमधे मागणीच्या स्थानांतरणाची भूमिका कमी महत्वाची असते. त्यांनी स्पष्ट केले की मागणीची सेवा क्षेत्राकरीता असलेली उत्पन्न लवचिकता थोड्या प्रमाणात (१.०७) वस्तूपेक्षा (०.९३) जास्त असते व अन्ना व्यतिरिक्त वस्तुंच्या बरोबर असते. विभिन्न अर्थशास्त्रज्ञांद्वारे रचनात्मक स्थानांतरणाच्या संदर्भात विभिन्न विचाराची भिन्नता ही प्रामुख्याने मागणीच्या बाजूने व पुरवठ्याच्याबाजूने होत असली तरी यातून सत्य शोधून काढणे आवश्यक ठरते. (१९३९) मधे कुझनेटनी या संदर्भात आपले स्पष्टीकरण देत असताना असे सांगितले की, विभिन्न क्षेत्रातील घटक जे संयुक्त क्षेत्रातील आदानाची विविधता त्यातील विविध क्षेत्रातील उत्पादनासाठी असलेली मागणीची उत्पन्न लवचिकता या व्यतिरिक्त असलेले कारण म्हणजे विविध क्षेत्रातील उत्पादकतेतील विभिन्नता होय. दरडोई उत्पन्नातील वाढीमुळे मागणीच्या संरचनेत बदल होतो. परिणामत: उत्पादनसंरचनेत परिवर्तन होते. त्याचबरोबर उत्पादनातील तंत्रज्ञानाच्या पातळीत बदल होतो व उत्पादनाच्या प्रमाणातवाढ, उत्पादनाचे केंद्रीकरण व उत्पादनाकरीता संस्थागत बदलाची आवश्यकता भासते याचे महत्त्वाचे कारण म्हणजे लोकसंख्या व उत्पादनाचे स्थान होय. देशातील एकूण उपभोग्यमागणी ही त्यादेशातील उपलब्ध असलेल्या खुल्या किंवा नियंत्रित अर्थव्यवस्थेच्या स्वरूपावर अवलंबून असते. नियंत्रित अर्थव्यवस्थेत मागणीत बदल केवळ घरेलू उत्पादन संरचनेच्या व त्यांच्या उत्पादकीय शक्तीने नियंत्रित असलेले दिसून येतात. परंतु खुल्या अर्थव्यवस्थेत काही वस्तुंची मागणी ही त्या वस्तुंची आयात करून देखील पूर्ण केली जाते. त्यामुळे राष्ट्रीय उत्पादनातील संरचनेच्या तुलनात्मक व्यापाराचा लाभ प्राप्त होतो.

एखाद्या घटनेच्या संदर्भात राष्ट्रीय आदानातील ह्या संरचनात्मकते द्वारे हे अपेक्षित आहे की त्यामुळे विभिन्न क्षेत्रातील रोजगारात बदल घडून येतील. परिणामत: राष्ट्रीय उत्पादनात कृषीचा वाटा/हिस्सा कमी झाल्यास त्याचबरोबर कृषीतील रोजगाराची पातळी देखील कमी होईल हे अपेक्षित राहील. प्रथमदर्शनीच आपणास हे म्हणता येईल की, श्रमाचे कृषीतून उद्योगाकडे झालेले स्थानांतरण होय. या संदर्भात आर्थर लेवीस (१९५५) यांनी वापरलेल्या स्त्रोतानुसार भांडवल संचयन तुलनात्मक दृष्ट्या व्ययरहीत आर्थिक वृद्धी पद्धत या संदर्भात महत्वाची होय. अर्धविकसित राष्ट्रात कृषीतून केवळ जीवननिर्वाह पातळीवरील प्रक्रिया असलेल्यादिसून येतात. त्यामुळे श्रमिकांची संख्या अधिक मात्रेत दिसून येते. ज्याच्या कृषी उत्पादनात कोणताच सहभाग दिसून येत नाही. मात्र उपभोगात त्यांचा वाटा पूर्ण असतो. अशा श्रमिकांचा विकसीत उद्योगधंधाच्या विकासाकरीता वापर करून घेतल्यास त्याद्वारे निव्वळ राष्ट्रीय आदानात श्रमव्ययात महत्त्वपूर्ण वाढ न होता अर्थव्यवस्थेतून त्यांनाजीवननिर्वाहाकरीता लागणारे व आवश्यक असणारे भृती दर दिल्या जातील. या संदर्भात अनेक प्रकारच्या गृहितांचाअभ्यास केला गेलेला दिसून येत नाही. जे संदिग्ध स्वरूपात असल्यामुळे विकासाच्या साहित्यात अधिक विस्तारित स्वरूपात स्पष्टीकरण प्राप्त झाल्याचे दिसून येते. परंतु त्या ठिकाणी हेच स्पष्ट करता येईल की अर्धविकसीत राष्ट्र असो की विकसनशील



Scanned by CamScanner

राष्ट्र असो, कृषीतून उद्योगाकडे श्रमिकांचे स्थानांतर होत नाही तोपर्यंत आर्थिक विकासाला चालना प्राप्त होत नाही. अर्थातच श्रमिकांचे हे स्थानांतरण प्रामुख्याने त्या त्या ठिकाणी उद्योग व निर्माण कार्यात उपलब्ध असलेल्या तंत्रज्ञान, कामाची पातळी व दर यावर अवलंबून असेल.

अर्थशास्त्रीय सहमतानुसार हे दिसून येते की पुढील टप्प्यात सेवाक्षेत्रातील रोजगार वाढेल. हा बदल उद्योगातून सेवाक्षेत्राकडे असेल. या संदर्भात अजून हे स्पष्ट झाले नाही की, याकरीता केव्हा व कशा प्रकारचा आर्थिक विकास व दरडोई उत्पन आवश्यक असेल. कारण अशा प्रकारचे हे स्थानांतरण विविध अर्थशास्त्रज्ञांनी विविध प्रकारचे असेल असे स्पष्ट केले आहे. फिशर व क्लार्क यांच्या मतानुसार असे घडून येण्याचे कारण म्हणजे मागणी संरचनेत होणारा बदल होय. फिशरने या संदर्भात असे स्पष्ट केले आहे की, जनतेची मागणीची उत्पन्न लवचिकता ही एकापेक्षा जास्त असल्याने विलासी व सुखद वस्तुंची मागणी केली जाते. त्यामुळे अधिक उत्पन्नामुळे अधिक खर्च होतो. परिणामत: अशा उत्पादनाकरीता श्रमिकांच्याअधिक सेवा उपलबध श्रमशक्तीतून प्राप्त केल्या जातात. क्लार्कच्या मतानुसार निर्माण क्षेत्रातील/उद्योग क्षेत्रातील मागणीत कुंठीतता असल्याने व कृषीच्या उत्पादनात घट झाल्यामुळे सेवा क्षेत्रातील मागणीत वाढ होते. परंतु फिशरच्या मते सेवा क्षेत्रातील बदल प्रामुख्याने एकूण रोजगारातील प्रत्यक्ष, अंतिम व प्रमाणबद्ध मागणी दर्शविते. क्लार्कच्या अभ्यासानुसार सेवाक्षेत्रातील रोजगारीतील वाढ निर्माण क्षेत्रातल्या उत्पादकतेपेक्षा कमी असते. सेवाक्षेत्राच्यारोजगारात वाढ ही निर्माण क्षेत्रापेक्षा कमी उत्पादकीय क्षेत्रात झालेली दिसून येते. बाऊलमेल व फुक यांच्या मते सेवाक्षेत्रातील रोजगार वाढ प्रथमत: उद्योग व सेवा क्षेत्रातील भिन्न उत्पादकतेमुळे होते. यामधे मागणीतील स्थानांतरणाचा प्रभाव कमी असतो. बाऊलमेलच्यागृहीतानुसार वास्तविक आदानातील वस्तू व सेवांचे प्रमाण अनेक काळापर्यंत स्थिरस्वरूपात अनेक दैशातून  दिसून येते. ज्यामधे विकसित राष्ट्रातील अभ्यास कॅनडा, जर्मनी, फ्रान्स, जपान, यु.के व यु.एस.इ. चा होय. १९४८-१९९५ या कालावधीत विकसीत राष्ट्रातील सेवाक्षेत्रातील अमुलाग्र वाढ ही कमी उत्पादकीय क्षेत्रातील दर्शविते. व्हिक्टर फुक्स अनुसार यु.एस. मधील ४८ राज्यातील त्यांनी केलेल्या अभ्सासानुसार (१९२९-१९६५) सेवाक्षेत्राच्या उत्पादकतेतील वाढ रोजगारीत वाढ घडवून आणण्यास साह्यभूत ठरते. रोजगारातीलच वाढ नाही तर काही प्रमाणात राष्ट्रीय उत्पादनात देखील वाढ घडवून आणते. यालाच दुसऱ्या भाषेत 'अंतर्गत उद्योगातील श्रमविभाजन' असे संबोधले जाते. अशा प्रकारे श्रमशक्तीचा उपयोग सेवाक्षेत्राच्या संदर्भात मध्यस्थ म्हणून उपयोगात आणले जाते आणि अनेक प्रकारच्या क्रिया व प्रक्रिया ज्यासेवाक्षेत्राच्या स्वरूपाशी संबंधीत आहेत त्याचा उपयोग निर्माण पेढीद्वारे त्यांच्याएखाद्या घटकांच्या पूर्णतेसाठी केला जातो. म्हणून निर्माण व उद्योगाच्या संदर्भात अशा प्रकारच्या सेवा क्षेत्रातील श्रमशक्तीचा वापर बाह्य ठिकाणाहून करून घेणे शक्य होते. आदान प्रदानाच्या विश्लेषणामध्ये  हे सहज शक्य होते की, सेवाक्षेत्रातील कोणत्या भागाद्वारे आदानाचे वस्तू उत्पादनासाठी वापरल्या गेले आहे. मुख्यत: कृषी व उद्योग ज्यात कोणत्या क्षेत्राचा अंतिम मागणीकरीता उपयोग झाला हे स्पष्ट होण्यास मदत होते. अन्नधान्याच्या व्यापारातील रोजगारापेक्षा खते व बि-बियाणे यांच्यातिरणातील सेवेमुळे निर्माण होणारा रोजगार जास्त आहे. सिमेंट व लोहपोलादाच्याबांधकामातील रोजगारापेक्षा स्टेनलेस स्टीलच्या

Scanned by CamScanner

घरगुती उपयोगाकरीता आणल्याजाणाऱ्या वस्तुंच्याकिरकोळ व्यापारात रोजगाराचे प्रमाण अधिक आहे.अंतिम उत्पादन रोजगाराची कल्पना उपयोगात आणली ज्यात सर्व रोजगाराचा अंतर्भाव होतो. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरूपात आहे. काही अर्थशास्त्रज्ञांच्या मते उदा. रूसो व सेटकॅट २००१ मधे त्या या संदर्भात प्रयत्न केला त्याच्या अनुसार सेवाक्षेत्रातील रोजगाराचा हिस्सा, जो निर्माण क्षेत्रातून तया झाला व त्याचा उपयोग आदान म्हणून सेवाक्षेत्रासाठी करण्यात आला. अलिकडच्यादशकात हे निद आले की प्रामुख्याने १९८० नंतर सेवेच्यामागणीतील वाढ ही प्रामुख्याने मध्य किंवा अपूर्ण उत्पाद असलेल्या चा उपयोग करून सेवाक्षेत्रातील रोजगार वाढविल्यास साह्यक होतो. याशिवाय बाह्य सेवे निर्माण कार्यासाठी उपयोग केल्यामुळे सेवाखेत्रातील रोजगारात वाढ होते. या एका मोठ्या शक्तीमुळे मागणीतील उत्पन्न लवचिकतेच्या भिन्नतेमुळेच अर्थव्यवस्थेत उत्पादन संरचनेत बदल घडून येतो. कृ उद्योग व सेवा ही अशा प्रकारची त्यात क्रमवारीता असते. पुरवठ्याच्या बाजूने विचार केल्यास त्यामधील तंत्रज्ञान, प्रमाण, प्रदेशी उत्पादनाचे केंद्रीकरण, अंतर्गत उद्योगातील बदल, श्रमविभाजनाच्या तत्वामुळे उत्पादनाच्या अनेक क्रिया व प्रक्रियांचे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थानांतरण, श्रमशक्तीचे सेवाक्षेत्रातील वाढते प्रमाण असे असले तरी अनेक अर्थशास्त्रज्ञांच्यामते ही उत्पादकता निर्माण क्षेत्रातील उत्पादकतेपेक्षा कमी असते हे स्पष्ट केले आहे.

**ऐतिहासिक विश्लेषण**

वरील प्रकारच्या सैद्धांतिक विश्लेषणानंतर रचनात्मक बदलाच्या संदर्भात अलिकडील काळातील विकसीत राष्ट्राच्या संदर्भात ऐतिहासिक उदाहरणाच्या साह्याने अधिक स्पष्टीकरण योग्य ठरेल, यात कुझनेट्स व त्याच्या सारख्या अनेक अर्थशास्त्रज्ञांनी दस्ताऐवजाचा उपयोग करून हे स्पष्ट करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. याकरिता भूतकाळातील दस्ताऐवज परिपूर्ण अभ्यासल्या गेले. यापैकी, काही भागांचेच विश्लेषण करणार आहे ज्यात प्रामुख्याने अलिकडील काळातील आर्थिक रचनेतील बदल स्पष्ट केलेले असतील.

आजच्याविकसीत देशातील आर्थिक विकासाचे ऐतिहासिक उदाहरण पहावयाचे झाल्यास या सर्वांनी सामान्य पद्धतीचा वापर केल्याचे दिसून येते. एकूण उत्पादनात कृषीच्या उत्पादनातील घट, उद्योगातील आदानात सतत व क्रमश: दीर्घकालीन वाढ व नंतर घट, सेवाक्षेत्राच्या प्रमाणात वाढ ही वाढ मागील २० व्या शतकाच्या मध्यातील वाढीपेक्षा जास्त असलेली दिसून येते. ज्यात विकसीत राष्ट्रातील औद्योगिक उत्पादनातील घट यामुळे या कालावधीला 'औद्योगिक ऱ्हास' (राऊर्थार्न व वोक्स १९८७) म्हणून ओळखल्या गेले. याच कालावधीत औद्योगिक विकासानंतरचा हे अधिक स्पष्ट झाले. क्लार्क(१९६४).

संरचनात्मक बदलातील विविध टप्पे व त्यातील गतिमानता अर्थातच भिन्न भिन्न देशात भिन्न स्वरूपातून दिसून येते. आधुनिकीकरणाच्यापूर्वावस्थेत कुझनेट्सनी केलेल्या मुल्यांकनानुसार विविध कालावधीत मुख्यत्वे १९ व्या शतकाच्या विविध राष्ट्रातील बदलाचे विश्लेषण होय. विविध राष्ट्रात उदा. १८०० मधे ग्रेट ब्रिटन (ण.घ.) १८३५ फ्रान्स, १८६१ इटली, १८७०, ण.ड.अ. १९७८ मधे जपान या राष्ट्रात या काळावधीत कृषीचे उत्पादन एकूण उत्पादनात दोन तृतीयांश पेक्षा जास्त होते. कृषीचे राष्ट्रीय

Scanned by CamScanner

उत्पादनातील हे प्रमाण २५% पर्यंत कमी होण्यासाठी ७५ ते १०० वर्षाचा कालावधी युरोपियन राष्ट्रांना लागला. अशाच प्रकारची कृषी उत्पादनातील घट नॉर्थ अमेरिका व जपान या दोन्ही देशांना ७५ ते १०० वर्षांनंतर झालेली दिसून येते. त्यानंतरच त्या ठिकाणी आधुनिकीकरणाला सुरूवात झाली. आधुनिकीकरणाला वरील सर्व राष्ट्रात सुरूवात झाल्यावर त्याचा वेग वेगळ्या राष्ट्रात कमी जास्त प्रमाणात होता,काही ठिकाणी कृषी उत्पादनाचा वाटा कमी व्हायला वेळ लागला तरी १५% इतका कृषीक्षेत्राचा वाटा २० व्या शतकाच्या मध्यापर्यंत झालेला आढळतो व त्यानंतर ते ५% पर्यंत सर्वच विकसित देशात झालेला आढळतो. अमेरिकेतील राष्ट्रीय उत्पादनात कृषीचा वाटा हा केवळ ३% इतका आहे. तरीही अमेरिका कृषीप्रधान वस्तूंची विकसनशील राष्ट्रांना निर्यात करतो (हेक्शचर ओहलीन)

राष्ट्रीय उत्पादनात औद्योगिक क्षेत्राचा वाटा सर्वच विकसीत राष्ट्रात २५% जास्त असलेला दिसतो. नंतर विकसीत राष्ट्रातील औद्योगिक क्षेत्राचा वाटा राष्ट्रीय उत्पादनात सतत वाढत गेल्याचे दिसून येते. परंतु १९५० नंतर मात्र औद्योगिक उत्पादनाचा एकूण प्रदानात घट झाल्याचे दिसून येते. कमी अधिक प्रमाणात हा बदल निरीक्षण करण्याचे कार्य कुझनेट्स १९६६ विश्वअधिकोष १९८८ व इचवेरीया १९९७ यांनी केलेले दिसून येते. हे आश्चर्यजनक ठरेल की विकसीत देशातील आधुनिकीकरणाच्या काळातील औद्योगिक क्षेत्राचा वाटा राष्ट्रीय उत्पादनात जेवढा होतो तो २१व्या शतकाच्या आरंभीही तेवढाच असलेला दिसून येतो. २००२ मधे यु.के. तील औद्योगिक क्षेत्राचा वाटा एकूण राष्ट्रीय उत्पादनात २६% म्हणजे जवळपास पूर्वीइतकाच असलेला दिसून येतो.म्हणजेच १८०१ मधे तो २३% होता. फ्रान्समधे १८४१ मधे २५% होता. १८४१ मधे जर्मनीत २३% होता. इटलीमधे १९०१ मधे २२% होता,१८४१ मधे यु.एस.ए. मधे २०% होता.

सेवाक्षेत्रातील एकूण वाढ ही आधुनिकीकरणाच्या पहिल्या टप्प्यापासून विकसीत झाल्याचे सर्वच विकसीत राष्ट्रातून तेथील अनुभवाच्या द्वारे स्पष्ट करता येते. फक्त यातील मंद वाढ, फ्रान्स, जर्मनी, इटली व जपान या देशातून झालेली आढळते. १९०१ मधे यु.के. मधील सेवाक्षेत्रातील ही वाढ ५०% पेक्षा जास्त वाढ फ्रान्स, जर्मनी, इटली व जपान या देशातून झालेली आढळते. याच कालावधीत यु.एस.ए.चा एकूण राष्ट्रीय उत्पादनातील सेवाक्षेत्राचा वाटा ५०% पेक्षा जास्त झालेला आढळतो. त्यानंतर मात्र या जर्मनी, इटली व जपान या देशातून झालेली आढळते. याच कालावधीत यु.एस.ए.चा एकूण राष्ट्रीय उत्पादनातील सेवाक्षेत्राचा वाटा ५०% जास्त झालेला आढळतो. त्यानंतर मात्र या क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पादनातील वाटा सतत वाढत गेला व आज विकसीत राष्ट्रात ६८% ते ७५% इतका झालेला दिसून येतो. अलिकडील काळातील चीन या देशातील राष्ट्रीय उत्पादनातील क्षेत्रनिहाय वाटा बघितल्यास असे दिसून येते की सेवाक्षेत्राच्या वाट्यापेक्षा व कृषीच्या वाट्यापेक्षा द्वितीय क्षेत्राचा वाटा म्हणजे औद्योगिक क्षेत्रातील वाटा ५५% च्या जवळपास आहे. नंतर सेवा क्षेत्र व कृषीचा क्रमांक दिसून येतो. यावरून हे स्पष्ट होते की चीनमधे अधिक रोजगार द्वितीय क्षेत्रातून प्राप्त होतो. जो प्राथमिक क्षेत्राच्या विकासाकरीता व तृतीय क्षेत्राच्या विकासाकरीता महत्त्वाचे समजले जाते. भारताचा या दृष्टीने विचार केल्यास एकूण राष्ट्रीय उत्पादनात सेवाक्षेत्राचा वाटा ५५% आहे. चीन व भारत यांची तुलना केल्यास क्षेत्रीय संदर्भात ते विरूद्ध असलेले

Scanned by CamScanner

आढळतात.

राष्ट्रीय उत्पादनात सेवा क्षेत्राचा वाटा अमेरिकेतील ७५% इतका आहे. इंग्लंडमधील हाच वाटा ७३% इतका आहे. फ्रान्समधे हा वाटा ७२% इतका आहे. २००२ मधे जपानचा वाटा ६८% इतका होता.

वरील प्रकारचे क्षेत्रीय बदलातील विश्लेषण जे आधुनिकीकरणाच्या काळात, विकसीत राष्ट्रात आर्थिक विकासाच्या संदर्भात स्पष्ट केले आहे ते विकासातील सामान्य प्रारूपाच्या प्रवृत्तीतून स्पष्ट झाल्याचे आढळते. तरी या संदर्भात काही अर्थशास्त्रज्ञांनी प्रश्न निर्माण केले आहेत ज्यात चेनरी व सीरकान (१९७५) यांच्या मताप्रमाणे कोणत्याही विषयावरील अर्थपूर्ण संवाद देशांना विविध समुहामधे त्याची विभागणी करणे आवश्यक ठरते. ज्यामधे आकारानुसार मोठा-लहान, प्राथमिक निर्माण व औद्योगिक निर्माण अशा प्रकारे यातील सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्या घटकांचे कार्य होय, जे अधिक मोठे, लहान व मोठे अशी वर्गवाटी असे केल्यावरही राष्ट्रीय उत्पादनातील तिन्हीच्या सरासरी मूल्यात विशेष फरक आढळत नाही. शिवाय औद्योगिक क्षेत्राच्या वाट्यापेक्षा जो सुरूवातीला दरडोई उत्पन्नातील प्रमाणात लहान राष्ट्रात कमी असतो व नंतर तो जास्त होतो. (पर्कीन्स व सिरकीन १९८९). हे रचनातमक बदल मग कोणत्याही काळातील असो सर्वात आश्चर्यकारक म्हणजे २१ व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत सर्व विकसीत राष्ट्रांची आर्थिक रचना समान असेल. म्हणून अशा स्थितीत कृषीचा राष्ट्रीय उत्पादनातील वाटा ५% उद्योग व निर्माणीचा वाटा २५% ३०% व सेवा क्षेत्राचा वाटा ७०% इतका झालेला असेल.

यात अधिक महत्त्वाचे व गमतीदार महणजे राष्ट्रीय उत्पादनातील रोजगार सामान्यत: सर्वच ठिकाणी समान असलेला दिसून येतो. खालील दिलेल्या कोष्टकावरून सकल राष्ट्रीय उत्पादनातील विभिन्न क्षेत्रातील रोजगार २००२ पर्यंतचा काही निवडक विकसीत राष्ट्राच्या संदर्भात दर्शविला आहे. यामधे दोन्ही चलात समानता दिसूनयेते. सात विकसीत राष्ट्रांची याकरिता निवड केली आहे. ज्या विकसीत राष्ट्रातील प्राथमिक क्षेत्राचा वाटा सकल राष्ट्रीय उत्पादनातील वाटा ५% पेक्षा कमी आहे व रोजगाराचाही वाटा तेवढाच आहे. द्वितीय क्षेत्राचा वाटा २२ ते ३०% विस्तारात दिसून येतो. तर रोजगाराचा वाटा २१% ते ३३% इतका आढळतो व सेवा क्षेत्राचा वाटा ६८% ते ७५% इतका दिसून येतो. ज्यात रोजगाराचा वाटा ही तेवढाच असलेला दिसून येतो. सारखे काय जर उत्पादनातील संरचनात्मक बदलाबरोबर रोजगारातही तेवढ्याच विश्वसनीय प्रमाणात बदल होतो. इंग्लंडमधील प्राथमिक क्षेत्रातील उत्पादन जेव्हा घटले, जे १८०१ मधे ३२% ते १८४१ मधे २२% इतके झाले व १९०१ मधे ते ६% इतके झाले. त्याचबरोबर या क्षेत्रातील रोजगारही ३५%, २३% व ९% इतका कमी झाला. द्वितीय क्षेत्रातील उत्पादनात ही वाढ झाली जी १८०१ मधे २३% होती ती १९०१ मधे ४०% इतकी झाली. १९५५ मधे त्यात वाढ होऊन ती ५६% इतकी झाली. १९८० मधे त्यात ४२% इतकी घट झाली. या क्षेत्रातील रोजगारातील बदल ५४%, ५७% व ३८% इतका झाला होता. दुसऱ्या विकसीत राष्ट्रामधे विभिन्न देशातील रोजगार व उत्पादनाच्या प्रमाणात वरीलप्रमाणे साधर्म्य दिसत नाही. दीर्घकालावधीमधे देखील हे दृश्यात आले नाही की, ज्यामधे समान स्वरूपात विभिन्न क्षेत्रातील अंतर्गत उत्पादकता व उत्पन्नातील भिन्नता यामधे विशेष परिमाणात असलेले अंतर होय.

Scanned by CamScanner

सारांश स्वरूपात असेच नमूद करता येईल की ऐतिहासिक उदाहरणावरून जे आर्थिक संरचनेतील बदलातील परिमाणामुळे विकसीत राष्ट्रांचा आर्थिक विकास शक्य झाला. मागील दोन शतकात प्रथमत: सर्वच राष्ट्रे दीर्घकालावधीत त्यांनी आधुनिक आर्थिक विकासासाठी सारख्या क्रमवारीने सर्वच क्षेत्रातील त्यांच्या अर्थव्यवस्थेतील बदलाची सुरूवात मुख्यत्वे प्राथमिक क्षेत्र व नंतर प्राधान्याने द्वितीय क्षेत्र व नंतर तृतीय क्षेत्र असे दिसून येते. दुसरे प्राथमिक क्षेत्रातील घट व सेवाक्षेत्रातील सतत वाढ, अशा प्रकारचा परिणाम मागील दोन दशकात दिसून येतो. द्वितीय क्षेत्राच्या संदर्भात वाढ व घट झालेली दिसून येते. दीड शतकाच्या कालावधीत यात घट वाढ घडून आलेली दिसते तर नंतरच्या ५० वर्षात यात घट झालेली आढळते. काळ परिणामाव्यतिरिक्त विचार केल्यास जेव्हा औद्योगिकरणाला सुरूवात झाली तेव्हा औद्योगिकरणाशिवाय त्याचा वाटा कमी झालेला दिसून येतो व त्या सुरूवातही २०व्या शतकाच्या मध्यात सर्व देशात झालेली दिसून येते. तिसरे म्हणजे मुख्य विकसित राष्ट्रातील आर्थिकसंरचना ही एकमेकांसारखी असलेली दिसून येते. ज्यात राष्ट्रीय उत्पादनात प्राथमिक क्षेत्राचे ५% पेक्षा कमी योगदान, द्वितीय क्षेत्राचा २५% जास्त योगदान तर तृतीय क्षेत्राचे ७०% जास्त योगदान होय. चौथे म्हणजे श्रम शक्तीची संरचना देखील यासोबतच असलेली दिसून येते. प्रत्येक क्षेत्रातील उत्पादनातील बदलाबरोबर समान प्रमाणात स्मरणशक्तीमधे देखील बदल झलोला आढळतो. यात सर्वात महत्त्वाचे म्हणजे आज असलेली विकसीत राष्ट्रातील रोजगार संरचना उत्पादनातील संरचनेबरोबर असलेली दिसून येते. परिणामत: उत्पन्नपातळी व उत्पादकतेच्या संदर्भात 'आंतर क्षेत्रीय समानता' आढळून येते.

### ३) भारताच्या संदर्भात मागील अर्धशतकातील बदल

भारताच्या विकासाच्या अनुभवाकडे बघितल्यास विकसीत राष्ट्रातील ऐतिहासिक अनुभवापेक्षा कसे वेगळे आहे हे स्पष्ट होते. भारताच्या संदर्भात याठिकाणी मागील केवळ ५० वर्षांचेच विश्लेषण लक्षात घेतले आहे. ज्यात भारतात आधुनिक विकासाची सुरूवात ही संचरनात्मक बदलामुळे घडून आलेली दिसते. १९५० मधे या संदर्भात भारतीय अर्थव्यवस्थेत संरचनात्मक बदलाची वैशिष्ट्ये आढळून येतात. जे सामान्यत: आज सर्वच विकसित व जे विकासाची कास धरू पहात आहेत अशा सर्व राष्ट्रात दिसून येते. भारताच्या संदर्भात सकल राष्ट्रीय उत्पादनातील क्षेत्रनिहाय हिस्सा/ वाटा हा ६०% कृषी, १३% उद्योग, २७% सेवाक्षेत्र इतका होता. १९५० मधे भारतीय अर्थव्यवस्था ही संरचनात्मक दृष्ट्या १८व्या शतकातील ग्रेट ब्रिटेन सारखी असलेली दिसून येते. १९व्या शतकाच्या आरंभातली जर्मनीसारखी, १९व्या शतकाच्या मध्यातली यु.एस.ए. व इटली सारखी आणि १९व्या शतकातील जपानसारखी आढळते. श्रमशक्तीच्या बाबतीत असाच तुलनात्मक अभ्यास केल्यास असे आढळते की, विभिन्न क्षेत्रातील श्रमशक्तीचे योगदान ७३% कृषी, ११% उद्योग व १६% सेवा क्षेत्रातील इतके होते. १८८० मधे यु.एस.ए. मधील हेच प्रमाण ७२% कृषी,१२% उद्योग, १६% सेवा क्षेत्रात दिसून येते. १८४१ मधे यु.एस.ए. मधील हेच प्रमाण ७२%कृषी, १२% उद्योग, १६% सेवा क्षेत्रातील इतके होते. १८८० मधे जपान मधील हेच प्रमाण ६५% कृषी, १५% उद्योग २०% सेवाक्षेत्रातील होते.

मागील ५० वर्षातील भारताचा आर्थिक विकास हा समान स्वरूपात संरचनात्मक काळातील अन्य

Scanned by CamScanner

विकसीत देशांप्रमाणेच असलेला दिसून येतो. सकल राष्ट्रीय उत्पादनातील प्राथमिक क्षेत्राचा वाटा १९५०-५१ मधे ६०% इतका होता तो २००३-०४ मधे २४% इतका झाला, द्वितीय क्षेत्राचा वाटा १३% वरून २५% इतका झाला तर सेवा क्षेत्राचा वाटा २८% वरून ५१% इतका झाला. अशा प्रकारचा बदल हा सतत ५३ वर्षात भारतात घडून येत आहे, परंतु १९९०-९१ मधे या बदलाच्या वेगात वाढ घडून आल्याचे दिसून येते. पहिल्या ४० वर्षात प्राथमिक क्षेत्रातील घट ही ५९% वरून ३५% इतकी झालेली आढळते. पुढील १३ वर्षात यात ३५% वरून २४% घट झाली. याच कालावधीत सेवा क्षेत्रात २८% वरून ४०% इतकी वाढ झाली व पुढील १३ वर्षात यात ४० % वरून ५१% पर्यंत वाढ झाल्याचे दिसून येते. द्वितीय क्षेत्रातही वाढ होऊन १९९१ मधे त्यादराला कुंठीतता आली.

भारतीय अर्थव्यवस्थेतील वर्तमान काळातील संरचनात्मक बदलातील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे सेवाक्षेत्र होय. ज्याचे विकासाच्या कार्यात सर्वात जास्त योगदान असलेले दिसते. द्वितीय क्षेत्राच्यायोगदानात उद्योग व निर्माण कार्य, ऐतिहासिक दृष्ट्या प्रारंभाच्या अवस्थेतील विकासाकरीता अतिशय महत्त्वाचे होय व अलिकडील काळातील विकासकार्यात अशा प्रकारचे योगदान महत्वाचे ठरते. सर्वच विकसीत राष्ट्रांकडे बघितल्यास अशाच प्रकारची स्थिती त्याही ठिकाणी असलेली आढळते. २०व्या शतकाच्या मध्यात अशा प्रकारची स्थिती भारतात दिसून येते. दुसऱ्या शब्दात स्पष्ट करायचे झाल्यास जेव्हा विकसित राष्ट्रे क्षेत्रीय संरचनेतून संक्रमित होत असतांना मुख्यत्वे सेवाक्षेत्राचे योगदान अर्थव्यवस्थेत विपूल झाल्यावर त्याठिकाणी उद्योगाचा अर्थव्यवस्थेतील वाटा ५०% झाल्यानंतर अशाच प्रकारचे भारतात देखील औद्योगिकरणानंतर 'सेवा अर्थव्यवस्था' जे औद्योगिकरणाशिवाय होऊ पहात आहे असे दृष्यास येईल.

या संदर्भात प्रामुख्याने दोन महत्त्वाच्या सूचना अर्थव्यवस्थेतील विश्लेषणासाठी महत्वाच्या असलेल्या दिसून येतात. ज्यात स्थानांतरण, ऐतिहासिक संक्रमण जे प्रामुख्याने कृषी ते सेवा औद्योगिक क्षेत्र वगळता महत्त्वाच्या ठरतात. यापैकी एक म्हणजे तंत्रज्ञानातील आधुनिकता जी काही मागील दशकात घडून आली त्यामुळे सेवेतील मागणीत वाढ जरी दरडोई उत्पादनातील वाढ तुलनात्मक दृष्ट्या कमी असली तरी व सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे उत्पादन व सेवेतील अंधूक असा फरक होय. संदेशवहन साधनातील विकास व तंत्रज्ञानातील बदल व लोकांचे एका देशातून दुसऱ्या देशातील स्थानांतरण झाल्यामुळे तिथल्या मूलभूत बाबींचा त्यांच्यावर परिणाम होऊन देशांतर्गत तशाच प्रकारची मागणी सेवेच्याव उत्पादनाच्या संदर्भात केली जाते. महणून तशाच प्रकारचे उत्पादन व सेवा निर्माण करणे गरजेचे ठरते. (पंचमुखी, नंवीयार, मेहता १९८६) परिणामत: सेवेच्या मागणीची लवचिकता ही एकापेक्षा जास्त, दरडोई उत्पन्न कमी असलेल्या राष्ट्रात देखील आढळते. (सॅबॉको १९७५) त्यामुळे राष्ट्रीय उत्पादनात सेवा क्षेत्राचा वाटा वाढत जातो. दुसरे म्हणजे संरचनात्मक बदलाचे परंपरागत प्रारूप जे आर्थिक विकासाच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय व्यापाराचे स्थान व त्याचे महत्त्व यांना मान्यता देणारे होय. कारण प्रत्येक राष्ट्रातील घरेलू उत्पादन संरचना मागणी पद्धतीतील बदल दर्शविते. अधिक खुल्याधोरणामुळे या संदर्भात व्यापाराचे स्थान अधिक महत्त्वाचे ठरते. मागणीतील बदल हे एखाद्या राष्ट्रातील उत्पादन व उत्पादनाचे स्वरूप यावर

Scanned by CamScanner

अवलंबून राहील व उपभोग मागणीतही भिन्नता आढळेल. या सर्वांचा परिणाम म्हणजे तुलनात्मक व्यापाराचा सिद्धान्त होय.

## ४. विकसनशील राष्ट्राशी तुलना (आशीया)

निरनिराळ्या निरीक्षणातून उपयोगात आणलेल्या विविध देशातील विकासाच्या नवीन संकल्पना व मार्ग वरील विवेचनातून स्पष्ट होतात. ज्यात पूर्वकाळातील विकासाची पद्धत, व तिची जाण होते व हे जर सत्य असेल की जे केवळ भारताच्या संदर्भात नव्हे तर दुसऱ्या देशांच्या बाबतीतही ज्या ठिकाणी सारख्या पातळीवरील आर्थिक विकास स्पष्ट होतो विकसनशील राष्ट्राशी तुलना केल्यास मुख्यतः दक्षिणेकडील देश, दक्षिणपूर्व व पूर्व आशिया त्यामधेही विकासाकरीता हीच प्रवृत्ती असलेली दिसून येते. तुलनात्मक अभ्यासाकरीता चीन, इंडोनेशिया, मलेशिया, पाकिस्तान, फिलीपीन्स, थायलंड व गणराज्य कोरीया घेतलेले आहे. या राष्ट्रातील सेवाक्षेत्रांचे योगदान १९६० पासून वाढलेले दिसून येते. इंडोनेशियामधे १९६० मधे सेवाक्षेत्राचा वाटा २५% इतका होता तो वाढून २००२ मधे ३८% इतका झाला. मलेशियात १९६० ते १९८० च्या काळात सेवा क्षेत्राच्या वाट्यात घट झालेली दिसून येते. परंतु १९८० ते २००२ च्या काळात त्यात वाढ होऊन ३६% वरून ४४% इतका झाला. पाकिस्तानचा वाटा ३८% वरून ५४% तर फिलीपिन्सचा वाटा ४६% वरून ५३% इतका झालेला दिसून येतो. थायलंडचा वाटा ४१% वरून २००२ मधे ४८% इतका झालेला दिसून येतो. सकल राष्ट्रीय उत्पादनातील चीनचा वाटा १९८० मधे २१% इतका होता तो २००२ मधे ३४% इतका झाला. गणराज्य कोरीया येथे दरडोई उत्पन्नाची पातळी ही जास्त आहे. तिथे १९६० मधे ते प्रमाण ४३% इतके होते तर २००२ मधे ५५% इतके झाले. भारतात सेवा क्षेत्राचा सकल राष्ट्रीय उत्पादनातील वाटा अधिक गतीने वाढलेला दिसतो. १९६० मधे तो ३१% इतका होता तो २००२ मधे ५१% इतका झाला.

सर्वच देशाच्या अर्थव्यवस्थेत राष्ट्रीय उत्पादनातील प्राथमिक क्षेत्रातील वाटा कमी झालेला दिसून येतो. यात सर्वात जास्त घट थायलंड मधे झालेली दिसून येते. (४०%, ९%) कोरीयातील घट (३७%, ४%) परंतु सर्वच राष्ट्रातील द्वितीय क्षेत्रातील वाटा वाढलेला दिसून येतो. ह्या प्रमाणे इंडोनेशियामधील हे प्रमाण १९६० मधे २५% इतके होते तर १९८० मधे ४२% तर २००२ मधे ४५% इतके झाले. थायलँडमधे १९%, २९% ४३% इतके झाले. मलेशिया १८% ४१% ४७% इतके प्रमाण झाले. भारताचा द्वितीय क्षेत्रातील वाटा मात्र या तुलनेने कमी आहे. २००२ मधे भारताचा द्वितीय क्षेत्रातील सकल घरेलू उत्पादनातील २५% इतका होता तर याच कालावधीत चीनचा वाट ५१% इतका होता. इंडोनेशियाचा वाटा ४५% थायलँडचा ४३% तर मलेशियाचा ४७% इतका होता. पाकिस्तानातील द्वितीय खेत्राचा वाटा हा भारताच्या वाट्यापेक्षा कमी असलेला दिसून येतो. १९८० ते २००२ पर्यंत फिलीपिन्सच्या वाट्यात घट झालेली दिसते.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की २१व्या शतकातील जागतिकीकरणात विकसीत राष्ट्रातील आर्थिक विकास मुख्यतः ज्या विविध क्षेत्रातून स्पष्ट होतो त्यात सेवाक्षेत्राचे योगदान अधिक आहे. काही राष्ट्रातील द्वितीय क्षेत्राचा वाटा जास्त असलेला दिसतो परंतु तो सर्वांनाच लागू होतो असे दिसत नाही.

Scanned by CamScanner

विकसनशील देशात ही अशाच प्रकारचे दृश्य कमी अधिक प्रमाणात दिसून येते. या संदर्भात भारताचा विचार केल्यास भारतातही द्वितीय क्षेत्र व तृतीय क्षेत्राचा वाटा आर्थिक विकासासाठी उपयुक्त ठरत आहे. भारतातील तृतीय क्षेत्रातील सकल घरेलू उत्पादनातील दैदिप्यमान प्रगती असली तरी चीन, इंडोनेशिया व मलेशिया या राष्ट्रात सकल घरेलू उत्पादनात द्वितीय क्षेत्राचा वाटा जास्त असलेला दिसतो परंतु तो सर्वांनाच लागू होतो असे दिसत नाही. विकसनशील देशात ही अशाच प्रकारचे दृश्य कमी अधिक प्रमाणात दिसून येते. या संदर्भात भारताचा विचार केल्यास भारततही द्वितीय क्षेत्र व तृतीय क्षेत्राचा वाटा आर्थिक विकासासाठी उपयुक्त ठरतो आहे. भारतातील तृतीय क्षेत्रातील सकल घरेलू उत्पादनातील दैदिप्यमान प्रगती असली तरी चीन, इंडोनेशिया व मलेशिया या राष्ट्रात सकल घरेलू उत्पादनात द्वितीय क्षेत्राचा वाटा जास्त असलेला दिसतो. थायलंड व कोरीया या देशातील द्वितीय क्षेत्राचे योगदान ४०% इतके असलेले दिसते. तुलनात्मक दृष्ट्या भारताचे सकल घरेलू उत्पादनात द्वितीय क्षेत्राचा वाटा २५% इतका दिसत आहे. या संदर्भात अन्य महत्त्वाचे म्हणजे भारतातील विकासाची प्रक्रिया व अन्य देशातील विकासाची प्रक्रिया या दोन्हीमधे महत्त्वाचा फरक म्हणजे अर्थव्यवस्थेतील बदलत्या क्षेत्रीय रचनेतील, श्रमशक्तीचे स्थानांतरण मुख्यत: जे सेवा क्षेत्रातील रोजगाराच्या संदर्भात दिसून येते. सर्व देशांमधे भारतात सामान्य घटना जर कोणती असेल तर श्रमशक्तीचे हळूवार रीतीने प्राथमिक क्षेत्राकडून अन्यक्षेत्राकडे झालेले स्थानांतरण होय. अशाप्रकारे चीनमधे सकल घरेलू उत्पादनातील प्राथमिक क्षेत्राचा वाटा १९८० मधे ३०% वरून २००२ मधे १५% झाला. त्याचबरोबर प्राथमिक क्षेत्रातील रोजगार ६९% वरून ४७% इतका झाला. इंडोनेशियात १९६०ते२००२ मधे ५०% वरून १८% व रोजगार ७५% वरून ४४% थायलंडमधे ४०% ९% व रोजगार ८४% ४६% झालेला दिसून येतो. मलेशियामधे मात्र प्राथमिक क्षेत्रातील श्रमशक्तीचा वापर भारताच्या तुलनेत भिन्न असलेला दिसून येतो. सकल घरेलू उत्पादनात श्रमशक्तीचा वापर ६३% वरून १८% इतका झाला. तर तोच भारतातील दर ३६% वरून ९% . इतका झालेला दिसतो. भारतात १९६० ते २००२ त्याकालावधीत सकल राष्ट्रीय उत्पादनातील वाटा १९६० ते २००२ या कालावधीतील ५५% वरून २४% तर श्रमशक्तीचा वाटा ७४% ६०% इतका झालेला दिसतो. अशा प्रकारे भारतात प्राथमिक क्षेत्रातील सकल घरेलू उत्पादनाचे प्रमाण कमी झाले परंतू अन्य राष्ट्रांच्या तुलनेत भारतात प्राथमिक क्षेत्रातील श्रमशक्तीचे स्थानांतरण फार कमी झालेले दिसून येते.

सर्वच देशात द्वितीय क्षेत्रातील सकल घरेलू उत्पादनात श्रमशक्तीचा वाटा कमी असलेला दिसूनयेतो. परंतू अन्य दोन घटकांमधे या कालावधीत सारखा बदल झालेला दिसतो. इंडोनेशियात सकल घरेलू उत्पादनातील द्वितीय क्षेत्राचा वाटा १९६० मधे २५% इतका होता तो २००२ मधे ४५% इतका झाला. रोजगाराच्या दरात देखील ८% वरून १७% एवढी वाढ झाली. थायलंडमधे सकल घरेलू उत्पादनात द्वितीय क्षेत्राचा वाटा याच कालावधीत १९% वरून ४३% इतका झाला तर रोजगारदरात वाढ ४% वरून २१% इतकी झाला. मलेशियामधे हे प्रमाण १८% वरून ४७% इतका झाला तर रोजगारातील बदल १२% वरून ३२% इतका झाला. चीनचा वाटा १९८० मधे ४९% इतका होता तो २००२ मधे ५१% इतका झालेला आढळतो. तर रोजगारातील वाढ १८% वरून ४७% इतके झाले तर रोजगारातील बदल

Scanned by CamScanner

१२% वरून ३२% इतका झाला. चीनचा वाटा १९८० मधे ४९% इतका होता तो २००२ मधे ५१% इतका झालेला आढळतो. तर रोजगारातील वाढ १८% वरून २१% इतकी झाली. भारतात १९६० ते २००२ ह्या कालावधीत सकल घरेलू उत्पादनात द्वितीय क्षेत्राचा वाटा १६% वरून २५% इतका वाढला तर रोजगारात ११% वरून १८% पर्यंत वाढ झाली. यावरून हे स्पष्ट होते की, सकल घरेलू उत्पादनात श्रमशक्तीचा वाटा द्वितीय क्षेत्रातील वाढीच्या प्रमाणात बदललेला दिसूनयेतो. समान प्रमाणात श्रमशक्तीच्या साधनातून मोठ्या प्रमाणावर उत्पादनाची निर्मिती भारतापेक्षा अन्यराष्ट्रातून निर्माण झालेली दिसून येते.

अन्य देशांच्या तुलनेत भारतात वेगळी स्थिती रोजगाराच्या संदर्भात असल्याचे कारण म्हणजे सकल घरेलू उत्पादनातील सेवाक्षेत्रातील कमी रोजगार निर्मिती होय. दुसऱ्या देशात सकल उत्पादनात सेवा क्षेत्राचा वाटा कमी अधिक प्रमाणात वाढलेला दिसून येतो. भारतात सकल घरेलू उत्पादन वाढीच्या तुलनेत रोजगारातील वाढ अल्प असलेली दिसते. उदा. चीनमधे सकल घरेलू उत्पादनात सेवाक्षेत्राचा वाटा १९८० मधे २१% इतका होता तो २००२ मधे ३४% इतका झाला. त्यांचा रोजगार देखील १३% वरून ३१% इतका वाढला. थायलँड, इंडोनेशिया, मलेशिया, फिलीपिन्स व कोरीया सकल घरेलू उत्पादनाच्या तुलनेत रोजगारातील वाढ जास्त होती. भारताच्या संदर्भात सकल घरेलू उत्पादनात सेवा क्षेत्राचा वाटा १९६० मधे २९% इतका होता तो २००२ मधे ५१% इतका झाला. रोजगाराच्या दरात १५% वरून २२% वाढ झालेली दिसून येते. दुसऱ्या शब्दात स्पष्ट करायचे झाल्यास सेवाक्षेत्र हे कमी प्रमाणात रोजगार प्रेरीत असलेले दिसून येते. परिणामत: दुसऱ्या देशात २००२ मधे सकल घरेलू उत्पादनात सेवा क्षेत्र व रोजगार हे सारखे होते. चीनमधे ३४% आणि ३१% इंडोनेशियात ३८% व ३९%, मलेशिया ४४% व ५०% व कोरीया ५५% व ६२% तर भारतात हे प्रमाण ५१% व २२% इतके आढळून येते हे तक्ता क्र. ३ मधे स्पष्ट केले आहे.

या संदर्भात अन्य एशियन राष्ट्र व भारताची तुलना केल्यास आपल्यास असे दिसून येईल की प्रथमत: भारतासह सर्वच देशातील सकल घरेलू उत्पादनातील प्राथमिक क्षेत्राचा वाटा कमी झालेला दिसून येतो. दुसरे भारत सोडून द्वितीय क्षेत्रातचा सकल घरेलू उत्पादनात वेगाने वाढ झालेली दिसून येते. भारतात हा वेग कमी आहे. तिसरे म्हणजे सर्वच राष्ट्रात सेवा क्षेत्राचा विस्तार व विकास अधिक वेगाने झाला तर भारतात हाच वेग अन्य देशांपेक्षा जास्त असलेला दिसून येतो. चौथे म्हणजे द्वितीय क्षेत्राचे योगदान चीन, इंडोनेशिया, मलेशिया या देशात सर्वात जास्त म्हणजे सकल घरेलू उत्पादनातील वाटा ४०% इतका दिसून येतो. थायलंड व कोरीयात देखील हा दर सारख्या प्रमाणात दिसून येतो. भारतात मात्र अर्थव्यवस्थेत सेवाक्षेत्राचे प्राबल्य असलेले दिसून येते. द्वितीय क्षेत्राचा वाटा घरेलू उत्पादनात २५% इतकाच आढळतो. पाचवे अन्य देशातील श्रमशक्तीचा प्राथमिक क्षेत्रातील हिस्सा हळूहळू कमी होत आहे. तर भारतातील श्रमशक्तीचा प्राथमिक क्षेत्रातील हिस्सा हळूहळू कमी होण्याऐवजी तो आहे त्याच स्थितीत आढळत आहे. आज ही भारतात एकूण श्रमशक्तिपैकी निम्यापेक्षा जास्त श्रम शक्ति प्राथमिक क्षेत्रात कार्यरत असलेली आढळून येते. सहावे उद्योगातील श्रमशक्तीचा वाटा अन्य देशांप्रमाणे भारतातही २००२ पर्यंत सारख्या प्रमाणात बदल झालेला दिसून येतो. परंतु वास्तविकता ही आहे की अन्य देशात सकल घरेलू



Scanned by CamScanner

उत्पादनात द्वितीय क्षेत्राचा वाटा जास्त आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील कमी उत्पादकता व तुलनातमक दृष्ट्या 'आंतरक्षेत्रीय तुलनात्मक' अधिक रोजगार निर्माण क्षमता होय. सातवे सकल घरेलू उत्पादनातील सेवा क्षेत्रातील वाढ म्हणजे त्याच बरोबर अर्थव्यवस्थेतील रोजगार वाढ होय. परंतु भारतामधे ही स्थिती प्रतिकूल स्वरूपात आढळते म्हणून भारतात सेवाक्षेत्र हे अर्थव्यवस्थेतील सर्वात मोठे क्षेत्र असले तरी रोजगार निर्मितीच्या बाबतीत ते लहान आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर सेवा क्षेत्राचा वाटा हा देशाच्या अर्थव्यवस्थेतील महत्वाचा वाटा दर्शवितो. म्हणून सेवाक्षेत्राचे स्थान महत्वपूर्ण होय. परंतु मागील दोन दशकातील सेवा क्षेत्राच्या उत्पादकतेतील विकास व रोजगार निर्माण क्षमता मात्र कमी राहिलेली आढळून येते. अर्थशास्त्रज्ञांच्या बाबतीत या संदर्भात भिन्न भिन्न विचार दिसून येतात. त्यापैकी भारतातील सेवा क्षेत्राचा विस्तार म्हणजे क्षेत्राची असलेली कमी उत्पादकता होय.

**भारतातचे सेवाक्षेत्र**

भारतात विकासाची प्रक्रिया सुरू आहे ज्यात वेगवेगळ्या प्रकारची भिन्नता असलेली दिसून येते. व ही भिन्नता आजची नव्हे तर ऐतिहासिक दृष्ट्या आज विकसित देशांची होती त्याप्रमाणे आज भारताची असलेली दिसून येते. परंतु आज सर्वच देशांनी विकासाकरिता वेगवेगळे मार्ग स्वीकारलेले दिसून येतात. ज्यात जागतिकीकरणाचे वातावरण व व्यापार व भांडवलाच्यानियंत्रणावरील बंधने काढून टाकलेली आहेत,अशा स्थितीत विकासाचा मार्ग हा द्वितीय क्षेत्राच्या ऐवजी सेवाक्षेत्राचा वापर करून विकास साधला जात आहे. व अशा प्रकारची स्थिती ही भारतीय अर्थव्यवस्थेत आज सर्वच ठिकाणाहून सर्वत्र दिसून येते. ज्यामधे कमी विकासाकडून अधिक विकासाकडे जाण्याची प्रवृत्ती मागील दोन दशकांपासून दिसून येत आहे. मागील काही दशकातील भारतातील आर्थिक प्रगतीकडे काही अर्थशास्त्रज्ञांचे संभाव्यत: दुर्लक्ष झालेले दिसून येते. जेव्हा की भारतातील आर्थिक विकासाचा दर अधिक तीव्र गतीने वाढत आहे व भारत हा जगातील अन्य देशांच्या तुलनेत अधिक द्रुत गतीने आपला विकास करणारा देश म्हणून त्याची ओळख होत आहे. काही अर्थशास्त्रज्ञांनी या संदर्भात आपले लेखन सुरू केले आहे, ज्यामधे भारतातील विकास दराच्या बाबतीत विविध कारणांचा व त्याच्या परिणामाचा अभ्यास त्यांनी सेवाक्षेत्राच्या संदर्भात अतिरिक्त विकासाच्या संदर्भात केलेला दिसून येतो. त्याचबरोबर स्थैर्यतेच्या व किंमतपातळीच्या दृष्टिकोनातून रोजगार व वितरणातील व्यवस्थेतून देखील अभ्यास केलेला दिसून येतो. (उदा. मित्रा १९८८, भट्टाचार्य व मित्रा १९९०, भल्ला २००४) दुसऱ्यांनी या संदर्भात प्रश्नाचे परिक्षण करण्याचे ठरविले आहे. भारतात विकासाकरीता द्वितीय क्षेत्राऐवजी प्राथमिक क्षेत्राला अग्रक्रम दिला जाईल काय ? (सिंग २००५)

परंतु काही व्यक्तींना या संदर्भात शंका आहे की मागील दोन दशकातील सर्वच विकास केवळ सेवाक्षेत्राच्या विकासामुळे झाला आहे व हे वास्तविक सत्य आहे. या कारणास्तव विकासातील सत्यता केवळ क्षेत्रांचे वर्गीकरण करून द्वितीय क्षेत्रापेक्षा तृतीय क्षेत्राचे स्थान विकासात अधिक आहे या संदर्भात अनेक विद्वानांनी असे लक्षात आणून दिले आहे की, विकसीत राष्ट्रातील वाढ ही प्रामुख्याने तंत्रज्ञानांतील बदल उत्पादन व्यवस्था व बाजाराची स्थिती या सर्व घटकातील बदलामुळे उपक्रमींना उत्पादनाकरीता सुलभता ही सेवाक्षेत्रातील 'बाह्य संसाधना'चा उपयोग करून उत्पादनवाढीसाठी पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणात



Scanned by CamScanner

करून घेतल्याचे स्पष्ट होते. अशा प्रकारे संवेष्टन, नामांकन व वितरण हे एखाद्या स्वतंत्र अशा व्यावसायिक संघटनेद्वारे करून घेतल्या जाते व त्याचा अंतर्भाव सेवाक्षेत्रात केला जातो. उद्योगातील भरण पोषण व संरक्षण या सेवांच्याबाबतीत अन्य संस्थांशी करार केला जातो व या कार्याचा समावेश देखील सेवाक्षेत्रात केला जातो. अशा प्रकारचे दृश्य अर्थव्यवस्थेत सामान्य स्वरूपात दिसून येते. असे असले तरी क्षेत्राच्या संदर्भात यांचे स्थान द्वितीय क्षेत्रातील किंवा तृतीय क्षेत्रातील आहे हे स्पष्ट करणे शक्य होत नाही. अशा स्थितीत निर्माण व सेवाक्षेत्रातील स्थानांच्या संदर्भात विचार केल्यास सेवा क्षेत्रातील वाटा वाढतो. अशा प्रकारे वास्तविक स्वरूपातील सेवा क्षेत्रातील वाढ परिणामतः द्वितीय क्षेत्रातील एकूणच क्रिया प्रक्रियेत विस्तार घडून आणते व त्यामुळे मागणीत देखील वाढ घडवून आणली जाते हे नाकारता येत नाही.

कमी अधिक प्रमाणात यावर वाद घडवून आणला जातो ज्यामधे तुलनात्मक दृष्ट्या सेवाक्षेत्रात वाढ प्रामुख्याने समाज व वैयक्तिक सेवा व संदेशवहन, वित्त व विमा प्रथमतः यामधील वेतनवाढ, कामगार क्षतीपूर्ती सर्व भ्रामक आहे की ज्याचा कोणताही योग्य लेखा मंदीसाठी उपलब्ध होत नाही. (भट्टाचार्य व मित्रा १९९०) याचे कारण म्हणजे पाचवा वेतन आयोग होय. (आचार्य २००३) हे सर्वज्ञात आहे की सेवाक्षेत्रातील प्रदान हे प्रामुख्याने सेवकाच्या क्षतीभरपाईवर अवलंबून असते. ही वाढ रोजगारातील वाढीशिवाय असेल व सकल घरेलू उत्पादनात वास्तविक उत्पादनाद्वारे वाढ झालेली असले. वास्तविकता ही आहे की सकल घरेलू उत्पादनातील सेवाक्षेत्रातील वाढ ही अधिक झालेली दिसून येते व रोजगारातील वाढ विश्वसनीयरित्या बदललेली दृष्टीक्षेपात येते.

पर्यायी दृश्यातून हे स्पष्ट होते की, सेवाक्षेत्रातील तुलनात्मक वाढ द्वितीयक्षेत्रापेक्षा भिन्न नाही. (दत्ता १९८९) याठिकाणी स्पष्ट केले जाते की सेवा क्षेत्रातील योग्य वाढ उत्पादकाद्वारे मागणीला प्रेरीत करण्यासाठी व त्यामुळे उत्पादनात वाढ करण्यासाठी व त्यातून पुन्हा सेवेची मागणी वाढविण्यासाठी मुख्यतः व्यापार, वाहतूक, संदेशवहन अधिकोष व विमा या होय. जर ह्या साह्यक क्षेत्रातून प्रदानाची निर्मिती झाली तर यातून पुन्हा वस्तूच्या क्षेत्रातील मागणी, त्यामधील अंतर्भाव, सेवाक्षेत्राशिवाय असणार नाही. १९८० च्या विश्लेषणात ह्या प्रकारचे विश्लेषण आढळून येत नाही. १९७८-७९ मधे सेवेसाठी असलेली मध्य मागणी ४१% वरून ३८% इतकी १९८९-९० मधे कमी झालेली दिसून येते. तेव्हा अंतिम मागणी ही ५९% वरून ६२% पर्यंत वाढली. (सतीशकुमार व माथुर १९९६) अन्य कोणत्याही बाबतीत क्षेत्राच्या विभाजनात पूर्ण वर्गीकरण केल्यास सेवाक्षेत्रातील वाढ दर्शविते. त्याद्वारे वाढ झालेली नाही हे स्पष्ट होत नाही.

अधिक वेगाने विकास याचे वास्तविक विश्लेषण व म्हणून सेवाक्षेत्राची वाढ मागणीतील वाढ स्पष्ट करते. देशांतर्गत व निर्यात व याला पूरक म्हणून तंत्रज्ञानातील बदल व संस्थागत व्यवस्था यामुळे मागणीतील बदल दिसतो. यापेक्षा मागणीतील बदलाचे अधिक विश्लेषण करता येणार नाही. भारतीय विकासाच्या संदर्भात परिक्षण करण्यासाठी विकसीत देशातील अनेक अशा ऐतिहासिक गृहिताचा उपयोग निरर्थक ठरलेला दिसून येतो. विकसनशील देशाच्या बाबतीत मात्र यात सत्यता पडताळून पाहता येते.

Scanned by CamScanner

**प्रश्न व संबंध**

सेवाक्षेत्रातील विकास व वाढ व राष्ट्रीय उत्पादनातील वाढीची प्रवृत्ती ही मोठ्या प्रमाणात वास्तविक स्वरूपात स्थैर्यता व विकासातील वाढीची प्रवृत्ती अशा प्रकारचे प्रश्न जे पूर्वी निर्माण झाले होते. (उदा. भट्टाचार्य व मिश्रा १९९०, सिंग २००५, व भल्ला २००४) परंतु कदाचित हेच पुन्हा याठिकाणी विचारल्यासारखे होईल. माझ्या दृष्टिकोनातून स्थैर्यासह आर्थिक विकास साधणे फार मोठे कार्य आहे असे म्हणता येणार नाही. परंतु असे नसले तरी या संबंधात विकसीत होत असलेल्या समष्टी अर्थशास्त्रीय स्थिरता व समानतेच्या संदर्भातील हे महत्त्वपूर्ण होय. प्रथमत: प्रश्न समष्टी अर्थशास्त्राच्या संतुलनातील होय. वर्तमान स्थितीत निर्माण होणाऱ्या स्पर्धीय उत्पादन जे उपभोग्य मागणीच्यासंदर्भातील असेल काय? भारतीय उपभोक्त्याची अधिक मागणीही वस्तू करीता असते तर फार कमी मागणी ही सेवेसाठी केली जाते. राष्ट्रीय नमूना पाहणीनुसार उपभोगावरील व्यय हा ग्रामीण भागातील ८५% इतका आहे तर नागरी विभागात तो ७४% इतका आहे. तो अन्न व निर्माण वस्तुंच्या संदर्भात दिसून येतो. सेवाक्षेत्राच्या बाबतीत केवळ १५% आहे जो १९९९-२००० पर्यंत २६% इतका झालेला आढळून येतो. उत्पादनातील संरचनेमधे ५१% व ४९% प्राथमिक वस्तूंच्या बाबतीत जे मागणी स्वरूपातील बाह्य असलेले होय. या संदर्भात सेवेकरीता उत्पन्नाच्या मागणीची लवचिकता ही अधिक जास्त आहे. परंतू भारतीय दरडोई उत्पन्नानुसार वस्तूकरीता असलेली उत्पन्नाच्या मागणीची लवचिकता विशेषत: औद्योगिक वस्तूंच्या बाबतीत अधिक आहे. निर्माण क्षेत्रातील वस्तूंसाठी मागणीची उत्पन्न लवचिकता ही १.०२ इतकी ग्रामीण भागात तर १.०५ इतकी नागरी कुटुंबात दिसून येते. सेवेच्या संदर्भातील हे प्रमाण पूर्वापेक्षा जास्त असलेले म्हणजे १.७ व १.६ इतके दिसून येते. परिणामत: औद्योगिक वस्तूंकरीता असलेली मागणी ही देखील सेवा क्षेत्रात बदल झाल्यामुळे वाढली. द्वितीय क्षेत्रातील उत्पादन हे सकल राष्ट्रीय उत्पदनात २५% एवढे आहे. त्यात निर्माण क्षेत्राचा वाटा १५% एवढा आहे. ज्यामुळे निश्चित अशा नवीन मागणीत भर पडते. या संदर्भात एक अट अशी दिसून येते की जी मागणीतील रचना व अर्थातच उत्पादनातील व उत्पन्न वितरणातील विषमता यामुळे लोकसंख्याचा फार मोठा भाग कमी उत्पन्न धारण करणारा असतो ज्यामुळे द्वितीय क्षेत्रातील वस्तूंकरीता त्याची मागणी कमी राहते. लोकसंख्येचा काही भाग हा अतिरिक्त उत्पन्न धारण करतो ज्यामुळे त्याची सेवेकरीत असलेली मागणी जास्त असते तर औद्योगिक वस्तूकरीत कमी, कृषी किंवा औद्योगिक होय. अर्थातच वर्तमान स्थितीतील क्षेत्रीय रचना हे स्पष्ट करते की, उत्पन्न वितरणातील विषमता पुढील प्रभाव हा आर्थिक, सामाजिक दृष्ट्या परिणामकारक ठरेल.

यातूनच हेच ध्वनीत होते की समग्र अर्थशास्त्रातील असंतुलन हे उत्पादन व उपभोग यातील होय व स्थैर्यासह आर्थिक विकासाच्या बाबतीत हेच स्पष्ट होईल. परंतु वैश्वीकरणाच्या अर्थव्यवस्थेत असे स्पष्ट केले जाते जाते की, समग्र अर्थव्यवस्थेतील संतुलन देशी उपभोग व देशी उत्पादनामुळे शक्य होणार नाही. जरी व्यापारात वाढ घडून आणण्यासाठी व तशी खात्री करून घेतला तरी संतुलन शक्य होणार नाही. सध्या भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात असे दृश्य निर्माण केले जात आहे की सेवेचे भारतातून निर्यात होत आहे व वस्तूंची आयात होत आहे.



Scanned by CamScanner

दुसऱ्या प्रश्नाच्या संदर्भात हे स्पष्ट होत आहे की, 'निर्यात सेवा व आयात वस्तू' ज्यांचा प्रभाव आहे असे प्रारूप होय. यात शंका घेण्याचे कारण नाही. अलिकडील काळात निर्यात सेवेत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे असे असले तरी सेवेचा फार मोठा भाग निर्यात होत आहे. परंतु अलिकडील काळात असे दिसून येत आहे की, सेवेचा निर्यातीत असलेला हिस्सा वाढत आहे, ज्यात शिक्षण, आरोग्य, विधी सेवा, प्रक्रीया व्यवसाय जे पूर्वीच्या काळात गैरव्यापारी सेवा म्हणून ओळखल्या जात होत्या त्या आज व्यापारी सेवा म्हणून त्यांचा अंतर्भाव होत आहे. भारतात अशा प्रकारच्या सेवा निर्माण करण्याची क्षमता असेलतर भारताची प्रत्यक्ष निर्यात ही चालू तुलनात्मक लाभप्रद बाबींवर व अन्य देश स्पर्धेत उतरण्यापूर्वीच्या स्थितीत जास्त राहू शकेल. वस्तूंमधील अंतराळ याचा अतिरिक्त उपभोगाचे उत्पादनाशी संबंध होय. उपभोगातील सेवेचे प्रमाण कमी झाले असले तरी सेवेची निर्यात ही भविष्यात तीव्र गतीने वाढेल आणि कमी झालेल्या सेवांच्या प्रमाणाची क्षतीपूर्ती होईल.

तिसरा प्रश्न रोजगाराचा होय. सकल राष्ट्रीय उत्पादनातील सेवेचे प्रमाण तीव्र गतीने रोजगाराच्या तुलनेत वाढलेले दिसते. २००२ मधे ५१% सेवाक्षेत्रांच्या तुलनेत २२% रोजगार होता. यावरून हे स्पष्ट होते की सेवाक्षेत्रातून जेवढा रोजगार निर्माण व्हायला पहिजे होता तेवढ्या प्रमाणात तो होऊ शकला नाही. प्रदानातील ८% वाढ तर सेवा क्षेत्रातील रोजगारात ३% वाढ झालेली दिसून येते. ही वाढ १९९४-२००० या कालखंडातील आहे. या कालावधीतील रोजगाराची लवचिकता ०.३५ इतकी होती. विकासाचा दर व लवचिकता यांचे प्रमाण समग्र आर्थिक स्थितीत जास्त आढळते. परंतु यासंदर्भात समग्र विश्लेषणाची आकडेवारी ही चिंतेची बाब आहे. कृषीमधे बदल घडून आल्यामुळे या क्षेत्रातील रोजगार संरचनेत देखील बदल व रोजगारात वाढ घडून येणे शक्य झाले नाही. द्वितीय क्षेत्रातील विकास व रोजगाराची स्थिती या तुलनेत चांगली आहे. २.५% एवढा या क्षेत्रात रोजगार दिसून येतो तर सकल घरेलू उत्पादनात वाटा केवळ ६.५% इतका आढळतो. या क्षेत्रातील रोजगारीची लवचिकता ०.३८ इतकी दिसते. निर्माण क्षेत्रातील रोजगार विकासाचा दर हा २.६% इतका आहे. परंतु असेही दिसून येते की, सेवाक्षेत्रातील रोजगारीची लवचिकता ही १९८८-९४ या कालाबधीत ०.६२ वरून ०.३५ इतकी कमी झाली. तर १९९९-२००० या कालावधीत द्वितीय क्षेत्रातील रोजगार दरातील लवचिकता ०.२३ वरून ०.३७ एवढी बदललेली दिसून येते. दुसऱ्या शब्दात सेवा क्षेत्रातील अलिकडील काळात रोजगारीची तीव्रता कमीच झाली नाही तर त्यात तीव्रतेने घट झाली. श्रमप्रधान निर्माण उद्योगात तुलनात्मक व्यापाराचा फायदा प्राप्त होत असल्याने त्यामधील तयार होणाऱ्या वस्तुंची निर्यात मोठ्या प्रमाणावर केली जाते. परिणामतः या क्षेत्रात रोजगारात वाढ झालेली दिसून येते. १९९० च्या काळात निर्यात निर्माण उद्योगातील रोजगार ३.८% इतका होता तर रोजगार लवचिकता ०.४८ इतकी होती (गोल्डर २००३, घोष २००४)

चौथे आणि शेवटचे म्हणजे उत्पन्नातील विषमता ही वर्तमान काळातील प्रदानाच्या पद्धती व रोजगारातील ध्वनित संदर्भ स्पष्ट करतो. जी आधीच वर्णन केली आहे. ज्यात विविध क्षेत्राच्या सकल राष्ट्रीय उत्पादनातील वाटा, रोजगारीतील वाटा जे खऱ्या अशा संभाव्यतेवर स्पष्ट होते की, विविध क्षेत्रातील उत्पन्न वाढीतील विषमता जी समूह व व्यक्तींमधे आढळून येते. कृषीचा सकल राष्ट्रीय उत्पादनातील कमी

Scanned by CamScanner

झालेला वाटा परंतु रोजगाराच्या प्रमाणातील बदलाचा अभाव, कृषी व गैर कृषी, काम करणाऱ्या कामगाराच्या उत्पन्नातील तफावत ही अधिक तीव्र गतीने वाढत आहे. सकल राष्ट्रीय उत्पादनातील ५०% वाटा व ७४% रोजगारातील वाटा यांचे प्रमाण काढल्यास ते १९६० मधे १:३ होते. परंतु आता ६०% कामगार व कृषी उत्पादनाचा प्राथमिक क्षेत्रातील २१% वाटा जे सामान्यत:१:६ इतके आहे. सेवाक्षेत्राच्या वाट्यात होणारी वाढ, त्यामुळे हे अंतर भविष्यात वाढेल जो पर्यंत सेवाक्षेत्राच्या रोजगारात वाढ होणार नाही, तो पर्यंत रोजगाराच्या रचनेत ध्रुवीकरण घडून येथील हे ध्रुवीकरण प्रामुख्याने काही अतीमहत्त्वाच्या कंपनी व कंपनी संलग्नीत क्षेत्रात व दुसरे संख्येने अधिक असलेल्यांच्या क्षेत्रात ज्यांची कमी उत्पादकता कमी उत्पन्न, हे प्रामुख्याने असंघटित क्षेत्रात आढळून येते. सेवाक्षेत्रातील विशेषत: या क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांच्या उत्पादकतेतील भिन्नता ही मोठ्या प्रमाणावर आढळून येते. यात काही रोजगार जे उच्च तंत्रज्ञानाच्या पातळीशी संबंधीत असतात व त्यांना मिळणारे उत्पन्न देखील फार जास्त असते, याशिवाय अन्य लाभही त्यांना प्राप्त होतो. दुसऱ्या बाजूने जे श्रमिक संख्येने अधिक आहेत पण त्यांना मिळणारा रोजगार कमी आहे. अधिक गतीने विकसीत होणारे साह्यक सेवाक्षेत्र उदा. माहिती तंत्रज्ञान हे यावरून ते अधिक स्पष्ट होते. गतीमान सेवाक्षेत्र जे स्थानिक दृष्ट्या काही राज्यात केंद्रीत झाले आहे. त्याच बरोबर काही शहरांमधे झालेले आढळते. त्यामुळे नवीन विकासाचा दर पृथक झाल्याचे आढळते. प्रदेशांतर्गत तफावत वाढत्या विकासाबरोबर वाढत आहे व त्याच बरोबर विकासाचा स्तर देखील वाढत आहे.

या सर्व विविध बाबींचा उहापोह केवळ विविध क्षेत्रातील विकास व त्यातही सेवाक्षेत्रातील बदल व विकास जो प्रामुख्याने भारतीय अर्थव्यवस्थेच्या संक्रमणाला जबाबदार आहे, ज्याद्वारे विकासाच्या निम्नदरापासून तर विकासाच्या उच्चदरापर्यंत नेण्याचे कार्य मागील दोन दशकात सेवा क्षेत्राद्वारे घडून आलेले दिसते. यात द्वितीय क्षेत्रातील बदलही मोठ्या प्रमाणात अपेक्षित होता. मात्र तुलनात्मक दृष्ट्या त्यामधील निर्माणक्षेत्र सोडल्यास चीनच्या तुलनेत भारतातील द्वितीय क्षेत्र अजूनही पूर्णपणे विकसीत झाले आहे असे दिसत नाही. भारतातील विकसीत प्रारूप हे आज ऐतिहासिक व समकालीन प्रारूपापेक्षा वेगळा व भिन्न आहे जो विकासाच्या अनुभवावरून पडताळून पाहता येतो.

वेगवेगळ्या दृष्टिकोनातून समष्टी अर्थशास्त्रीय व स्थैर्यासह विकास यांचे परीक्षण करणे व त्याचे वितरणातील परिणाम पाहणे या संदर्भात अभ्यास करणे गरजेचे झाले आहे. प्रथमदर्शनी आपणा असे दिसून येते की भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास हा त्याच्या विविध क्षेत्रातील विवेकी व संतुलित वाट्यामुळे होईल जो सध्याच्या विकास प्रक्रियेच्या व्यवस्थेतून दिसून येत आहे. कृषीच्या क्षेत्रातील बृहद विकास जरी मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करू शकला नाही, तरी उत्पादनातील स्तरवाढविण्याच्या दृष्टिकोनातून व लोकांना कार्यरत ठेवण्याच्या दृष्टिने या क्षेत्राचे स्थान महत्त्वाचे होय. परंतु उद्योग क्षेत्राच्या बाबतीत मुख्यत: निर्माण क्षेत्राचा आर्थिक विकास संतुलनाकरीता जलद गतीने होणे याशिवाय वाढती मागणी व वस्तुंचा पुरवठा, किमतीतील स्थिरता व व्यापारातील संतुलन याकरीता आवश्यक आहे. आणि वरील संदर्भात सर्व क्षेत्रांचा जलद विकास घडवून आणणे रोजगार निर्मितीच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. तुलनात्मक लाभप्रदतेच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास भारताला श्रमप्रधान निर्माण कार्याला चालना देऊन त्यांचा

Scanned by CamScanner

विकास करणे महत्त्वाचे ठरेल. ज्यामुळे निर्यातीत वाढ होऊन व्यापारातील संतुलन निर्माण करणे शक्य होईल व त्याचबरोबर देशात रोजगारात विस्तार होईल. म्हणून प्रत्येक दृष्टिकोनातून आपणाला असे म्हणता येईल की, निर्माणीचे क्षेत्र हे भविष्यात भारतातील आर्थिक विकासच्या रचनेत मोठे योगदान देणारा घटक ठरेल. जागतिकीकरणात मोठ्याप्रमाणावरील तंत्रज्ञांनातील क्रांतीकारक बदल व बृहतप्रमाणावरील व्यापाराची संभाव्यता नाकारता येणे शक्य नाही तरी पणे वास्तविक दृष्टिकोनातून हे अपेक्षित नाही की भारत औद्योगिकरणाशिवाय भविष्यात उद्योगांनतरचा भारतीय समाज ही भारताची ओळख असेल.

References -


१) WTO, Structure functions takes challenges-Kumar Ratnesh

२) भारतीय अर्थव्यवस्था - रूद्रत्त के.पी. एम. सुंदरम

३) Economics of development and palnning -R.C. Agrawal

४) India-Unbound-G. Das

५) Globalisation Technology and Trade in the 21st Century-part I +II-Hans Singer, Hatti, Tondon.

६) Emerging structure of Indian Economy Implication of Granting intersectaral embalances-T.S. Papala-Presidential Lecture delivered at the Indian Economic Association, Growing 88th Annual conference Vishakhapattanam.

७) India-2006

८) Being Indian-Pawan Verma.


तक्ता क्र. १

काही निवडक राष्ट्रातील क्षेत्रीय उत्पादन व रोजगार यांचे प्रमाण (२००२)

| देश | उत्पन्नातील % प्रमाण | | | रोजगारातील % प्रमाण | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कृषी | उद्योग | सेवा | कृषी | उद्योग | सेवा |
| यु.के. | ०१ | २६ | ७३ | १ | २५ | ७४ |
| यु.एस.ए. | ०२ | २३ | ७५ | २ | २४ | ७४ |
| फ्रान्स | ०२ | २२ | ७६ | ३ | २५ | ७२ |
| जपान | ०१ | ३१ | ६८ | ५ | ३१ | ६४ |
| जर्मनी | ०१ | ३० | ६९ | ३ | ३३ | ६४ |
| इटली | ०३ | २९ | ६९ | ५ | ३२ | ६३ |
| आस्ट्रेलिया | ०४ | २६ | ६९ | ५ | २१ | ७४ |



Scanned by CamScanner

तक्ता क्र. २

काही निवडक एशिया राष्ट्रातील सकल राष्ट्रीय उत्पादन क्षेत्रनिहाय वाटा (१९६०-२००२)

| देश | प्राथमिक क्षेत्र | द्वितीय क्षेत्र | सेवाक्षेत्र |
|---|---|---|---|
| | १९६०-२००२ | १९६०-२००२ | १९६०-२००२ |
| चीन | ३०-१५ | ४९-५१ | २१-३४ |
| इंडोनेशिया | ५०-१८ | २५-४५ | २५-३८ |
| थायलंड | ४०-०९ | १९-४३ | ४१-४८ |
| फिलीपीन्स | २६-१९ | २८-३३ | ४६-५३ |
| मलेशिया | ३६-०९ | १८-४७ | ४६-४४ |
| गणराज्यकोरीया | ३७-०४ | २०-४१ | ४३-५५ |
| पाकिस्तान | ४६-२३ | १६-२३ | ३८-५४ |
| भारत | ५५-०४ | १६-२५ | २९-५१ |

तक्ता क्र. ३

सेवा क्षेत्रातील घरेलू उत्पादन व रोजगार

| देश | सकल घरेलू उत्पादन | रोजगार |
|---|---|---|
| चीन | ३४ | ३१ |
| इंडोनेशिया | ३८ | ३९ |
| थायलंड | ४८ | ३३ |
| फिलीपीन्स | ५३ | ४७ |
| मलेशिया | ४४ | ५० |
| गणराज्य कोरीया | ५५ | ६२ |
| पाकिस्तान | ५४ | ३४ |
| भारत | ५१ | २२ |

✦✦✦

Scanned by CamScanner

# महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या एक आव्हान

डॉ. बी.बी. कालपांडे
जी.एस. कॉलेज
नागपूर.

राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत शेतीचे स्थान अतिशय महत्वपुर्ण असते. वाढत्या आर्थिक शेतीवरील लोकसंख्येचे अवलंबित्व कमी होत जाते हे जरी खरे असले तरी हि अवस्था साध्य करण्यासाठी शेतीच्या क्षेत्राची मदत मोलाची ठरते. जपान सारख्या विकसित झालेल्या देशात सुद्धा शेतीने विकास प्रक्रियेला हातभार लावला आहे. शेतीचा व्यवसाय हा असा व्यवसाय आहे की, त्यावर अनेक घटकांचा प्रभाव पडतो. यामध्ये भौतिक, आर्थिक, सामाजिक जीवनविषयक घटकांचा उल्लेख करता येईल. व तो करतांना अनेक संबंध निर्माण होतात.

जागतिक लोकसंख्येचा विचार करता अद्यापही जगातील बहूसंख्य लोक आपल्या उपजिविकेसाठी शेतीवर अवलंबून आहेत. मानवाची मुख्य गरज ''अन्न''.

अन्न- धान्याची प्राथमिक गरज हेच क्षेत्र पूर्ण करते आणि अनेक उद्योग-व्यवसायांना कच्चा माल पूरविण्याचे काम शेतीतूनच होते. भारताने १९५१ मध्ये आर्थिक नियोजनाचा स्विकार केला . या ५७ वर्षाच्या विकासाच्या काळात अनेक बदल घडून आलेत. तरीही शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा झाल्याचे दिसून येत नाही.

भारतासारख्या कृषीप्रधान देशाचीच शेती आज अभूतपूर्व संकटात सापडली आहे अशी जाहिर कबूली पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी दिली आहे. वृत्तपत्रांच्या माध्यमातून पंतप्रधानांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्येला कारणीभूत असलेल्या बाबींचे अगदी काटेकोर परिक्षण केले आहे. वास्तव चित्रच त्यांनी स्पष्ट केले आहे. जसे एकिकडे आधूनिक तंत्रज्ञान, सिंचन सुविधा, बाजारपेठा इत्यादी शेतीचा कायापालट झाल्याचे आपण चित्र रंगवित असलो तरी दुसऱ्या बाजुने स्पष्ट होणारे चित्र दुर्लक्षित करुन चालणार नाही हे कटू सत्य आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे. अन्यथा शेतीमालाच्या निर्यातीचे आकडे सांगून मूख्य आकार लपविण्यातच धन्यता मानली जाईल अशी शंका व्यक्त केली.

नापिकी/दुष्काळ, कर्जबाजारीपणा, सिंचनाचा अभाव, बाजारपेठेचा अभाव इत्यादी परिस्थितीमुळे महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटकासह ६ राज्यात ४ हजाराहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या.

महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या का करीत आहेत हे खरोखरीच एक समाजापूढे, राज्यकर्त्यांपुढे आणि संशोधन कर्त्यांपूढे, मोठे अनुत्तरीत आव्हान आहे. कारण शेतकऱ्यांची मानसीक स्थिती अशी झाली आहे की, शासकीय स्तरावरुन मदत मिळते म्हणून आत्महत्या या शस्त्राकडे शेतकरी बघतो आहे. राज्य कर्त्यांना अस वाटते की, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या दृष्टीकोनातून आपल्याला राजकीय परिवर्तन घडवून आणता येते. तर शासनाला असं वाटते की, त्या शेतकरी कुटुंबप्रमुखाने आत्महत्या केली आहे. त्यांना जर आर्थिक मदत मिळाली त्यांच्या कुटूंबाचे सांत्वन केले तर शेतकरी व समाज या दोघांचा सरकारकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलेल. संशोधन कर्त्यांना अस वाटतं की, आम्ही शेतकऱ्यांना आत्महत्येच्या प्रश्नावर संशोधन केले तर आमची पाठ थोपटल्या जाईल.



Scanned by CamScanner

अशाप्रकारे प्रत्येक घटक शेतकऱ्यांच्या आत्महत्येकडे पाहतो.

अनायास, शेतकऱ्यांच्या आत्महत्या बाबत व्यवस्थापन शास्त्रातील एका लघू कथेचे स्मरण होते. या कथेमध्ये आंधळया लोकांची एक परिषद भरते. या परिषदेमध्ये एका हत्तीला सोडले जाते आणि प्रत्येक आंधळ्या व्यक्तीला सांगण्यात येते की, या घटकाला तुम्ही हात लावा आणि ओळखा ज्या आंधळ्या व्यक्तीच्या हाताला त्या हत्तीचे शेपूट लागते ते म्हणतात की सर्प आहे. ज्यांना त्याचे पाय लागतात ते म्हणतात कि मिनार आहे. ज्यांना त्याचे कान लागतात की सर्प आहे. ज्यांना त्याचे कान लागतात ते म्हणतात सूप आहे. ज्यांना त्याचे शरीर लागते ते म्हणतात मशक आहे. अशाप्रकारे त्या अंध लोकांचे वेगवेगळे निवेदन राहते. नेमके शेतकऱ्यांच्या आत्महत्यांकडे पाहण्याचा प्रत्येक घटकाचा दृष्टीकोन असाच दिसून येतो.

महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येपैकी ७०% ते ८०% लोकसंख्या शेती आणि शेती संबंधीत उद्योग व्यवसायात गुंतली आहे. शेतीची उत्पादकता जशी निसर्गावर अवलंबून असते तशीच ती शेतकऱ्यांच्या प्रवृत्तीवर देखील अवलंबून असते. शेतकऱ्यांच्या आत्महत्तेच्या संदर्भात विचार केल्यास असे लक्षात येते की, शेतकऱ्यांच्या आळशी प्रवृत्तीमुळे शेतकरी कर्जबाजारी होत आहेत. शेतकरी कुटुंबे ढोर मेहनत करतात पण दोन घासापुरती पूढचे नियोजन नाही. अर्थात, ज्यांनी आपल्या कष्टाचं, पैशाचं कामाचं व्यवस्थित नियोजन केले ते सूखीच आहेत.

ग्रामीण भागात अवैध सावकारी हा व्यवसाय तेजीत चालतो म्हणून अर्थव्यवस्थीय दृष्टया याला आपण तेजीची बाजारपेठ असे संबोधू. ग्रामीण भागातील जवळपास ७० ते ८०% (एकूण शेतकऱ्यांपैकी) शेतकरी कर्जे घेतात. या कर्जाच्या सौदयांच्या मोबदल्यात आपल्या शेत जमिनीच्या इसार पावत्या लिहून देतात. काही काही शेतकरी तर कोऱ्या स्टँप पेपरवर सहया करुन देतात. साक्षीदार सुद्धा आपल्या सहया नोंदवतात. हे दाम-दूपटीचे कर्जे जेंव्हा शेतकरी फेडू शकत नाही अशावेळी अवैध सावकार व त्याचे गूंड या माध्यमातून कर्जे वसूल करण्याचा प्रयत्न करतात. जर शेतकरी कर्जेच फेडू शकत नसेल तर त्याच्या शेत-जमीनी हडपण्याचा सावकार प्रयत्न करतात आणि त्यामूळे शेतकऱ्याला असे वाटते की, आपण आपल्या मुलाची भाकर गमवत आहोत. अशावेळी शेतकरी हतबल होतो. मनाने खचतो आणि आत्महत्या करतो. अशी एकंदर दयनावस्था शेतकऱ्यांची दिसून येते.

बऱ्याच वेळी, शेतकऱ्यांनी अवैध सावकारांविरुद्ध पोलीस स्टेशनला तक्रारी नोंदविलेल्या असतात तरी देखील पोलिसांचे हात ओले होत असल्यामूळे ते देखील अवैध सावकाराला दम घालीत नाही. पून्हा शेतकरी कुटुंब खचते आणि आत्महत्येकरीता प्रवृत्त होते. अशा सत्य घटना शेतकऱ्यांच्या आत्महत्ये संदर्भात दिसून येतात.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय तसेच शेतीच्या आकारमानाचा विचार करुन शेत-जमिनीची वर्गवारी अशी

| वर्गवारी | | आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या |
|---|---|---|
| भूमिहिन ते १ एकर शेत - जमीन | - | २३ |
| १ एकर ते २ एकर शेत - जमीन | - | ८६ |
| २ एकर ते ३.७५ एकर शेत - जमीन | - | २१३ |
| ३.७५ एकर ते ६.२५ एकर शेत जमीन | - | २१८ |
| इतर मागासवर्गीय शेतकरी (ओ.बी.सी.) | - | ५२१ |
| भटक्या विमुक्त जाती-जमाती | - | १७७ |

Scanned by CamScanner

अनूसूचित जमाती - १२६

खूल्या प्रवर्गातील जाती - ११५

गेल्या ५-६ वर्षाचा इतिहास बघितल्यास जवळपास विदर्भातील ७,७००० हून अधिक शेतकऱ्यांनी आजवर आत्महत्या केल्यात एवढा सगळा तळतळात महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात दिसून येतो.

विदर्भातील एकून ११ जिल्हयात ९०२ शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणामूळे आपली जिवनयात्रा संपविली या आत्महत्येची दखल घेत शेतकरी कुटुंबाचे अश्रू पूसण्यासाठी मा. डॉ. मनमोहन सिंग, पंतप्रधान भारत सरकार, यांनी दौरा करुन परिस्थितीचा अभ्यास केला. आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटूंबाचे अश्रू पुसलेत. त्यासाठी आर्थिक मदतीचे ३,७५० कोटी रुपयाचे पॅकेज जाहिर केले तरीही शेतकरी आत्महत्या करीत आहेत असे दिसते. वास्तविकता: मा. पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या सुद्धा लक्षात आली असेलच यात शंका नाही.

**विदर्भात एकूण ११ जिल्हयातील आत्महत्या :**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अमरावती | - | १७० | चंद्रपूर | - | ३४ |
| अकोला | - | १०२ | गडचिरोली | - | ०९ |
| वाशिम | - | १०१ | भंडारा | - | २४ |
| बुलढाणा | - | १०८ | गोंदिया | - | १५ |
| नागपूर | - | २९ | यवतमाळ | - | २३८ |

अशाप्रकारे महाराष्ट्रातील तीन महसूल विभागापैकी. अमरावती या महसूल विभागात सर्वात जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे आढळून येते. यामध्ये अमरावती विभागात ७२% औरंगाबाद विभागात ११% तर नागपूर विभागात ९% शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वेगवेगळया प्रसिद्ध झालेल्या वृत्त पत्रामधून दिसून येते. या शेतकऱ्यांनी आत्महत्या का केल्यात तर कर्जबाजारीपणा हे तर प्रमुख कारण आहेच पण त्याहीपेक्षा शासनाने दिलेली मदतीची आर्थिक कुबडी हेच वैफल्य ग्रस्तांचे मनोशास्त्र आहे हे संशोधक या नात्याने लक्षात येते.

महाराष्ट्र राज्यात आर्थिक घसरणीमुळे ७४% शेतकऱ्यांनी आपली जिवनयात्रा संपविली. महाराष्ट्रात कर्जबाजारीपणा मूळे झालेल्या आत्महत्यांची वर्गवारी

| | | |
|---|---|---|
| आर्थिक घसरणा | - | ७४% |
| कौटुंबिक कलह | - | ५५% |
| नापीकी | - | ४१% |
| सामाजिक दर्जाला धक्का | - | ३६% |
| मुली आणि बहिणीचे लग्न | - | ३४% |
| व्यसनाधिनता | - | २८% |
| आरोग्य | - | २१% |

आर्थिक घसरणीमुळे बऱ्याच शेतकरी कुटुंबाने आपली जीवनयात्रा संपविली याचे प्रमुख कारण म्हणजे पुर्वीच्या शेतकरी कुटुंबाच्या तूलनेत सध्याचा शेतकरी हा भोगवादी प्रवृत्तीचा दिसून येतो. पूर्वी खेडयांचा संबंध फारसा शहराशी येत नव्हता. जनता अशिक्षित होती. आज गावखेडयांचा संपर्क शहरांशी येतो. आमदार व खासदारांशी येतो, जि. प. सदस्यांशी येतो. प्रत्येक नविन शेतकऱ्याला असं वाटते की, आपल्या जवळ सुद्धा मोटरबाईक असावी, आर्थिक चंगळ करता यावी. इकडे शेती उत्पादकता कमी त्यामूळे आर्थिक विवंचना या व इत्यादी भोगवादी प्रवृत्ती शेतकऱ्यांच्या बाबतीत दिसते.



Scanned by CamScanner

भोगवादी प्रवृत्ती म्हणजे एकदा कर्ज घ्यायच त्यातून सणवार, लग्न इत्यादी समाजिक कार्य करायचं उरलेल्या पैश्यात घरखर्च करायचा पण प्रत्यक्ष कर्ज ज्या कारणांसाठी घेतल अस दाखवल्या गेल त्यावरच ते खर्च केल्या गेल अस नाही. कर्ज घेण त्याचा उपभोग भलत्या गोष्टींसाठी होणे आणि पैसा जवळ आल्यावर तो भरतांना दिरंगाई करणे, मग कर्जाचा डोंगर वाढतोच आहे. थोडीशी बेफीकीर प्रवृत्ती हि कर्जबाजारीपणाला कारणीभूत आहे. कर्ज उत्पादन कार्यासाठी घेतलं त्यावरच ते खर्च केल आणि पैसा हाती येताच जेवढा देता येईल तेवढा देऊन बोजा कमी करणे हे धोरण अवलंबविल्यास बऱ्याच अंशी कर्जबाजारीपणाला आळा बसेल.

शेतकऱ्यांच्या दुरावस्थेची कारणे शोधण्यासाठी स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली कृषी आयोगाने दौरा करुन नियोजन आयोगाच्या प्रधान सल्लागार आदर्श मिश्रा यांच्या अध्यक्षतेखाली एका चमूने शेतकऱ्यांच्या भेटी घेवून आत्महत्येची कारणे शोधण्याचा प्रयत्न केला. या दोन्ही समित्यांनी आपला अहवाल केंद्र सरकारला सादर केल्यानंतर मा. पंतप्रधानांनी १ हजार ७५ कोटी रु. चे पॅकेज जाहिर केले. टाटा इन्स्टीटयूट ऑफ सोशल सायन्स : इंदिरा गांधी संशोधन संस्था आणि संघटनांकडून मिळालेल्या अहवालाच्या आधारावर उपाय सूचविण्यात आले. तरीही शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबलेल्या नाहीत हेच एक आव्हान आहे. आणि या आव्हानाचा शोध शासनाने सत्य संशोधन तंत्राचा वापर करुन घ्यावा.

साधारणत: विदर्भातील नैसर्गिक हवामान, शेतजमीन पाणीपुरवठा; शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती, शेती विषयज्ञान, इत्यादी बाबींचा विचार करुन शासनाने कठोर अंमलबजावणी करुन नवीन योजना व तंत्रज्ञान उद्योगधंदे व व्यवसाय शेतकऱ्यांच्या मदतीला पोहचवावेत. शासनाने शेतकऱ्यांना कुठलीही मदत देण्यापेक्षा किंवा पॅकेज जाहिर करण्यापेक्षा उपाय अंमलात आणावेत असे झाले तरच आत्महत्येचे प्रमाण कमी होईल.

बुश प्रशासन, भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा विचार व काळजी करु शकते. तर भारत देश तर शेतकऱ्यांचा कृषीप्रधान देश आहे. या देशात अत्यंत प्रगत असे तंत्रज्ञान अस्थित्वात आहे. तंत्रज्ञान व यंत्रज्ञ आहेत, कृषीसंशोधक आहेत. मग त्यांनीच का विचार करु नये. त्यांनीच देशाला प्रगत असे तंत्रज्ञान का सूचवू नये.

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण कमी करण्यासाठी पूढील उपाय सूचविता येवू शकतील.

१) अवैध सावकारीला आळा घालणे
२) जिल्हा सहकारी बँका आणि भू-विकास बँका यांच्या कर्जे धोरणात बदल करणे.
३) शेतकऱ्यांची शेत जमीन जिल्हा बँकेकडे गहाण असतांना जर सावकारी व्यवहार झाला असेल तर त्याचा मालकी हक्क जिल्हा बँकेकडे ठेवून, अवैध सावकारी व्यवहार रद्द करणे.
४) व्याज माफ करणे.
५) थकबाकीदार शेतकऱ्यांच्या कर्जांचे पुर्नसंगठण करणे.
६) १५ ते २० शेतकऱ्यांचा बचत गट स्थापण करणे.
७) नैसर्गिक आपत्तीच्या काळात प्रत्यक्षात शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहचविणे जसे - बि-बियाणे, औषधे, कृषी प्रत्यय इत्यादी.
८) शेतकऱ्यांचा विमा उतरवून त्यातून वैफल्य ग्रस्त शेतकऱ्याला मदत करणे व नूकसान भरपाई देणे.
९) शेत-माल खरेदी व विक्री पद्धती बदलविणे.

Scanned by CamScanner

१०) खरेदी विक्री करणाऱ्या मध्यस्थ व दलालांचे उच्चाटन करणे.

११) शेतकऱ्यांना अद्यावत बाजारपेठ उपलब्ध करुन देणे.

१२) शेतकऱ्यांचा शेत-माल गहाण करुन त्यांची आर्थिक गरज भागविणे.

अशा प्रकारे वरील उपायांची शासनाने, समाजाने व राज्यकर्त्यांनी नोंद घेतल्यास आणि अंमलबजावणी ल्यास असे दिसून येईल, की भावी शेतकरी कर्जात जन्म घेणार नाही, कर्जात जगणार नाही; आणि कर्जाचे ढलेले ओझे भावी पिढीसाठी ठेवून जगाचा निरोप घेणार नाही असे यथार्थपणे म्हंटले जाईल. एके नवी पहाट डेल आणि देश हा सुजलाम सुफलाम झाल्याशिवाय राहणार नाही.

✦✦✦

# भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्येची

प्रा. सौ. सुमित्रा मरस्कोल्हे
नव प्रतिभा ज्. कॉलेज, नागपूर.

| कारणे | | उपाययोजना | |
|---|---|---|---|
| १. | जमीनीचे विभाजन व अपखंडन | १. | शेतीला जोडधंदा म्हणून कृषीपर्यटन |
| २. | सामाजिक प्रतिष्ठा | २. | नर्सरी उद्योग |
| ३. | दैववादी दृष्टीकोण | ३. | वृक्षलागवड व वैरण विकास योजना |
| ४. | योग्यपाणी पुरवठ्याचा अभाव | ४. | पशूविमा योजना |
| ५. | भांडवलाची कमतरता | ५. | होलिस्टिक पाणलोट योजना |
| ६. | विपणनातील अडचणी | ६. | कृषीमाल तारण योजना |
| ७. | नैसर्गिक आपत्ती | ७. | कर्जपुरवठा |
| ८. | सावकारांचा जाचक व्याजदर | ८. | सेंद्रियशेती |
| ९. | जंगली जनावरांचा हैदोस | ९. | जलसंधारणास सहाय्य |
| १०. | व्यसने | १०. | रेशीमपार्कची उभारणी |
| ११. | आळशीपणा | ११. | उत्पादनखर्चावर आधारित भाव |
| १२. | नापिकी | १२. | सखोल नागवड |
| १३. | शेतीउत्पादनात अनिश्चितता | १३. | निराशा टाळणे |
| १४. | कर्जाचा गैरवापर | १४. | जमिनीचा योग्य मोबदला |
| १५. | चुकीचे धोरण | १५. | वासनांचा त्याग |
| | | १६. | उत्पादकांना प्रोत्साहन |
| | | १७. | चीनपासून धडा |
| | | १८. | मोहम्मद युनुस तारण योजना |

Scanned by CamScanner

# 'विदर्भातील शेतकऱ्यांच्या' आत्महत्या व उपाय योजना

प्रा.सौ. विजया भुमारे
वनिता विकास विद्यालय व
कनिष्ठ महाविद्यालय, गणेशनगर, नागपूर.

शेतकऱ्यांचे खरे कैवारी डॉ. पंजाबराव देशमुख म्हणाले होते, 'आर्थिकदृष्टिने भारतीय शेतकरी कर्जबाजारी नाही. उलट सरकार, भांडवलदार, व्यापारी, नोकरदार यांना भारतीय शेतकऱ्यांनी कर्जे दिले आहे. तेवढे कर्ज कोणती सावकार देऊ शकणार नाही.'

उत्पादन खर्चापेक्षा कमी किंमतीला आपले उत्पादन विकून आणि उत्पादन खर्चापेक्षा औद्योगिक आणि उपभोग्य वस्तूंची खरेदी करून शेतकऱ्यांनी भांडवलदार, व्यापारी, नोकरदार आणि सरकार या सर्वांना कर्ज दिले. त्यामुळे शेतकऱ्यांचे सर्व कर्ज शासनमार्फत माफ करण्यात यावे आणि सामान्य नफ्यासह असणारी किंमत कृषिमालाला मिळावी. डॉ. पंजाबराव देशमुखांचे हे बोल होते. त्यानंतर बराच काळ गेला तरीही शेतकऱ्यांची लुबाडणूक सुरूच आहे. परिणामतः विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्या संख्येत रोजची भर पडतच आहे.

**आत्महत्येची कारणे**

ज्या समस्येच कारण शोधतांना निश्चित लक्षात येते की शेतीचा स्तर घसरविणे व शेतकऱ्यांना हवालदिल करण्यास सरकारचे शेतीविषयक चुकीचे धोरणच कारणीभूत आहे. उदा. गडचिरोली जिल्ह्यात भाताचा उत्पादन खर्च रुपय १२०० प्रति क्विंटलपेक्षा कमी नाही. पण सरकारच्या चुकीच्या अर्थनीतीने भात उत्पादनाला रुपये ६०० ते ७०० प्रतिक्विंटल भाव मिळतो. चांगले उत्पन्न झाले तरी भात पिकाच्या शेतकऱ्याला प्रतिक्विंटलला ५०० ते ६०० रुपये कमी भाव मिळतो. त्यामुळे शेतकऱ्यांचे खरे वार्षिक उत्पन्न तरी कसे ठरावे ? ज्या गावखेड्यातून १००० क्विंटल माल विकला जातो तेथे दर क्विंटलमागे ५०० रुपयाप्रमाणे १००० क्विंटलमागे ५ लाख रुपये कमी मिळतात. शेतीमालाला सतत किमती नाकारल्याने हे ५ लाख रुपये गावात आलेच नाही.

**शेतकरी संघटनेचे भाकित**

आज उद्योगांचा विकास हा शेती आणि शेतकऱ्याला बुडवून झालेला आहे. शेतकरी संघटनेने २० वर्षापूर्वीच शेतकऱ्यांच्या आत्महत्येसंबंधी भाकित करून सरकारला त्यासंबंधी इशारा दिला होता. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे खरे कारण असे आहे की, शेतीमालाला योग्य भाव सतत नाकारण्यात आला यात आहे. परंतु पंतप्रधानापासून सर्व राज्यकर्ते शेतीमालाच्या भावाबद्दल बोलत नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे कुठेतरी वेगळीकडेच शोधून 'उपाय' म्हणून 'पॅकेजेस्' जाहीर करतात. या पॅकेजेसचा खरा फायदा शेतकऱ्यांपेक्षा इतरांनाच जास्त होतो.

**राज्यसरकारचे कापूसविषयक धोरण**

राज्य सरकारचे कापूसविषयक धोरण अलिकडच्या काळात शेतकऱ्यांच्या हिताचे कमी आणि व्यापाऱ्यांच्या फायद्याचे अधिक राहिले आहे. कापूस खरेदी उशीरा सुरू करणे, वेळेत चुकारा न येणे आणि उत्पादनखर्चा एवढा सुद्धा भाव न देणे हा त्यातलाच एक प्रकार आहे. त्यातल्यात्यात पाऊस गारपीट झाल्यामुळे शेतकऱ्यांचा कापूस

Scanned by CamScanner

शेतातच ओला झाला. मालाची प्रतघसरणार असल्याने तो अत्यल्पदरात विकला जाण्याची शक्यता आहे. शासकीय कापूस खरेदीला अजून २० दिवस वेळ असल्याने अशावेळी शेतकऱ्यांची निकड लक्षात घेऊन व्यापारी आणखी दर कमी करण्याची शक्यता असते.

कापूस हे विदर्भातील 'रोखीचे पीक' आहे. म्हणूनच कृषिखात्याच्या प्रयत्नानंतरही कापसाचे लागवड क्षेत्र अपेक्षित प्रमाणात घटले नाही. मात्र शासनाचा दृष्टीकोण कापसाप्रती कायम भेदभाव करणार आहे. सर्वच वस्तूंचे खरेदी मूल्य दरवर्षी वाढत असतांना कापसाचे दर मात्र २७०० रुपयावरून १९०० रुपयावर आले आहे. शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचाच हा प्रकार आहे.

### उदासीनता

शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा प्रश्न विदर्भासाठी अतिशय गंभीर झालेला आहे. जगण्याची उमेद बाळगावी, संघर्षाला तोंड द्यावे ही जिद्द ठेवण्याऐवजी वैदर्भिय शेतकरी हवालदिल होत आत्महत्या करू लागला आहे. वास्तविक जगण्याची जिद्द निर्माण व्हावी अशी बाजाराची रचना असायला हवी होती. तसेच त्यांना आवश्यक त्या सोई-सवलती पुरविल्या जायला पाहिजे. विदर्भाची काळीमाती ही कपाशीला अतिशय उपयुक्त आहे आणि त्यातून भरपूर पीकही हाती येते. पण हा कपाशीचा पेरा कसा कमी होईल ? त्याऐवजी जमिनीमध्ये क्षार वाढविणारे उसाचे पीक कसे घेतले जाईल ? किंवा कपाशी ऐवजी सोयाबीन कसे घेतले जाईल ? याकडे जास्त लक्ष दिल्या गेले. त्यामुळेच आपल्या कपाशीला आता कोणी वाली नाही या भयगंडापोटी हे आत्महत्येचे सूत्र सुरू झाले. त्यातही शेतकरी जे कर्ज घेत होते त्यावर अवाच्यासवा व्याज लावणे सुरू झाले. इकडे व्याज भरपूर घ्यायचे आणि पिकाला किंमत मात्र अल्प द्यायची. असे एक नवीन समीकरण शासनाने मांडणे सुरू केले. त्यामुळे शेतीला पैसा नाही आणि कर्ज मात्र वाढलेले आहे ते फिटेल अशी स्थिती नाही असे दिसू लागले. त्यातूनच आत्महत्येचे प्रकार वाढीला लागले. बँका व सावकार हे दोन्ही आर्थिक स्त्रोत शेतकऱ्यांच्या संपूर्ण कुटुंबाला घातक ठरले आहे. म्हणूनच सरकारने कायदा करून शेतकऱ्यांसाठी ४ टक्क्यापेक्षाही अल्पव्याजदरात सन्मानपूर्वक सुलभपणे कर्ज पुरवठ्याचे राष्ट्रीय धोरण ठरविणे गरजेचे आहे. त्यात खालील बाबींचाही विचार करण्यात यावा.

### शेतकऱ्यांकरिता राष्ट्रीय धोरण

१. विदर्भातील शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करावे. तसेच शेतसारा व वीजबिल ही माफ करावे.

२. दरवर्षी प्रत्येक हंगामातील पेरणीसाठी व इतर कृषिसाहित्यासाठी थेट शेतकऱ्यांना बिनशर्त आर्थिक सहायता देण्यात यावी.

३. उत्पादन खर्च अधिक २० टक्के नफ्याचा समावेश करून हमीभाव जाहीर करावे.

४. विदर्भातील सिंचनाचा, वीजपंपाचा, रस्त्यांचा प्रचंड अनुशेष झपाट्याने भरून काढावा. शेतकऱ्यांना वीजपुरवठा वेळेवर करावा. शहर व गाव असा भेद न करता भारनियमतन अत्यल्प करावे.

**इतर आवश्यक गोष्टी -नवनवीन शेतीचे प्रयोग उदा. सेंद्रीय शेती.**

१) शेतकऱ्यांनी अन्नधान्याच्या पिकांना फ लोत्पादन, रेशीम उद्योग, दुग्धव्यवसाय, मत्स्यपालन, कुक्कुटपालन यासारख्या उपक्रमांची जोड दिली पाहिजे. त्याद्वारे कृषिक्षेत्रात विविधता निर्माण होईल व उत्पादक रोजगाराची निर्मिती होईल.

**पर्याय म्हणून संजीवक शेतीचा प्रयोग -**

२) 'स्वावलंबी शेती' व 'शेतीतून स्वावलंबन' हे महत्वाचे तत्व आहे. त्यामुळे आधुनिक शेतीकडून

Scanned by CamScanner

अत्याधुनिक तंत्रज्ञानामार्फत शेतीकडे जायचे आहे. हे या प्रयोगाद्वारे शक्य होऊ शकते. संपूर्णपणे सजीव सेंद्रीयशेती, रासायनिक खतांना व औषधांना फाटा, प्रचलित सर्व पिकांचा समावेश व परस्परपोषक विविध मित्र पिकांची वैशिष्ट्यपूर्ण शास्त्रीय लागवड, मातीची उत्पादकता सेंद्रीय पद्धतीने वाढविणे, शेतकऱ्यांचा मित्र असणाऱ्या नैर्गिक कारागिरांच्या आपसूक कामगिरीमुळे बळकटी मिळविण्याचे तंत्र व साधने या सर्वांचा परिणाम म्हणून कीड व रोग नियंत्रण साधणने औषधे व सेंद्रीय घटक सुद्धा बाहेरून विकत न घेता या साऱ्या सेंद्रीय घटकांची उभारणी परिणामकारकपणे शेतावरच सुलभतेने घडवून आणणे, बाहेरील सामग्रीचा कमीत कमी वापर व अंतर्गत सामुग्री उभारणी या तत्वावर आधारलेली तंत्रे वापरल्यामुळे कर्जाच्या जीवघेण्या विळख्यापासून म्हणजेच आत्महत्येपासून शेतकऱ्याची सोडवणूक होईल.

राजकारणी, नोकरशहा, भांडवलदार, संशोधक व नियोजनकर्ते या सर्वांनीच शेतकरीविरोधी व ग्रामीण विरोधी धोरण बदलणे महत्वाचे आहे.

संपूर्ण कर्जमुक्तीचे धोरण अमलात यायला हवे. कृषितज्ज्ञ व राष्ट्रीयकृषक आयोगाचे अध्यक्ष डॉ.स्वामिनाथन् यांनीही बहुतेक याच मुद्द्यांची शासनाकडे विशेषत: महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना सप्टेंबरमध्ये पत्र लिहून जोरकसपणे शिफारस केलेली आहे. तसेच कापसावरील आयातर साठ टक्क्यांनी वाढविला पाहिजे. ही त्यांचीच प्रभावी शिफारस आहे. हे सर्व झाल्यास ही फायद्याची शेतीपद्धती खरीखुरी जीवनदायी ठरू शकते.

अलिकडेच शेतमाल मोठ्या प्रमाणावर बाजार विक्रीस आल्यावर शेतकऱ्यांनी एकजूट करून मालाचे भाव पाडण्याच्या व्यापाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर शेतकऱ्यांनी बाजार समितीच्या 'तारण' योजनेच्या माध्यमातून मात केल्याचे उदाहरण आहे. सर्व शेतकऱ्यांनी एकत्र येऊन आपले संघटन बलशाली करायला हवे. तेव्हाच शेतकऱ्याचे जीवन सुखी होईल व शेतीचा दर्जापण उंचावेल. भारत कृषिप्रधान देश म्हणून उत्पादन प्रक्रियेत भारताचा क्रमांक वरचा राहील. रोजगार निर्मितीपण मोठ्या प्रमाणावर होऊ शकेल. देशासमोरी बऱ्याच आर्थिक समस्यांचा उलगडा योग्यपद्धतीने होईल. त्याकरिता कृषिविषयक धोरण, नियोजन व कायदे, नवे तंत्रज्ञान प हरसतर अनुदान ह्या गोष्टींचा लाभ शेतकऱ्यांना शासकीय स्तरावर उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

◆◆◆

**फास**

अरे पाऊस पावना  
कधी  जादा कधी उणा  
मिळे कधी पोटा दाणा  
कधी उपाशी उताणा ॥१॥

अरे सुरव्याचे ऊन  
करी जीव लाई लाई  
पोटा नाही दाना पाणी  
कसे जगायचे बाई ॥२॥

सरकार मायबाप  
ते बी मारताती थाप  
सवारतो साऱ्या म्हणे  
कधी तेची तेच जाणे ॥३॥

सपनाचा झाला ऱ्हास  
जगायची सरली आस  
देवाकडे जाणे आता  
मीच आळवीला फासा॥४॥

◆ डॉ चंद्रशेखर पाध्ये

Scanned by CamScanner

# शेतकऱ्यांची आत्महत्या एक विचार

प्रा.सौ.अरूणा सोनेगांवकर
व्ही.एम.व्ही. कॉलेज
नागपूर.

१८०० ते १८३० या काळाचा भारतीय आणि भारतीय संस्कृती व परंपरा यांचा अभ्यास केला असता भारताची सामाजिक व आर्थिक परिस्थिती कशी होती यावर प्रकाश टाकणारी माहिती २ फेब्रुवारी १८३५ रोजी ब्रिटीश पार्लमेंटल उद्देशून केलेल्या आपल्या भाषणात लॉर्ड मेकॉले यांनी सादर केली.

त्यांच्याच शब्दात "I have travelled accross the length and breadth of India and I have not seen one person who is a begger, who is a thief. Such wealth I have seen in this country, Such high moral values, people of such calibre, that I don't think we break the very backbone of this nation, which is her spiritwal and cultural heritage and therefore. I propose that we replace her old and ancient education system, her culture if the Indian think that all that is foreign and English is good and greater than their own, they will loose their selfsystem, their native culture and they will become what we want them, a trully dominated nation."

स्रोत - दै. तरूणभारत सोमवार दि. ६ नोव्हेंबर २००६ पृ. -६ शिक्षण आणि सुजानता.

कार्य अर्थ होतो याचा ? येवढाच अर्थ होतो की, भारतीय नागरिक भलेही गरीब असोत येथे एकही भिकारी नाही. एकही चोर नाही. मात्र भारतीय हा अब्रुला भितो. अब्रु जाण्यापेक्षा मरणे पसंत करतो. अब्रु हीच त्याची संपत्ती आहे. जोपर्यंत या देशात उच्च नैतिक मूल्यांची जोपवणूक करणारे उच्चक्षमतेचे नागरिक आहेत तोपर्यंत या देशाला जिंकणे कठिण आहे आणि यामागे आहे त्यांची अध्यात्मिक आणि सांस्कृतिक परंपरा आणि याचे शिक्षक देणारी प्राचिनतम शिक्षण पद्धती. गरीबीला कंटाळून या देशात कधीच आत्महत्या घडल्या नाहीत. आत्महत्या महापाप आहे याची शिकवण देणारी ही संस्कृती गरीबीतही आनंदाने देवाचे नांव घेत जगता येते याचा वारसा देणारी संस्कृती आहे.

गत दिडशे वर्षात काय झाले. विदेशी संस्कृती आणि इंग्रजी शिक्षण भारतीयांना प्रिय वाटू लागले. भारतीयांचे स्वावलंबित्व संपले आणि ते परावलंबी झाले. भारतीयांची सांस्कृतिक घसरण सुरू झाली. देशातील बचत संस्कृती जाऊन कार्य संस्कृती उदयास आली आणि देशातील माणूसच काय देश भिकारी बनला. अपमानित जीणे जगण्याची पाळी जनतेवर आली. भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे मुळ यात आहे. बळीराजा, शेतकरी राजा, धनी याशब्दांचा अर्थच मुळी संपूर्ण गेला या देशातील गरीबातला गरीबही मोठ्या अभिमानाने सांगत असे माझी पत्नी हीच माझी लक्ष्मी.'' आज या देशात पत्नीला ''लक्ष्मी'' मानणारा एखादा तरी गरीब असेल कां ? शोधावा लागेल. पैसा हिच लक्ष्मी मग ती कर्जाऊ आणली असले तरी लक्ष्मीच. अहो तिला सुद्धा आपली समजणारे महाभाग मोठ्याप्रमाणावर या देशात आहे. ती परत करायची असते अगदी काम होताच तावडतोब आणि व्याजासकट हे बरेचदा विसरले जाते आणि परिणाम समोर येतो आत्महत्या.



Scanned by CamScanner

कोण जबाबदार आहे याकरिता. शेतकरी, बँका, सरकार, समाज की शिक्षण? याकरिता आम्ही सर्वच जबाबदार आहोत. कसे आहोत ? हाच आज माझ्या निबंधाचा विषय आहे. मी माझ्या निबंधातून प्रत्येक भारतीय याकरिता कसा जबाबदारआहे हे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. भारतीय असल्यामुळे मीही जबाबदार आहे हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. आपण देशाच्या स्वातंत्र्यापासून सुरूवात करू.

भारताला स्वातंत्र्य मिळाले. देशात गणराज्याची स्थापना झाली. भारतीयांना गणराज्य या संकल्पनेची ओळखच अजूनपर्यंत झालेली नाही. लोकांनी लोकांकरिता चालविलेले राज्य म्हणजे काय ? हे भारतीयांना आजपावेतो समजावून देण्याची तसदी कोणत्याही सरकारने घेतलेली दिसून येत नाही. शब्दकोषातून घेतलेल्या गणराज्याचा खरा अर्थ ज्यावेळी सर्वांना कळेल त्यावेळी कितीतरी उशीर झालेलाअसेल. किती गावकऱ्यांना ग्रामसभेच्या अधिकारांची, जबाबदाऱ्यांची आणि कर्तव्यांची जाणीव आहे ? माझ्या माहितीप्रमाणे अजिबात नाही. गावातील निवासीना याचे शिक्षणदेण्याची खरी गरज आहे. सरकार करेल कां ही व्यवस्था ? अजिबात शक्य नाही. मग कोणी करायची ? मित्रांनो ती आपणच करायची आहे. गुरूकुलाची ही जबाबदारी असते. परिश्रमाची अपेक्षा न करता आजूबाजूची परिस्थिती अभ्यासून काळाची पावले ओळखून समाजाला दिशा देण्याचे कार्य अध्यापकच करू शकतात म्हणून शेतकऱ्यांच्या आत्महत्येला आपणही जबाबदार आहेता कारण आपण या दृष्टिने काहीच प्रयत्न करित नाही. शेतकरी आत्महत्याकरीत असतांना आपण काय करित आहोत याचा विचार करण्याची नव्हे प्रत्यक्षात कृती करण्याची वेळ आलेली आहे. दूसरा काय करतो याचा विचार न करता आपण आजपासून कामाला लागू या.

शेतकऱ्यांच्या आत्महत्येकरीता सरकार जबाबदार आहे. असा एकही दिवस नाही की ज्या दिवशी शेतकऱ्यांच्या आत्महत्येकरीता सरकारला जबाबदार धरले जात नाही. सरकार कस जबाबदार आहे याचे वस्तुस्थिती दर्शक विवेचन करणारे फक्त बोटावर मोजण्या इतकेच नेते आहेत आणि ते सर्व पक्षात ध्रुवताऱ्याप्रमाणे अढळ स्थानी आहेत परंतू त्यांचे ऐकतो कोण ? ही परिस्थिती सर्वत्र दिसून येते. माझ्याही मते शेतकऱ्यांच्या आत्महत्येकरीता सरकार जबाबदार आहे त्याची कारणे मात्र जरा वेगळी आहे. ती पुढीलप्रमाणे

**१. सरकारचा शिक्षण क्षेत्रातील अनावश्यक हस्तक्षेप.** मते मिळविण्याकरीता ''सर्वांना शिक्षण सर्वांकरीता शिक्षण'' हे जनतेला आकर्षित करणारे धोरण अवश्य आहे परंतु आपण सर्वांनाच एकाच प्रकारचे शिक्षण घेण्याची व्यवस्था वर्षोनुवर्षे करित आहोत हे चुकीचे आहे. एकेका परिक्षेला लाखो विद्यार्थी बसतात त्या परिक्षेची वर्षभर तयारी करतात केवळ पुस्तकी ज्ञान प्राप्त करतात. प्रत्यक्ष व्यवहार आणि आदर्श यांच्यातील तफावत त्यांना शिकविली जात नाही. संपूर्ण वर्षभर केलेल्या अभ्यासाची तयारी केवळ तिन तासाच्या लेखी परिक्षेत तपासली जाते. जवळपास ६० टक्के प्रश्न दरवर्षी पुन्हा पुन्हा येत असतात. अनेक विद्यार्थी नेमक्या तेवढ्याच प्रश्नांची उत्तरे तयार करतात व परिक्षेत पास होतात. अमुक इतका निकाल लागलाच पाहिजे याची सक्ती केली जाते. परिणाम ज्ञान नसलेला पदवीधर तयार होतो. प्रत्यक्ष जीवनात त्याला काम मिळत नाही. सरकारी नौकरी नाही कारण भरती नाही. खाजगी नौकरी नाही कारण ज्ञान नाही. बेरोजगारीचे प्रमाण दिवसेंदिवस सातत्याने वाढत आहे. सुशिक्षित असल्यामुळे शेतकऱ्यांची मुले शेतीवर काम करण्याबाबत उत्साही नाही.एकटा शेतकरी काय करणार ? दुसरीकडे मानवाच्या गरजा प्रतिदिन वाढत आहे. मिळालेला पैसा पुरत नाही.कर्ज काढण्याचे प्रमाण मोठ्याप्रमाणावर वाढले आहे. एका सर्व्हेनुसार ९७ टक्के लोकांवर खाजगी कर्जाचा भार आहे. कर्जबाजारी



Scanned by CamScanner

आपली अब्रुने व स्वाभिमानाने जगु शकत नाही. म्हणून आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे. वाढत आहे.

२. **सरकारचे कृषी विषयक धोरण** - हे धोरण आत्महत्येला जबाबदार आहे. कोणत्याही औद्योगिक उत्पादकाचे उत्पादन वाढले की लाभाचे प्रमाण वाढते. शेतमालाला मात्र अगदी उलट अनुभव येतो. उत्पादन वाढले की शेतमालाचा भाव कमी होतो. हा भाव कमित कमी ठेवण्याकडे सरकारचा प्रयत्न असतो. एकीकडे उत्पादन वाढवा म्हणून शेतकऱ्यांना प्रेरित करायचे आणि दुसरीकडे मालाला योग्य किंमत मिळणार नाही याची व्यवस्था करायची हे योग्य नाही. भारताने शेतमाल आयात करण्याची काय गरज आहे. परंतू ती करण्यात येते व कृषिभाव नियंत्रित ठेवण्याचा प्रयत्न करण्यात येतो. दुसरीकडे तयार औद्योगिक मालाच्या किंमती मात्र भरमसाठ वाढतात त्यात नफा समाविष्ट असतोच. आज शहरी लोकांच्या खर्चाचा आढावा घेतल्यास हे स्पष्ट होते की त्यांचा अन्नधान्यावरील खर्च ५% पेक्षाही कमी आहे. जी जीवनावश्यक गरज आहे. तिच्याकरिता केवळ ५ टक्के खर्च आणि ही गरज जो भागवतो त्याचा उत्पादनखर्चही भरून निघत नाही इतकी दरवर्षी निर्माण होणारी परिस्थिती शेतकऱ्याला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करते.

३. संकटकाळी पॅकेजची घोषणा : संकटच येणार नाही अशी व्यवस्था करायची सोडून संकट आल्यावर पॅकेज घोषित करण्यात भारतीय सरकारे आघाडीवर आहे. कारण यातून मतांचे राजकारण करता येते. आम्ही संकटकाळी धाऊन येतो हे जनतेला मतांकरीता दाखविणे आवश्यक समजले जाते. त्या पॅकेजचा लाभ कोणाला व किती मिळतो हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. आलेल्या संकटाच्या परिणाम स्वरूप शेतकरी आत्महत्या करतो आणि सरकार त्यानंतर याचे बक्षिस म्हणून त्याच्या कुटुंबाला १ लाख रूपयाचे पॅकेज घोषित करते. प्रत्यक्षात फारच थोड्यांना याचा फारच थोडा फायदा होतो परंतू सरकारपक्षाचे मात्र नाव होते. पॅकेज घोषित केल्यानंतरही आत्महत्येच्या प्रमाण झालेली वाढ असे पॅकेज शेतकऱ्याना मान्य नसल्याचे स्पष्ट होते.

आज शेतकऱ्यांना आवश्यकता आहे ती सर्वप्रथम संपूर्ण कर्ज मुक्तीची.त्याच्यावरील कर्जाचे ओझेच त्यांचा जीव घेत आहे. पैशाच्या आशेने त्यानी केलेला पिकातील बदल त्यांच्या नाशाला कारणीभूत आहे. दुभती जनावरे नसणे ही त्याची खरी शोकांतिकाआहे. मुलं वांझोट्या शिक्षणात गुंतली, त्यांची शेतकामात मदत होत नाही. हे त्यांचे दुर्दैव आहे. दारूच्या व्यसनात शेतकरी स्वतःला सावरण्याचा प्रयत्न करतो हा त्याचा मूर्खपणा आहे. आत्महत्येने प्रश्न सुटेल अशी त्याची चुकीची समज आहे. स्वतःची शेतीची कामे सोडून तो मजूरीवर जाऊ शकत नाही.ती त्याची असमर्थता आहे. रोजगारहमी योजनेचा लाभ तो घेऊ शकत नाही ही वास्तविकता आहे. आज दोन्ही वेळचीच काय परत एकवेळेची चूल पेटविणे त्याला अशक्य झाले आहे. कर्जाच्या परत फेडीचा तगादा त्याला स्वस्त बसु देत नाही. त्याची सारासार विचार शक्तीच कुंठित झाली आहे. आत्महत्याच आपली सुटका करू शकेल असा विचार त्याच्या मनात घर करू लागला आहे हा विचार पक्का होताच क्षणि तो आत्महत्या करतो आणि ते त्याच्याकरिता फार सोपे आहे. किटकनाशकाची बाटली सारखी त्याला खुणावते आहे. घे मला. मी तुझी या सर्वातून मुक्तता करते. किटकांच्या नाशाचं आजवर केलेल कृत्य फळाला आलेल असत तेच शेतकऱ्यांच जीव घेत.

आज भारतीयांची खरी गरज आहे ती मरेन परंतु कर्ज घेणार नाही या निश्चयाची. ज्यादिवशी प्रत्येक भारतीय हा निश्चय करेल की मी कर्ज घेणार नाही. उपाशी मरेन परंतू आत्महत्या करणार नाही. मोल मजुरी करेन परंतु आपला भार दुसऱ्यावर टाकणार नाही. त्यादिवशीच अंधारीरात्र संपून प्रसन्न उषःकाल झालेला असेल.

Scanned by CamScanner

भारतीयांनो खरोखरच आत्महत्येपासून तुम्हाला मुक्ती हवी आहे नं ! एक काम करा. मनातील नैराश्य झटकून टाका. आळसाचा व व्यसनाचा त्याग करा. आपल्या हाताचे सामर्थ्य ओळखा व कामाला लागा. लक्षात ठेवा आजचा दिवसच तुमच्या हाती आहे. उद्या कधिच येत नसतो म्हणून आजचा दिवस कारणी लावा. कामाचा शोध घ्या. तुम्हाला जेऊ घालेल येवढे काम तुमच्या अवती भोवती आहेच आहे. मुलांना कामाची व कष्टाची सवय लावा. त्यांच्या सगळ्याच गरजा पूर्ण करू नका. काही गरजा त्यांनाही पूर्ण करू द्या. वृद्धांची सेवा करा. आपले दुःख त्यांना सांगा. त्यांना विश्वासात घ्या. त्यांना आधार तुम्हीच आहात. तुम्हाला समाधान मिळेल. दुसऱ्याव अवलंबून राहू नका. सरकार मदत करेल या भ्रमातून मोकळे व्हा. स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न करा. तुम्ही स्वतंत्र देशाचे स्वतंत्र नागरिक आहात. तुम्ही मनात येईल तसे सरकार बनवु शकता. तुमच्यामुळे सरकार आहे. सरकारमुळे तुम्ही नाही हे लक्षात ठेवा. यापुढे कर्ज काढणार नाही असा निश्चय करा.

कायद्याचा आधार घ्या. कर्ज फेडीकरिता १० वर्षाच्या मुदतीची मागणी करा. आपण घेतलेले कर्ज आहे ते फेडलेच पाहिजे ही भावना ठेवा. कर्जाचे उधार रकमेत रूपांतर करण्याची विनंती करा. लक्षात ठेवा ही तुम्ही केलेली पहिली आणि शेवटची विनंती असेल. या नंतर सरकारला आदेशाच द्यायची तयारी ठेवा.

या विनंती नंतरही सरकारने किंवा बँकेने कोणताही निर्णय घेतला किंवा कांहीच निर्णय घेतला नाही तशी शक्यता आहे. त्यांना वाटेल ते करू द्या. कायद्याच्या बाहेर जाऊन ते काहीही करू शकत नाही. हे लक्षात ठेवा. तुम्ही शांतपणे काम करीत आपला दिवस आनंदाने जगण्याचा प्रयत्न करा.ईश्वर तुमच्या मदतीला आहे त्याचे सतत नामस्मरण करा व कामात स्वतःला गुंतवून घ्या. आत्महत्येचा विचारही मनात आणू नका. ते महापाप आहे. त्यामुळे तुमची सुटका होईल हा केवळ भ्रम आहे. तुमचे शरीर तुमच्या सोबत असणार नाही परंतु विचार हे तुमची पाठ सोडणार नाही हे लक्षात ठेवा. बँकांचे कर्मचारी त्रास देत असतील तर पोलिस ठाण्यात रितसर तक्रार दाखल करा. संरक्षणाची मागणी करा. तुमचा जगण्याचा हक्क हिरावणारा एक ईश्वराशिवाय दुसरा कोणही नाही हे लक्षात ठेवा. संकटांचा सामना करा. तेवढे सामर्थ्य तुमच्या ठाई निश्चितच आहे. उठा जागे व्हा आणि कामाला लागा. उगाच टिपं गाळू नका. कोणाला टिपं गाळायला लावू नका. तुमचे कल्याण होईल.

या पद्धतीने जीवन जगणे हिच आपली संस्कृती आहे. हीच आपली जीवनमुल्ये आहे. प्राणीमात्रातही ईश्वराचा वेध घेणारी ही संस्कृती वारसा हक्काने आपल्याला मिळाली असतांना आपण आत्महत्या करतो. हे बरोबर नाही. सावरा. स्वतःला सावरा व इतरांनाही आधार द्या. माझ्या ग्रामीण भागातील शिक्षकांनो ही तुमची जबाबदारी आहे. गरीबांना पैशाचा शक्य नाही परंतू विचारांचा आधार द्या. त्यांच्या मनातील निराशेची काजळी झटकून टाका. जीवनाचे रहस्य त्यांना समजावून द्या. आपल्या कुटूंबाच्या कक्षा जरा जास्त रूंदावा. मार्कंडादेव चर्चासत्र २००६ च्या माध्यमातून हा संदेश घरोघरी पोहचवा. मार्कंडादेवाचीच तशी इच्छा आहे त्यानेच मला असे लिहण्याची प्रेरणा दिली नव्हे माझ्याकडून लिहून घेतले. हे देवाचे कार्य आहे. कनिष्ठ महाविद्यालयातील अर्थ-वाणिज्य शिक्षक तरूण आहे. त्यांचा विषयच असा आहे की जो त्यांना सदैव तरूण ठेवतो. हे विचार समाजात पसरणे आवश्यक आहे. वृतपत्रेही आपली भूमिका बजावतीलच परंतू शेतकऱ्यापर्यंत आम्हीच प्रत्यक्षपणे पोहचू शकतो. तेव्हा या मार्कंडादेवाच्या साक्षीने आज आपण अशी प्रतिज्ञा करू या की आम्ही शेतकऱ्यांच्या मनावर पसरलेली ही निराशेची काजळी झटकून टाकण्याचा मनःपूर्वक प्रयत्न करू व राष्ट्रीय समस्येत एक अध्यापक म्हणून आपलेही योगदान देऊ.

✦✦✦

Scanned by CamScanner

# जागतिकीकरणात सहकार क्षेत्रासमोरील आव्हाने

प्रा. प्रदीप नवघरे
वाणिज्य विभाग
हिस्लॉप महाविद्यालय

**प्रस्तावना**

आधुनिक सहकारी चळवळ युरोपीय देशांत जरी सुरू झाली तरी भारतात ती काही नवीन नाही. ग्रामीण भागाच्या विकासास सहकार चळवळीशिवाय पर्याय नाही. ती त्या भागांत खोलवर रूजलेली आहे. सहकार ही ग्रामीण भारतातील जीवन पद्धती आहे. कारण समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकासाठीच हीच चळवळ आहे. स्वातंत्र्योत्तर काळात सरकारने दिलेल्या प्रोत्साहनामुळे सहकार क्षेत्राचा विकास झाला. सहकारी तत्वावर ग्रामीण भागांत साखर कारखाने, दुध डेअरी, बँक, पतपेठ्या, ग्राहक भांडारे, सूत गिरण्या स्थापन झाल्या. सर्वसामान्य जनता, दुर्बल घटकांच्या उत्पन्नात व रोजगारात ग्रामीण भागांत वाढ झाली. ग्रामीण भागातील लोकांना सहकाराद्वारे आपली उन्नती करता येते, हे सहकार चळवळीने दाखवून दिले.

**सहकार चळवळीचा विकास**

भारतात सहकारी चळवळीला १९०४ मध्ये सुरूवात झाली. २००४ मध्ये सहकार क्षेत्रास १०० वर्षे पूर्ण झाली. महाराष्ट्र राज्य सहकार आयुक्त व निबंधक यांच्या अहवालातील आकडेवारीनुसार सहकार क्षेत्राचे महाराष्ट्रातील सहकारी संस्थांची संख्या १,७३,४०२ व सभासद संख्या ४,७६,००० आहे. तसेच महाराष्ट्रातील सहकारी संस्था व सहकारी बँकामार्फत ५५,१३३ कोटी चे कर्ज वाटप करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या एकूण शाखा ५३ आहेत. वित्त पुरवठा २७२ कोटीच्या घरात पोहचला आहे. सहकारी सूत गिरण्या २०१ आहेत. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी १३,९५७ कोटीचा कर्ज पुरवठा केलेला आहे. तसेच दुध संस्था, सूत गिरण्या, ग्राहक संस्था, तेल गिरण्या, मच्छीमारी संस्था, पणन संस्था, साखर कारखाने, औद्योगिक वसाहती इ. सहकारी संस्थांच्या स्थापनेत वाढ झाली आहे.

इ.स. १९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आणि लोकशाही तत्वावर राज्य पद्धती सुरू झाल्यानंतर सहकारी संस्थाचे पदाधिकाऱ्यांचे महत्व हळूहळू वाढत गेले. सहकारी चळवळीचे कार्यकर्ते पूर्वीपासूनच समाजात कार्यरत होते त्यामुळे त्यांना राजकारणात वाव मिळाला. सहकारी चळवळीत शासनाचे, भांडवल ही यायला लागले. सहकारी संस्थांचा व्याप हळूहळू वाढत जाऊ लागला. अनेक प्रकारच्या कर्ज देणाऱ्या संस्था, उत्पादक संस्था, प्रक्रिया संस्था, ग्राहक भांडारे अशाप्रकारच्या सहकारी संस्था वाढू लागल्या. ग्रामीण भागांत कृषि पत पुरवण्या बरोबरच, शहरी भागातील पत पुरवण्याकरीता नागरी सहकारी बँकाही संघटीत होऊ लागल्याव स्थानिक पातळीवर अशा अनेक बँकांचा विकास ही झाला.

**सहकार म्हणजे काय ?**

सहकार म्हणजे एकमेका एकनिष्ठेने सहाय्य करून अवघे धरू सुपंथ. म्हणजे असाध्य ते साध्य करून घेण्याची, एकत्र संघशक्ती, समानतेच्या, एक सदस्य एक मत आणि लोकशाहीच्या माध्यमातून व्यवस्थापन ह्या

Scanned by CamScanner

वैशिष्ट्याच्या आधारावर समाजातील आर्थिक दुर्बल घटक एकत्र येऊन आपले जटील प्रश्न जे आर्थिक सामाजिक आणि राजकीय स्वरूपाचे असतात ते सहकाराच्या माध्यमातून सोडवू शकतात. सहकारी चळवळ मुळात गरिबीचे खिणे लाभलेल्या माणसांच्या गरजेतून उदयास आली. ज्यांना आर्थिक, सामाजिक पाठबळ नाही अशा गाव लोकांनी भांडवलशाही शोषणाच्या विरोधात आपले हित साधण्याच्या दृष्टीकोनातूनच एकमेकांच्या हातात हात देत या चळवळीला बळ दिलेले आहे. आज खऱ्या अर्थाने सहकारी चळवळ ही समाजभिमूख चळवळ म्हणून नावा रूपाला आली आहे. महाराष्ट्रात सहकारी क्षेत्रांत कार्य करणाऱ्यांची संख्या फार मोठी आहे. कार्यकर्त्यांच्या कार्य कुशलतेमुळे महाराष्ट्रात सहकारी साखर कारखाने, सूत गिरण्या, कापड गिरण्या, बँका, वित्तीय संस्था, सहकारी अपना बाजार, शेतकरी सहकारी संस्था अशा अनेक संस्था कार्यरत आहेत.

**सहकार चळवळीची आवश्यकता**

सहकाराचे महत्त्व भारतीय समाजाने ओळखले. सहकाराने शोषण मुक्त समाज निर्माण होऊ शकतो. अनेकांनी एकत्र येऊन सहकार पद्धतीने एखादा प्रकल्प राबविला तर भरपूर लाभ होऊ शकतो. जो आज समाज व्यवस्थेला हवा आहे. आज भारतभर असंख्य सहकारी संस्था निर्माण झाल्या आहेत. सहकारी पद्धतीने अनेक साखर कारखाने भारतभर साखर निर्माण करीत आहे. मोठ्या प्रमाणावर उत्पादन निर्मिती करण्यासाठी सहकारी तत्वाशिवाय दुसरा पर्याय नाही. आज अनेक सहकारी पत संस्था, बँका, शहरातच नव्हे तर खेडोपाडी सहकारी तत्वावर चालल्या आहेत.

सहकारी चळवळी ही सामान्य माणसांची आहे. सामान्य माणसे नेहमीच राहणार त्या अर्थी त्यांना सहकारी चळवळीचे आवश्यकता राहणारच आहे. बदलत्या धोरणांमुळे बदललेल्या कायद्यांचा थोडाफार परिणाम काही वेळी होईल हे ही निश्चित परंतु ह्यामुळे सहकारी चळवळ बंद होणार नाही. ती सामान्य जनतेची चळवळ आहे. काळमानाप्रमाणे कार्य शैलीत काही बदल अंगीकारावे लागतील.

राजकीय मानसिकता सुद्धा काही भांडवलदारांना हाताशी धरून सर्व साधारण जनतेच्या आर्थिक विकासाकडे लक्ष देण्यास तयार नव्हती. वैयक्तिक मानसिकता गुलामगिरीची निर्माण झाली. वैयक्तिक मानसिकतेचे रूपांतर सामाजिक मानसिकतेत करण्याचे संघटनात्मक कार्य करणाऱ्या सहकारी संस्था निर्माण करण्याचे कार्य काही मंडळी करीत होती. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्याकरीता काहींनी सहकारी तत्त्वावर चळवळीची सुरूवात करण्याचा विचार केला. युरोपमधील अशा सहकारी चळवळीचा अभ्यास करून शेतमाल उत्पादकांना कमी व्याज दरावर कर्जे देण्याकरीता ''रायफेसिअल मॉडेल'' वर कृषि पतपुरवठा करणाऱ्या सहकारी संस्था गावोगावी काढल्या. शेतकऱ्यांना काही प्रमाणात ह्या संस्थाकडून आर्थिक मदत मिळून शेती व्यवसाय वाढविण्याकरीता मदत झाली. परंतु ह्या संस्था पाहीजे तशा कार्यक्षम होऊ शकल्या नाहीत.

**जागतिकीकरणात सहकारी चळवळीचे स्थान**

१९९१ नंतर जगात सर्वत्र जागतिकीकरण, खुलेपणा यांचे वारे जोरात वाहायला सुरवात झाली. परराष्ट्रीय कंपन्या भारतामध्ये यायला सुरूवात झाली याचा सहकार चळवळीवर दोन्ही बाजुंनी परिणाम व्हायला सुरवात झाली. एका बाजुने बाजारातील खुलेपणामुळे, सहकारी संस्थांना स्पर्धात्मक परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे तर दुसऱ्या बाजुने सहकारी कायद्यांच्या अटीची टांगती तलवार त्यांच्या शिरावर राहते. त्यामुळे आजच्या युगात सहकारी संस्थांना जर टिकाव धरायचा असेल तर त्यांच्यात पुढील आव्हाने झेलण्याचे तयारी पाहिजे किंवा स्वत:ला परिस्थितीशी जुळवून घेण्याकरीता आव्हानांचा सामना करावा लागेल.

## सहकारी संस्था पुढील आव्हाने

१) जागतिक स्पर्धेकरीता स्वतःला सक्षम करणे.
२) संघटनात्मक कुरसटलेपणा.
३) जुनाट कालबाह्य कार्यशैली.
४) भांडवलांच्या मर्यादा.
५) सभासदांच्या आव्हानांचा सामना करण्याची ताकद.
६) व्यवसायीक संस्था प्रबंधनाची गरज.
७) संस्था विकासातील भौगोलीक असमतोल.
८) उत्पादन पद्धती मधील वापरण्यात येणाऱ्या जुन्या (Outdated Technology) तंत्राचा वापर.
९) नेतृत्वाचा मर्यादीत दृष्टीकोन.
१०) लोप पावत चाललेली सहकारी संस्कृती.
११) राजकीय पक्षांचा हस्तक्षेप आणि स्वार्थी दृष्टिकोन.
१२) कालबाह्य सहकारी शिक्षण आणि प्रशिक्षण.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत व्यापक सामाजिक, आर्थिक आणि व्यवसायिक स्थित्यंतर भारतात झपाट्याने होत आहे. उद्योग, व्यापार, दळणवळण, आय.टी.इ. क्षेत्रात वेगाने बदल घडून येत आहेत. सहकारी क्षेत्र वैमनस्क अवस्थेत या परिवर्तनास समोरे जातांना दिसत आहेत. पर्यायी व्यवस्थे अभावी सहकारी क्षेत्राची तथा कथित राखीव असलेली कृषि, लघुउद्योग, मत्स्य व्यवसाय आदी क्षेत्रे अविकसित राहिली आहेत. व्यापार भारतीय आर्थिक क्षेत्र मात्र जागतिकीकरणाच्या क्रांती कालातून जात आहे. ज्यांच्यासाठी प्राधान्याने सहकारी चळवळ उभी राहिली तेच वर्ग चळवळी पासून दूर पडत असल्याचे चित्र दिसत आहे. सहकारी संस्था म्हणजे भ्रष्टाचाराने बरबटलेली, व्यक्तीगत स्वार्थाने पोखरलेली असे प्रतिबिंब पुढे येत आहे. स्वावलंबी, आधुनिक व्यवसाय म्हणून त्याकडे सामान्यजन पाहत नाहीत. राजकीय गुंत्यामुळे सहकारी संस्थांची व्यवसायीक उद्दिष्टे मार खातात. आर्थिक अपयश आणि घोटाळे यांनी संस्थेचे अस्तित्व नाम मात्र उरले आहे हे चित्र बदलले पाहिजे.

सहकारी संस्थांचे कार्यक्षेत्र आणि व्यवहार व्यापक आणि विविध होण्याची आजच्या जागतिकीकरणाच्या काळात अतिशय गरज आहे. उद्योजकता दाखवून व्यवहार करीत असतांना त्यात संतुलन साधण्याचे व्यवस्थापकीय कौशल्य सहकारी संस्थातील व्यवस्थापकांनी दाखविण्याची वेळ आलेली आहे. विविध क्षेत्रातील काम करणाऱ्या संघ संस्थांनी विशेष नेतृत्व पुरविले तर त्यांना तुलनेने अधिक आर्थिक साधने उपलब्ध होऊ शकतात. मनुष्यबळ उभारता येऊ शकते व व्यापक क्षेत्रात व्यवहार वाढवता येऊ शकतात. व्यवसायिक संतुलन साधने तुलनेने अधिक सुलभ होऊ शकते. जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर संघीय संस्था नाम मात्र असल्याचे चित्र दिसते. संस्थांची संभव शक्ती भरपूर आहे पण संस्थांचे बळ, कल्पकता कमी पडतांना दिसते. एन.सी.डी.सी. सारख्या विविध आर्थिक सहाय्य करणाऱ्या सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांचा लाभ उठवून सहकारी संस्थांनी आपले व्यवसायिक संघटन भक्कम केले पाहिजे त्यामुळे विकासाला गती मिळेल.

सहकारी क्षेत्राला विधायक कार्यकर्ते व सक्षम नेतृत्वाची गरज आहे. मध्यम तंत्रज्ञानाची (Intermedi-



Scanned by CamScanner

ate Technology) ग्रामीण भागात विशेष वाण जाणवते. तांत्रिक शिक्षणाचा महाराष्ट्रात पुरेसा सर्व दूर विकास करण्यात आलेला आहे. त्यांचे पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेले विद्यार्थि पुढे येत आहेत. विकेंद्रित विकासाला वेग देण्यासाठी विविध व्यावसायिक सहकारी संस्थांना त्यांची मदत मिळू शकते. उत्पादनाला, विकासाला वेगाची चालना देणे आज अधिक महत्वाचे आहे. सहकारी संस्थांना सहकाराची परिपूर्णता तथावकाश करता येईल. ते चित्र उत्क्रांत होण्यास अवधी लागतो. परंपरा बांधाव्या लागतात. भौतिक उद्दिष्टांच्या परिपूर्तीमुळे संघटनेवरील विश्वास बळावतो. संस्थेला बळ प्राप्त होते. संस्था तळागाळातल्या सभासदांना सेवा पुरवते. उत्पन्नाचे मार्ग खुले करते.

सहकारी क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी आलेल्या संधीचा व अनुकूल शासकीय धोरणांचा लाभ उठवून आपले भवितव्य, विकास सुनिश्चित करण्याची आणखी एक संधी आता आली आहे. ती हुकली तर विकासाचे लाभ मिळणार नाहीत. सध्याच्या संक्रमणावस्थेतून जात असलेल्या भारतीय सहकारी चळवळीला विद्यमान नेतृत्व कशी आर्थिक आणि व्यावसायिक दिशा देतात आणि त्यात ते कितपत यशस्वी होतात. जागतिकीकरणाचे आव्हान पेलण्यात त्यांना कसे यश मिळेल हे पहावयास हवे.

**उपाय योजना**

सहकारी संस्थांनी खालील उपाय योजनांचा जागतिकीकरणाच्या स्पर्धात्मक युगात अवश्य अवलंब करावा.

१) सहकारी संस्थांना अधिक स्वायत्तता मिळवून देण्यात यावी.

२) सहकारी विपणनाची विशेष ओळख (co-operative identity) बाजारपेठेत प्रस्थापित करावी.

३) सहकारी कायद्यात आवश्यक ते बदल करण्यात यावे.

४) सहकारी योजनेत आणि प्रक्रियेत आर्थिक बदल घडवून आणावे.

५) माहिती तंत्रज्ञानाचा सहकारी क्षेत्राने अधिकाधिक वापर करून घ्यावा.

६) सहकारी शिक्षण व प्रशिक्षण हे अधिक समय सुचक व अद्यावत करण्यात यावे. त्यात समाजातील बदलांचे प्रतिबिंब येणे आवश्यक आहे.

७) मूल्याधारित व्यावसायिक प्रवंधन जे आज सहकारी क्षेत्रात दिसत नाही त्याचा वापर सहकारी प्रबंधनात आवश्यक आहे.

८) निष्ठावान सहकारी कार्यकर्त्यांची फौज आणि निवडून आलेले जनतेचे प्रतिनिधी जे सहकारी चळवळीतून पुढे आले आहेत अशा व्यक्तींनी सहकारी संस्थांना व्यावसायिक प्रबंधनाच्या माध्यमातून आर्थिक स्थैर्य मिळवून दिले पाहिजे.

◆◆◆

Scanned by CamScanner

# जागतिकीकरणात सहकार क्षेत्रासमोरील आव्हाने

प्रा.डॉ. माधुरी प्र. लेले
श्री . बिझाणी नगर महाविद्यालय
नागपूर.

सहकार्य ही एक सहज आणि नैसर्गिक मानवी प्रवृत्ती आहे. सहकारी मूल्ये, समता व लोकशाही या संबंधीच्या सर्वमान्य कल्पनांशी संबद्ध आहेत. समतेबाबत जरी एखाद्या विशिष्ट काटेकोर गोष्टीवर सहकाराचा भर नसला तरी लहान व दुर्बल घटकांबाबत सहकाराचा आग्रह असल्यामुळे मक्तेदारीच्या विरोधातील लढा अशी त्याची मूळ भूमिका असल्यामुळे, सामाजिक नियंत्रण व नियमन यावर विश्वास व उत्पादन साधनांची मालकी मोठया प्रमाणात विकेंद्रीत व्हावी अशी सहकाराची अपेक्षा असते. मालकी हक्काचे विकेंद्रीकरण, सत्तेचे विकेंद्रीकरण, आर्थिक प्रलोभना व्यतिरिक्त इतर प्रेरणा, सामाजिक कर्तव्याची जाणीव, शैक्षणिक व सांस्कृतिक मूल्यांवर भर या सर्व गुण वैशिष्ट्यांमुळे प्रत्येक व्यक्तिचे संरक्षण व गुणोत्कर्ष साधण्याचे सामर्थ्य सहकारामध्ये आहे.

सहकार ही संकल्पना, ही चळवळ सर्व प्रकारच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेस पोषक आहे. शुद्ध भांडवलवादी अर्थव्यवस्था, शुद्ध साम्यवादी अर्थव्यवस्था व या दोन समाजव्यवस्थांच्या मिश्र अर्थव्यवस्थांमध्ये सहकार सारख्याच क्षमतेने, सामर्थ्याने कार्य करू शकते. याउलट असे म्हणावेसे वाटते या दोन्ही टोकाच्या अर्थव्यवस्थेतील दोषांचे गांभीर्य कमी करण्यात सहकाराचा मौलिक व सक्रिय सहभाग आहे. पूर्ण विकसित विकसनशील आणि अविकसित अशा तीनही आर्थिक व सामाजिक व्यवस्थेमध्ये देखील सहकार चळवळ चांगल्या प्रकारे जोपासली व फोफावली. अशा वेगवेगळ्या समाजव्यवस्थेमध्ये सहकाराचे कार्य वेगवेगळ्या स्वरूपाचे असते, त्याची उद्दीष्टे आणि संघटनही वेगवेगळे असते. सर्वात महत्वाचे म्हणजे सर्व उपरोक्त विभिन्न अर्थव्यवस्थांमध्ये सहकार हा एक समर्थ पर्याय आहे. इंग्लंड, स्वीडन, व्हिएतनाम, इस्त्राइल, जपान या देशांमध्ये संरचनात्मक सुधारणा व इष्ट बदल करून त्यांच्या यथायोग्य अंमलबजावणीमुळे सहकाराची चळवळ जास्त प्रभावी व सकारात्मक भूमिका पार पाडतांना दिसते. भारतात १९९१ पासून जे नविन आर्थिक धोरण अंगिकारले त्यामध्ये समाजव्यवस्था सुधारण्याचा एक उत्तम व खात्रीशीर मार्ग किंवा एक पर्याय म्हणून देखील सहकाराचा विचार झाल्याचे प्रत्ययास येत नाही.

आंतरराष्ट्रीय सहकार संघ १९९५ - आपल्या आर्थिक आणि सामाजिक गरजांच्या तसेच ईच्छा आकांक्षाच्या पूर्ततेसाठी सर्वांनी स्वेच्छेने एकत्र येऊन एकत्रित मालकी असलेली व लोकशाही पद्धतीने नियंत्रित करता येईल अशा पद्धतीने स्थापन केलेली स्वायत्त संघटना म्हणजे सहकारी संस्था होय.

सहकार ही मूल्याधारित व्यवस्था आहे, स्वहित, कमाल नफा, साधनसंपत्तीचे केंद्रीकरण, मक्तेदारी या सारख्या संकुचित व अशाश्वत विकासाच्या तकलादू तत्वांवर आधारलेली नाही. स्वकर्तृत्व, कर्तव्य व जबाबदारीची जाणीव, लोकशाही तत्वांचा आदर (एकता व समता व समानता) यासारख्या सामाजिक मूल्यांवर तसेच



Scanned by CamScanner

प्रामाणिकपणा, सचोटी, कायदा व न्याय याबद्दल आदर, विचार व वर्तन यातील खुलेपणा, दुसऱ्यांच्याहितार्थचिंता यासारख्या नैतिक मूल्यांवर ती आधारलेली आहे. ही मूल्ये शाश्वत आणि आर्थिक, सामाजिक विकासाला पोषक आहेत.

**धनंजयराव गाडगीळ -**

''सहकाराधिष्ठित जीवनपद्धती मान्य करावयाची म्हणजे परस्पर समजुतीने व देवाणघेवाणीने कामधंद्याची व मिळकतीची योग्य वाटणी करून घेण्याची कल्पना त्यामध्ये आलीच. प्रत्येक प्रकारच्या आर्थिक हितसंबंधाची वेगळी संघटना उभारून ती कार्यान्वित करण्याची शक्यता सहकारात असल्यामुळे वेगवेगळ्या व्यवहार-व्यवसायांचे दृष्टिकोन सहकारी व्यवस्थेत स्पष्टपणे व्यक्त होऊ शकतात. गटागटांच्या, प्रदेशाप्रदेशांच्या हितसंबंधामध्ये, विविध दृष्टिकोनांचा समन्वय करून शांततेच्या व तडजोडीच्या मार्गाने विकासाकडे समाजव्यवस्था नेणारी सहकारी व्यवस्था आहे, असावी.''

**सहकाराची मूलतत्वे -**

१) खुले व ऐच्छिक सभासदत्व - सामाजिक, राजकीय, वांशिक, आर्थिक अशा कृत्रिम आधारावर भेदभाव न करता सभासदत्व मिळते. तसेच ते सभासदत्व ऐच्छिक असते. सभासदत्वामुळे येणाऱ्या जबाबदाऱ्या स्वीकारण्यास मात्र तो तयार असला पाहीजे. सहकारी संस्थांच्या मुळ उद्दीष्टांशी त्याने समरस व्हावे, त्यापेक्षा त्याचे उद्दीष्ट वेगळे असू नये.

२) लोकशाही नियंत्रण - सहकारी संस्था लोकशाही वादी असतात. सर्वांना समान अधिकार असतात. संस्थेच्या ध्येयधोरणात, निर्णय प्रक्रियेत, प्रशासनात सभासदांनी सक्रियपणे सहभागी असावे.

३) किमान नफ्याची प्रेरणा - भागभांडवलावर सभासदांना मिळणारा नफा मर्यादित असला पाहीजे. याचा अर्थ असा की सहकारी संस्थेने लोकांपेक्षा नफ्याला जास्त महत्व देऊन प्राधान्य देऊन सट्टेबाजी करण्यासाठी गुंतवणुक करू नये. सहकारी संस्थेची गुंतवणुक सर्वांच्या भल्यासाठी, हितासाठी असते.

४) सभासदांचा आर्थिक सहभाग - सहकारी संस्थेने प्राप्त केलेल्या आणि लाभांश दिल्यानंतर शिल्लक राहिलेल्या वाढव्याच्या (नफ्याचा) पुढील कारणांसाठी विनियोग केला जावा. (अ) सहकारी संस्थेच्या विकासासाठी राखीव निधी निर्माण करणे, यातील काही भाग कोणत्याही कारणास्तव वर्ग करता येणार नाही (ब) सभासदाने केलेल्या गुंतवणुकीच्या प्रमाणात लाभांशाचे वाटप करावे (क) सभासदांनी मान्य केलेल्या इतर कार्यासाठी मदत करावी.

५) स्वायत्तता आणि स्वातंत्र्य - सहकारी संस्था सभासदांच्या नियंत्रणाखाली कार्य करणाऱ्या स्वायत्त व स्वमदतीवर उभ्या राहणाऱ्या संस्था आहेत. शासन किंवा इतर कोणत्याही संस्थेशी सहकारी संस्थेने करार करतांना अथवा बाहेरून भांडवल उभे करतांना सभासदांचे लोकशाही नियंत्रण आणि संस्थेची स्वायत्तता अबाधित राखली जाईल याची दक्षता घेतली पाहिजे.

६)शिक्षण, प्रशिक्षण आणि माहिती - सहकारी संस्थेने आपले सभासद, निवडून आलेले प्रतिनिधी व्यवस्थापक आणि कर्मचारी यांना शिक्षण व प्रशिक्षण दिले पाहिजे. त्यायोगे सहकारी संस्थेच्या विकासात ते

Scanned by CamScanner

परिणामकारकपणे सहभाग घेऊ शकतील. सर्वसाधारण जनतेला, तरूणांना, जनमतावर प्रभाव पाडणाऱ्या नेत्यांना सहकाराचे स्वरूप व लाभ याबद्दल माहिती दिली पाहिजे.

**सहकाराची तत्त्वांपासून फारकत -**

दुर्दैवाने सहकारी चळवळ सहकाराच्या मुळ तत्वांपासून बरीच दूर गेलेली दिसते. त्याचे पुरावे म्हणून काही गोष्टी लक्षात घ्याव्या लागतील. स्वयंप्रेरित व खुले सभासदत्व हे सहकाराचे मूलतत्व. परंतु बऱ्याच मोठ्या सहकारी संस्थांमध्ये खुले सभासदत्व हा प्रकार व्यवहाराच्या पातळीवर अनेक मार्गांनी मर्यादित केला जातो. त्यामागे सत्ता, स्पर्धा आणि स्थानिक राजकारण हे महत्वाचे घटक ठरतात. लोकशाही तत्वाने व्यवस्थापन हे सहकाराचे दुसरे मूलतत्व. परंतु जेव्हा खुल्या सभासदत्वावर मर्यादा पडतात,सभासदत्व मर्यादित प्रमाणात स्वयंप्रेरित असते तेव्हा सोयिस्करपणे, हळूहळू हुकुमशाहीच्या प्रवृत्तीकडे वाटचाल होऊ लागते. यातूनच सत्तास्थानाला चिकटून राहणे, सभासदांचा आवाज, विचार दडपून टाकणे, संचालक मंडळाच्या सभा एकमुखी होणे अशा लोकशाहीशी विसंगत पद्धती रूढ होत जातात. तिसरी बाब अशी की बऱ्याच सहकारी संस्थांच्यामध्ये राजकीय, धार्मिक आणि जातीय दबावगट असतात. खरे तर १९३७ च्या आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या ठरावाप्रमाणे सहकारी संस्थांनी राजकीय व धार्मिक दृष्टीने तटस्थ असले पाहिजे. असे मात्र आज घडतांना दिसत नाही.सहकारी शिक्षण, प्रशिक्षण आणि प्रबोधन हा सहकारी चळवळीचा विकासाचा महत्वाचा घटक देखील दुर्लक्षित होत चालला आहे. सहकारी व्यवस्था सक्षमपणे, सातत्यपूर्ण काम करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या साधनसामग्रीची टंचाई वाढत चालली आहे. सहकारी संस्थांच्यामध्ये परस्पर सहकार अभावानेच आढळतो.

गेल्या ३० ते ४० वर्षात सहकारी संस्थांची कार्यक्षमता, लाभक्षमता, उत्पादकता यामध्ये सातत्याने घट होतांना दिसते. बंद, उत्पादन न करणाऱ्या संस्थाचे प्रमाणही वाढतांना दिसत आहे. बहुसंख्य सहकारी संस्थामध्ये स्वत:चे भांडवल नगण्य असते.कर्जाऊ भांडवलाचे प्रमाण जवळजवळ ९०% पेक्षा जास्त असते. यातूनच वरील प्रकारची दुर्बलता निर्माण होते.

सहकारी चळवळीमध्ये राजकारणाचा शिरकाव हा देखील एक चिंतेचा विषय आहे. सहकारी संस्थांचा वापर राजकीय सत्ता प्राप्तीचे साधन बनले आहे. काही राजकारणी आणि स्वार्थी लोकांनी सहकारी संस्थावर ताबा मिळवून स्वत:साठी, आपले मित्र व नातेवाईक यांच्या फायद्यासाठी सहकारी संस्थांचा दुरूपयोग केला जातआहे.

**सहकार आणि सरकार**

सहकार चळवळ ही जनतेची चळवळ असल्याने आणि दुर्बल घटकांच्या आर्थिक सामाजिक उन्नतीच्या उद्देशाने सहकार चळवळीचा उदय झाल्याने सहकार क्षेत्राला सरकारने प्रोत्साहन देण्याचे धोरण आखले याला तत्वत: आक्षेप घेता येत नाही. सहकार क्षेत्राच्या नियमनासाठी कायदे करणे व त्यांची अंमलबजावणी करणे हे सरकारचे कर्तव्य व जबाबदारीच आहे. परंतु सरकारचे प्रोत्साहन जेव्हा कायमस्वरूपी बनते, तेव्हा त्या संस्थांच्या विकासाला निश्चितपणे बाधा येते. यामुळे त्या सहकारी संस्था, सहकारी संस्था न राहता सरकार पुरस्कृत संस्था बनतात. अपरिहार्यपणे सरकारी हस्तक्षेप वाढू लागतो. सहकारी संस्थांच्या भागभांडवलापैकी सभासदांचा वाटा अत्यंत अल्प आणि उर्वरित भांडवल सहकारी बँकाकडून घेतलेले कर्ज अशा स्वरूपाचे असते. त्यामुळे सभासदांची जोखीम व जबाबदारीची जाणीव आपोआपच कमी होते व कर्ज देणारे धनकोंच अधिक जबाबदार व जोखिम सहन



Scanned by CamScanner

करणारे बनतात. सहकारी बँका सहकारी संस्थांना जे कर्ज देतात ते सरकारच्या हमीवर, यामुळे ही जोखीम अंतिमत: राज्य सरकारवर येते. आर्थिक अडचणींमुळे प्रकल्प रखडले तर ती सहकारी संस्था सहकारी बँका (धनको) आणि सरकार सर्वच अडचणीत येतात. यातही सभासदांचे भागभांडवल आणि जबाबदारी अल्प असल्याने अधिक तोटा धनको आणि सरकारला सहन करावा लागतो. खाजगी व्यापारी संस्थांना असा तोटा झाला तर जास्तीत जास्त तो स्वत:च दिवाळखोर बनतो. त्यांचे धनको त्यांच्या तोट्याला जबाबदार नसतात, एवढेच नव्हे तर भांडवलपुरवठा देखील व्यापारी संस्थेच्या क्षमतेनुसारच केला जातो. इथे मात्र सरकारने हमी घेतल्याने सहकारी बँका सहकारी संस्थांना मोठ्या प्रमाणात भागभांडवलाचा पुरवठा करतात.

सहकारी संस्थाचे नियमन करण्याचे कार्य राज्य सरकारच्या सहकार खात्यामार्फत केले जाते. हे कामही सहकार खात्यामार्फत काटेकोरपणे केले जात नाही. त्यामुळे सहकारी संस्थांचे नियमन करण्याचे कार्य राज्य सरकारच्या सहकार खात्यामार्फत केले जाते. हे कामही सहकार खात्यामार्फत काटेकोरपणे केले जात नाही. त्यामुळे सहकारी संस्थांच्या कार्यपद्धतीत दोष निर्मा होतात. राजकीय नेते, मंत्री यांचा प्रवर्तकांशी घनिष्ठ संबंध असतो. त्यामुळे निष्पक्ष नियंत्रकाची भूमिका राज्य सरकारची नसते.

सहकारी बँकाच्या बाबतीत दुहेरी नियंत्रणाची समस्या उद्‌भवते. सहकारी संस्था म्हणून राज्य सरकारच्या सहकारखात्याचे आणि एक बँक म्हणून राज्य सरकारच्या सहकार खात्याचे आणि एक बँक म्हणून रिझर्व बँकेचे अशा दुहेरी नियंत्रणामुळे परिणामकारकता कमी होते.

**जागतिकीकरणात सहकार क्षेत्रासमोरील आव्हाने व उपाययोजना :**

जागतिकीकरणाची जर काही मूलभूत तत्वे असतील तर ती आहेत 'स्पर्धा' आणि 'गुणवत्ता' दर्जेदार उत्पादने, दर्जेदार सेवा व दर्जेदार संस्थाच फक्त या स्पर्धेत टिकाव धरू शकतील. आतापर्यंत सहकार क्षेत्र हे 'विशेष संरक्षित क्षेत्र' राहीले आहे. सरकारतर्फे भांडवल, व्यवस्थापन, उत्पादन अणि विक्री या प्रत्येकच बाबतीत सहकार क्षेत्र हे खाजगी क्षेत्राच्या स्पर्धेपासून वेगळेच राहीले आहेत. मूलत: खाजगी क्षेत्राप्रमाणे 'नफाप्रधानता' हे तत्वच सहकार क्षेत्राने कधी ठेवले नाही. परंतू जागतिकीकरणात बाजारपेठेचे नियम सर्वांसाठी समान आहेत. त्यामुळे सहकारी संस्थांना देखील 'लाभप्रदता' प्राप्त करावी लागेल. ग्राहक वस्तू खरेदी करतांना हे बघणार नाही की खाजगी क्षेत्राने निर्माण केली आहे की सहकार क्षेत्राने. स्वस्त, दर्जेदार उत्पादने, विक्री कौशल्य आणि ग्राहकाभिमूखता प्राप्त करावी लागेल. व्यावसायिक दृष्टीकोन स्वीकारून लाभप्रदता, उत्पादन क्षमता व्यवस्थापन कौशल्य आणि सर्वात महत्वाचे म्हणजे विश्वासार्हता प्राप्त करण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

आंतरराष्ट्रीय श्रम संघटना देखील सहकारी संस्थांना संघ association आणि उपक्रम enterprize मानते.

सहकारी संस्थांनी संघटन प्रणाली, व्यावसायिक शिस्त आणि व्यवस्थापनाची तत्वे या तीनही घटकांमध्ये समन्वय साधून विकासाच्या दृष्टीकोनातून पावले उचलली पाहिजेत. सहकारी संस्थामध्ये निवडणुका आहेत. 'एक सभासद = एक मत' हे तत्वही पाळले जाते. परंतु केवळ निवडणुका आहेत म्हणजे लोकशाही आहे हा गैरसमज आहे. या निवडणुकीतून एक सहकाराची उत्तम जाण असलेला निस्वार्थी, कुशल, कार्यक्षम आणि दूरदृष्टि असलेला मार्गदर्शक नेता मिळाला पाहीजे जो सहकारी संस्थेला प्रतिष्ठा व नावलौकीक प्राप्त करून देईल.



Scanned by CamScanner

उदा. वर्गीय कुरीयन-अमुल.

सहकारी संस्थेचे कर्मचारी आधुनिक तंत्रज्ञानात पारंगत, व्यावसायिक कौशल्ये आत्मसात केलेले आणि व्यवस्थापन शास्त्राचे ज्ञान असलेले असावेत. यासाठी त्यांची नियुक्ती व्यावसायिक पद्धतीने व गुणवत्तेवर आधारितच व्हायला पाहिजे, संचालकाच्या मर्जीने नाही. 'सेवक' ही संस्थेची 'मालमत्ता' असावी 'देयता' नाही. २१व्या शतकातील व्यवस्थापन हे मनुष्याभिमूख झाले आहे.

जागतिकीकरणाच्या काळातील आणखीन एक महत्त्वाचे आव्हान म्हणजे 'भांडवल' सहकार क्षेत्र भांडवलाच्या बाबतीत फार मोठ्या प्रमाणात सरकारवर अवलंबून आहेत. आजच्या आधुनिक काळात सहकारी संस्था 'आत्मनिर्भर' होणे आवश्यक आहे. **त्यासाठी त्यांनी खुल्या बाजारातून भांडवल उभारावे**. यामुळे त्यांची भांडवलाची गरज तर पूर्ण होईलच.पण त्याच सोबत त्यांना आपली कार्यक्षमता व लाभक्षमता वाढविण्याची प्रेरणाही आपोआपच मिळेल. भांडवल बाजारातून पैसा उभारण्यासाठी संस्थेची प्रतिमा स्वच्छ असावी लागते. कामाचा दर्जा गुणवत्ता याही अटी आपोआपच बंधनकारक ठरतात. स्पर्धेत एकल व्यापारापासून तर सहकारी संस्थेपर्यंत स्पर्धेचे नियम सर्वांना सारखेच असतात.

२१व्या शतकात भांडवलशाही व्यवस्थेत तसेच समाजवादी व्यवस्थेत निर्माण होणारे अंतर्गत तणाव निवळण्यासाठी सहकारी संस्था हाच एकमेव पर्याय आहे.सहकार आणि स्पर्धा परस्परांच्या सहकार्याने सामाजक व्यवस्थेत उत्पादकता वाढविण्याची प्रेरणा निर्माण करू शकेल. त्यासाठी सहकारी क्षेत्राचे नेतृत्व सुजाण, सुसंस्कृत,सर्जनशील, तत्वनिष्ठ आणि प्रामाणिक असले पाहिजे.

उत्पादक सहकारी संस्थांना आता नव्या कायद्यानुसार 'कंपनी' कायद्यांतर्गत आणल्या जाणार आहे. हा कायदा ७ फेब्रुवारी २००३ पासून अंमलात आला आहे. राजकीय पुढाऱ्यांनी उभारलेली 'सहकार साम्राज्ये' यामुळे उध्वस्त होतील आणि खऱ्या अर्थाने व्यावसायिकता येईल. सदर कायदा वर्गीस कुरीयन आणि वाय.के.अलघ यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आला आहे. त्याची परिणामकारकता हळूहळू सिद्ध होईल. सहकारी चळवळीला सरकारी नियंत्रणातून काही प्रमाणात खुलेपणा प्राप्त होईल.

### संदर्भसूची

१. 'सहकारी लोकराज्य' - धनंजयराव गाडगीळ

२. सहकारी चळवळीचे समालोचन - सुलभा ब्रम्हे

३. अर्थसंवाद त्रैमासिक (ऑक्टो-डिसेंबर २००४) मराठी अर्थशास्त्र परिषद

४. Management Challenges or 21stCentury Peterf. Drucker

✦✦✦



Scanned by CamScanner

# "बारावा वित्त आयोग व राज्यांची आर्थिक स्थिती"

प्रा. प्रदिप लेले
भारतरत्न इंदिरागांधी नू.
कॉलेज कन्हान

भारतात नियोजन आयोगाची स्थापना मार्च १९५० मध्ये करण्यात आली. त्याच बरोबर नियोजन आयोगाच्या मदतीला देशतील निर्माण होत असलेल्या वित्तीय संसाधनाचे न्याय वितरण व्हावे. याकरिता घटनेच्या कलम २८०(॥ ) नुसार वित्त आयोगाचे अस्तित्व निर्माण करण्यात आले. प्रत्येक पाच वर्षाच्या कालावधी करिता वित्त आयोगाची स्थापना केली जाते. त्यामुळे वित्त आयोगाच्या शिफारशी केंद्र व राज्य सरकारांना बंधन कारक ठरते.

वित्त आयोगाचा पूर्व इतिहास बघितल्यास असे दिसून येते की, पहिले वित्त आयोग, १९५२ साली अस्तिवात आले व त्याचे अध्यक्ष के.सी. नियोगी हे होते. नंतरच्या प्रत्येक पाचवर्षाकरीता वित्त आयोगाचे गठण करण्यात आले या प्रमाणे दुसऱ्या वित्त आयोगाचे अध्यक्ष के. संथामण हे होते. अशा प्रकारे अे.के. चंदर, पी.व्हि. राजमन्ना, महाबीर त्यागी, के ब्रम्हानंद रेड्डी , जे.एम. शेल्ट, वाय.बी. चव्हाण, एन के.पी. साळवे, के.सी.पंत, अे.एम. खुसरो व वर्तमान बाराव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष व माजी रिझर्व्ह बँकेचे गर्व्हनर डॉ.सी.आर. रंगराजन हे आहेत. यांचा एकूण कार्यकाळ २००५ ते २०१० असा आहे.

**राज्यातील वित्तीय प्रवृत्ती**

१९८६-८७ पूर्वी राज्यांची महसूली तुट कमी होती व ती तुट निर्माण झाली तरी ती काही प्रसंगाकीता निर्माण होत असे. परंतु १९८७-८८ नंतर मात्र सर्वच राज्यांची महसूली तुट ही अंदाजपत्रकातील नेहमीची बाब झाली व या तुटीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे नंतरच्या काळात सकल घरेलू उत्पादनाच्या तुलनेत तुट वाढत गेल्याचे स्पष्ट होते. १९९७-९८ ते २०००-०३ या कालवधीत सर्वच राज्यसरकारांच्या महसुली तुटीत मोठ्याप्रमाणावर कधी नव्हे एवढी तुट निर्माण झाली. या कालावधीत वेतन देयकात ६०% पेक्षाही जास्त वाढ घडून आली याच कालावधीत केंद्रांकडून राज्यांना दिले जाणारे अनुदान व साह्य यात घट झाली व राज्यांनी विविध करातून सुट देणाऱ्या सवलतीच्या स्पर्धेतून आपली स्वत:ची प्राप्ती कमी केली. म्हणून मागील काही दशकात राज्यांचे राजकोषीय व्यवस्थापन सतत दुर्बल होत गेलेले दिसून येते. देशातील सर्वच राज्यांच्या खर्चात अमाप वाढ तर महसूली प्राप्तीत घट परिणामत: राज्यांचे कर्जाकरीता केंद्रावर अवलंबून राहण्याच्या प्रमाणात वाढ होत गेली. १९९१-९२ मध्ये राज्यांचा खर्च १०,७९,२९० दसलक्ष रूपये इतका होता. तो २००१ मध्ये ३४,७१,९९० दस लक्ष रूपये म्हणजे ९१-९२ च्या तुलनेत ३ पट जास्त झालेला आढळतो. ही वाढ ५% जास्त आहे. वाढत्या एकूण खर्चाबरोबर राज्य सरकारचे महसूली खात्यावरील खर्च देखील तीव्रगतीने वाढत गेलेला दिसून येतो. १९९१-९२ मध्ये हा खर्च ८,६१,८६० दसलक्ष रूपये इतका होतो तो २००४-०५ मध्ये ४१,५६,८७० दस लक्ष रूपये इतका झाला ही वाढ देखील ५% जास्त आहे. विकासोत्तर खर्चात देखील मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. महसूली खर्चातील वाढीबरोबर हा खर्च त्याच प्रमाणात वाढत गेल्याचे स्पष्ट होते. १९९१-९२ मध्ये विकासोत्तर खर्चाचे महसूल खर्चाशी असलेले प्रमाण ३१.५% इतके होते. ते २००४-०५ मध्ये वाढून ४७.९% इतके झाले.



Scanned by CamScanner

१९९१-९२ मध्ये, विकासोत्तर खर्च २,७१,४३० दस लक्ष रूपये ते २००१-०२ मध्ये वाढून १३,८०,८०० दसलक्ष रूपये झाले. २००४-०५ च्या अंदाजपत्रकानुसार यातील वाढ १९,९०,६५० दसलक्ष रूपये इतकी होती. १९९१-९२ च्या तुलनेत ही वाढ ७ पटीपेक्षाही जास्त असलेली दिसून येते.

राज्यांचा महसूली खात्यावरील मोठ्या प्रमाणावर वाढता खर्च हा प्रामुख्याने व्याजाचा भरणा, प्रशासकीय खर्च व पेन्शन या अनेक कारणामुळे घडून आलेला दिसतो. १९९१-९२ मध्ये व्याजापोटी देण्यात येणारी निव्वळ रक्कम १,०९,४४० दसलक्ष रूपये इतकी होती. ती २००१-०२ मध्ये ६,२५,०६० दस लक्ष इतकी झालेली आढळते. तर हीच रक्कम २००४-०५ मध्ये ९,१६,४८० दसलक्ष रूपये इतकी झाली. व्याजापोटी देण्यात येणाऱ्या एकूण महसूली खर्चातील वाटा १९९१-९२ मध्ये १२.७% इतका होता. यामध्ये वाढ होऊन तो १७.३% इतका झाला तर २००४-०५ मध्ये हे प्रमाण २२% इतके झाले. प्रशासकीय खर्च व पेन्शन व्यय यात देखील मोठ्या प्रमाणात वाढ झाली. १९९१-९२ मध्ये ह्या खर्चाचे प्रमाण १.२२.८९० दसलक्ष रूपये इतके होते. ते २००१-०२ मध्ये ५,९६,४७० दसलक्ष इतके झाले. २००४-०५ मध्ये ह्या खर्चात वाढ होऊन ते ८,३२,६२० दसलक्ष रूपये झालेले आढळते. व्याजाचा भरणा व प्रशासकीय खर्च व पेन्शन या दोन घटकाचा महसूली खात्यावरील एकूण खर्चाच्या प्रमाणात २७% इतका वाटा होता. २००१-०२ मध्ये, त्यात ३८.८% इतकी वाढ झाली. तर २००४-०५ मध्ये ही वाढ ४२% इतकी झाली. विविध राज्यामध्ये निर्माण झालेल्या संकटग्रस्त स्थितीमुळे राज्यांचे महसूली खात्यावरील खर्चाचे प्रमाण सतत वाढत गेले. त्यामुळे राज्यांना विविध ठिकाणाहून कर्ज घेणे अगत्याचे झाले. परिणामत: विविध राज्यामध्ये महसूली खात्यावरील कर्ज व वित्त खर्चाचे प्रमाण सतत वाढत गेल्यामुळे राज्यांचे राजकोषीय व्यवस्थापन पूर्णत: कोसळलेले दृश्यास येते. वाढलेल्या खर्चाची तोंड मिळवणी करण्याकरीता राज्यसरकारांनी पुन्हा कर्ज घेण्यास आरंभ केला आणि या कालावधीत राज्यांचे केंद्रावरील अवलंबून असण्याच्या प्रमाणात सतत वाढ होत गेल्याचे दिसून येते. केंद्राला मिळणाऱ्या करातील राज्यांचा वाटा १९९१-९२ मध्ये ३,२०,७४० दस लक्ष रूपये होता. तो वाटा २००१-०२ मध्ये ९,५२,९७० दस लक्ष इतका झालेला आढळतो. ओरीसा, पं.बंगाल व पंजाब या राज्यांना आपल्या एकूण महसूली उत्पन्नातून ३५% पेक्षा जास्त रक्कम व्याजाचा भरणा करण्यासाठी खर्च करण्यात येत होती. हिमाचल प्रदेश, राजस्थान व उत्तरप्रदेश या राज्यांचा खर्च २८ ते ३५% इतका होता. राज्यांना देण्यात येणाऱ्या साह्यक अनुदानामध्ये देखील भरमसाठ वाढ झालेली दिसून येते. २००४-०५ मध्ये ही रक्कम १३,६४,३७० दसलक्ष रूपये इतकी होती. १९९१-९२ च्या तुलनेत ही रक्कम ४ पट जास्त होती. याच कालावधीत असे दिसून येते की, राज्यांचे करातील योगदान व केंद्रीय करातील प्रमाण व अनुदान हे एकूण महसूली प्राप्तीच्या एक तृतीयांश पेक्षाही जास्त होते. परीणामत: राज्यांचे केंद्रावरील अवलंबून असण्याच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत गेली. केंद्राकडून राज्यसरकारकडे होणारे हस्तांतरण १९९१-९२ मध्ये, ४,६२,०१० दस लक्ष रूपये इतके होते. ते २००३-०४ पर्यन्त १४,४८,०६० दस लक्ष इतके वाढलेले दिसून येते. हस्तांतरणाच्या या योगदानाने राज्यांच्या खर्चात वाढ झाली असे असले तरी, राज्यांना होणाऱ्या हस्तांरणाच्या प्रतिशत प्रमाणात अलीकडील काळात एकूण खर्चात घट झालेली आढळते. राज्य सरकारांची महसूली प्राप्ती ज्यामध्ये केंद्रांकडून राज्यांना करामधील दिला जाणारा वाटा व साह्यक अनुदाने यांचा समावेश असतो. राज्यसरकारांची इतक्या प्रमाणावर महसूली प्राप्ती असली तरी राज्यांचा खर्च व प्राप्ती यांचा मेळ बसलेला दिसत नाही. राज्यांची महसूली तुट १९९४-९५ पासून ते १९९७-९८ पर्यंत १,६३,३३० दसलक्ष इतकी होती. तर २००३ पर्यन्त यामध्ये वाढ होऊन ती ६,१३,०२० इतकी झाली. सकल घरेलू उत्पादनाच्या तुलनेत महसूली तुट वाढत गेल्याचे दिसून येते. १९९१-९२ मध्ये हि तुट ०.९% इतकी होती. ती १९९९-२००० मध्ये २.८%



Scanned by CamScanner

इतकी झाली तर २००२-०३ मध्ये, ती २.५% इतकी झाली. राज्य सरकारची वाढती महसूली तुट लक्षात घेता राजकोषीय तुट व महसूली तुट चे प्रमाण वाढत गेल्याचे दिसून येते. १९९१-९२ राजकोषीय तुट २९.९% इतकी होती; ती १९९८-९९ मध्ये ५८.८% इतकी झाली. २००१-०२ मध्ये ती तुट ६१.७% तर २००२-०३ मध्ये ही तुट ५२.५% इतकी झाली. २००३-०४ मध्ये तुटीत घट होऊन ती ४५% इतकी झाली. या सर्वांचा परिणाम राज्यांचे राजकोषीय व्यवस्थापन पूर्णतः कोसळलेले आढळते. राज्यांच्याया ढासळलेल्याराजकोषीय व्यवस्थापणामुळे राजकोषीय तुटीत वाढ झाली.

राज्यांची राजकोषी तुट १९९१-९२ मध्ये १,८९,०००दसलक्ष रूपये इतकी होती. १९९६-९७ मध्ये ती ३,७२,५१० इतकी झाली. १९९८-९९ मध्ये ७,४२,५४० इतकी झाली. २००३-०४ या कालावधीत ११,६७,३०० दसलक्ष इतकी झाली. खालावलेल्या किंवा ढासाळलेल्या राजकोषीय व्यवस्थापनामुळे हे स्पष्ट होते निदर्शनास येते की, १९९१-९२ राजकोषीय तुट सकल घरेलू उत्पादनाच्या २.९% इतकी होती ती १९९९-२००० मध्ये वाढून ४.७% इतकी झाली. २००५-०६ च्या अंदाजपत्रकात ही तुट ४.५% इतकी आढळते. २००७ ते ०९ या कालावधीत या तुटीचे प्रमाण केवळ ३५% इतके राहणार आहे तर याच कालावधीत महसूली तुट ०% पर्यन्त कमी करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. राज्यांचे कर्जासाठी केंद्रसरकारवर अवलंबून असण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. त्याचबरोबर बाजारातून कर्ज घेण्याच्या प्रमाणातही वाढ झालेली आढळते. राज्यांच्या एकूण दायित्वात मागील काही वर्षात वाढ झाल्याचे दिसून येते. १९९१-९२ मध्ये राज्यांचे एकूण दायीत्व हे १२,६३,३८० दस लक्ष रूपये होते. १९९७-९८ मध्ये ते २८,१२,०७० दसलक्ष रूपये इतके झाले. १९९८-९९ मध्ये ३४,१९,७८० व २००२-०३ मध्ये ६९,४२,८९० तर २००३-०४ मध्ये, ते ७९,०७,०२० दसलक्ष रूपये इतके झाले. देयतेच्या वाढीच्या ह्या प्रवृत्तीतुन हे स्पष्ट होते की राज्यांची आर्थिक स्थिती ही एकूणच दुर्बल व्यवस्थापनाचा परिणाम होय.

राज्यांच्या देयतेत वाढ होण्या बरोबर ऋण व अग्रीम केंद्रांकडून प्राप्त केल्यावरही बाजारातून कर्ज घेण्याच्या प्रमाणातही दिवसेंदिवस वाढ होत आहे. मार्च १९९२ ते मार्च २००४ या कालावधीत कर्जातील वाढ ८,३४,९१० दसलक्ष रूपयावरून २५,३४,६४० दसलक्ष रूपयापर्यंतवाढलेले दिसून येते. याच बरोबर केंद्राकडून घेतलेल्या ऋण व अग्रीम यामध्ये पूर्वपिक्षा तिपटीने वाढ झालेली दिसून येते तर बाजारतून उचललेल्या कर्जात सातपटी पेक्षाही वाढ झाल्याचे दिसून येते. बाजारातुन उचललेल्या ऋणाची किंवा कर्जाची रक्कम १,८९,३३० दसलक्ष रूपयापासून तर १३,९२,३६० रूपया पर्यन्त वाढलेली दिसून येते. याच कालावधीत राज्यांची देयता सकल घरेलू उत्पादनाशी १९.३% वरून २८.८% पर्यन्त वाढलेली दिसते. वरील सर्व आकडेवारी वरून हे स्पष्ट होते की, राज्यांची राजकोषीय स्थिती अत्यंत नाजूक झालेली असून राजकोषीय स्थितीच्या आरोग्यात सुधारणा घडून आणणे आवश्यक आहे. राज्यसरकारांचा खर्च मुख्यतः महसूल लेख्यावरील खर्च, एकीकडे सातत्याने वाढत गेल्याचे दिसून येते. तर त्यातुलनेत महसूली प्राप्तीत वाढ झाल्याचे दिसत नाही. राज्यांचे केंद्रांवर अवलंबून राहणे व त्यामुळे कर्जात सतत वाढ होते. हे नियमीत पणे असलेली प्रवृती आढळून येत आहे. २००४-०५ मध्ये कर पासूनची राज्याची प्राप्ती एकूण सकल घरेलू उत्पादनाच्या ६% पेक्षाही कमी तर कररहीत उत्पन्नापासूनची प्राप्ती १.२% पेक्षा कमी आढळते. राज्याचे सरासरी कर्ज सकल घरेलू उत्पादनाच्या ३०.३% इतके दिसून येते. देशातील सर्वच राज्यांची खालावलेली आर्थिक स्थितीत सुधारणा घडवून यावी याकरिता केंद्रसरकारने बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येते. २००२-०३ मध्ये, केंद्र सरकारने "कर्जाच्या बदल्यातील योजना" सुरू केली होती. ज्यामुळे राज्यांच्या व्याज देयतेत घट होईल व परिणामतः जे ऋण राज्यांनी घेतले आहे त्याची

परतफेड १३% च्या व्याजदराने व लहान स्वरूपात कुपन धारण करून लहान बचतीतून हस्तांतरण व बाजारातून अतिरीक्त उचलकरणे त्यांना शक्य होईल. १०,००,००० दस लक्ष रूपयाचे ऋण १९९९ पूर्वी कमी करण्यात आले होते व ते कर्जाच्या बदल्यातील योजनेकडे २००४-०५ मध्ये स्थानांतरीत केले होते. राज्याने अशा प्रकारे प्रथमवर्षात एकूण ऋण १,३७,१६० दस लक्ष रूपये, २००३-०४ मध्ये ४,८५,६६० दसलक्ष रूपये व उर्वरीत ४,१६,६८० दसलक्ष रूपये, स्थानांतरीत करण्यात आले होते.

१२व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यसरकारांना त्यांनी घेतलेल्या देय कर्जाच्या खर्चात कपात करावयाची असल्यास राज्य सरकारे नवीन योजनेचा फायदा घेऊ शकतात. ज्यामध्ये ऋणाचे एकत्रिकरण करून व त्याच्या परत फेढीची सुरूवात कमी व्याजदरावर करणे अशी शिफारस करण्यात आली. असे असले तरी या योजनेचा फायदा राज्य सरकारांना तेव्हांच घेता येईल जेव्हा राजकोषीय दायित्वा संदर्भात योग्य असा कायदा राज्य सरकार पारीत करेल जे बाराव्या वित्त आयोगाद्वारे सुचीत करण्यात आले होते व जे राज्य सरकारने आहे त्याच स्थितीत स्विकारले होते व या योजनेची सुरूवात कायद्याची अंमलबजावणी झाल्यानंतरच करण्याचे निश्चित करण्यात आले होते. या संदर्भात कायदा तयार करून त्याची अमलबजावणी करण्यामध्ये, कर्नाटक, केरळ, पंजाब, राजस्थान, तामिळनाडू, उत्तरप्रदेश यांनी पूढाकार घेतला. मध्यप्रदेश सरकारने देखील २००५ मध्ये, राजकोषीय दायीत्व व अंदाजपत्रक व्यवस्थापन कायदा अस्तित्वात आणला व उर्वरीत राज्यसरकारांनी १ एप्रील २००६ पासून कायदा तयार करावा व उपरोक्त पद्धतीचा स्विकार करवा असे ठरविण्यात आले. १२व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्राद्वारे राज्यांना दिले जाणारे कर्ज, ज्याचे मुल्य १२,८७,९५० दसलक्ष रूपये होते त्याचे एकत्रीकरण करणे व पुन्हा कर्ज म्हणून पुढील २० वर्षात ७.५% व्याजदराने त्याची परतफे ड करणे. याशिवाय २००८-०९ पर्यन्त महसूली तुट समाप्त करण्यासाठी सर्वच राज्यसरकारानी राजकोषीय दायीत्व व अंदाजपत्रकीय व्यवस्थापन सारखा कायदा अस्तित्वात आणावा व सर्वच उर्वरीत कर्जाचे समायोजन करावे असे ठरविण्यात आले. या शिवाय केंद्रांची राजकोषीय तुट ही सकल घरेलू उत्पादनाच्या ३% असावी.

१२व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र सरकार द्वारे राज्यसरकारांना हस्तांतरीत रकमेचा एकूण वाटा ७४% जो विविध करातील स्वरूपात व साह्यक अनुदानाच्या स्वरूपात दिल्याजातो; त्याची एकूण रक्कम २००५ ते २०१० पर्यन्त ७५,५७,५१० दसलक्ष रूपये इतकी निश्चित करण्यात झाली. अकराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार ही रक्कम २००० ते ०५ करीता ४३,४९,०५० दसलक्ष रूपये इतकी निश्चीत केली होती. ११ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीच्या तुलनेत, साह्यक अनुदाने व राज्यांचा करातील वाटा यांच्या प्रमाणात बाराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीच्यातुलनेत, साह्यक अनुदाने व राज्यांचा करातील वाटा यांच्या प्रमाणात बाराव्या वित्त आयोगाने क्रमश: १४३% व ६३% वाढ सुचविली आहे. अशाप्रमारे हस्तांतरणाची रक्कम वाढवून व राज्याच्या देय कर्जात सवलत देऊन सर्व राज्याची वित्तिय हलाखीची स्थिती भविष्यात सुधरेल असे अंदाज वर्तविल्यास चुक ठरणार नाही. भूतकाळाकडे बघितल्यास आपणाला हे दिसून येते की, राज्यांची कमी अधिक प्रमाणात आर्थिकदृष्ट्या खालावलेल्या स्थितीतून वर येण्यासाठी अधिकाअधिक उसणवारी करून त्याचा अधिक हिस्सा भांडवली खर्चाच्या ऐवजी चालू खर्चासाठी उपयोगात आणला. परिणामत: महसूली तुट ही वित्तिय तुटीच्या प्रमाणात अधिक जलद गतीने वाढली. या सर्व व्यवस्थेत भांडवली खर्चाकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. १९८० मध्ये एकूण खर्चाच्यातुलनेत भांडवली खर्च २०% असावा असे स्पष्ट होते. परंतु १९९० पर्यंत भांडवली खर्चातील वाढ १०% पेक्षा अधिक होऊ शकली नाही.

अशा प्रकारे प्राप्ती (महसूल) खर्च, दायित्व या तीन घटकासाठीच पूर्णपणे महसूल प्राप्तीचा उपयोग



Scanned by CamScanner

झाला. काही राज्यामध्ये तर वेतनावरील खर्च, पेन्शन व व्याजदर यांच्या शोधनावर एकूण मिळकतीच्या ८५% खर्च करण्यात आला. काही राज्यात हा खर्च १००% इतका होता. अशा स्थितीत हस्तांतरणाची मर्यादा वाढविल्यावर देय कर्जातील सवलत दिल्यावरही अनेक राज्य सरकारे आपल्या वित्तीय संकटातून बाहेर येतील किंवा नाही याची निश्चित हमी देता येत नाही. याकरिता स्वत: राज्य सरकारानांच कडक आर्थिक शिस्तीचे पालन करणे योग्य ठरेल. अनेक असे क्षेत्र आहे की, राज्यसरकारे त्या खेत्रातून जास्त निधी निर्माण करू शकतात. उदा कर व कर रचनेतील बदल प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करातील वाटा याकरीता राजय सरकारांनी समोर यावे व कर सकल घरेलू उत्पादनाचे प्रमाण निश्चित करावे. त्याच बरोबर करोत्तर संसाधनात सुधारणा घडून आणणे गरजेचे आहे. यामध्ये ''उपयोग खर्च''(User change) जनतेकडून प्राप्त करणे गरजेचे झाले आहे. यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे राज्यांच्या ऋण किंवा कर्ज धोरणात आवश्यक तो बदल करून सुधारणा घडून आणणे आवश्यक आहे. ज्या मध्ये कर्ज ज्या कार्यासाठी घेतले आहे त्याकरीताच त्याचा उपयोग करणे व त्या क्षेत्रातून नविन उत्पादकता निर्माण करणे गरजेचे झाले आहे. असे केल्यास कर्जाची परतफेड करणे सोयीचे होईल व व्याज दराचा देखील भार वाढणार नाही. शेवटी असेच म्हणवे लागेल की, राज्याद्वारे होणारा अनाठायी खर्च नियंत्रीत करावा व काही खर्चात कपात करावी. असे करण्यासाठी राज्य सरकारांनी तयारी दर्शविणे व प्रत्यक्षात ती योजना राबविणे गरजेचे आहे असे प्रत्यक्ष स्वरूपात त्याचे पालन केल्याशिवाय कोणतेही राज्य वित्तीय संकटातून बाहेर येणे शक्य होणार नाही. तेव्हाच ''राजकोषीय दायित्व व अंदाजपत्रकीय व्यवस्थापन कायदा'' याचे फलीत पाहवयास मिळेल.

**तक्ता क्रमांक 1**

**राज्यांचे निवडक वित्तीय निर्देशक**

(रूपये दश लक्षामध्ये)

| वर्ष | एकूण खर्च | महसूली लेख्यावरील खर्च | व्याजाचे शोधन | विकासोत्तर खर्च | प्रशासकीय खर्च व पेन्शन |
|---|---|---|---|---|---|
| 1991-92 | 10,79,290 | 8,61,860 | 1,09,440 | 2,71,430 | 1,22,890 |
| 1992-93 | 11,93,350 | 9,62,050 | 1,32,100 | 3,21,040 | 1,46,160 |
| 1993-94 | 13,46,490 | 10,93,760 | 1,58,010 | 3,80,200 | 1,74,720 |
| 1994-95 | 16,15,540 | 12,84,400 | 1,94,130 | 4,95,560 | 2,35,910 |
| 1995-96 | 17,75,840 | 14,50,040 | 2,19,320 | 5,53,800 | 2,62,250 |
| 1996-97 | 20,27,690 | 16,89,500 | 2,55,760 | 6,20,950 | 2,84,650 |
| 1997-98 | 22,81,350 | 18,66,340 | 3,01,130 | 7,17,670 | 3,20,790 |
| 1998-99 | 26,63,610 | 22,09,000 | 3,58,740 | 8,68,740 | 3,80,830 |
| 1900-00 | 31,38,890 | 26,09,980 | 4,51,720 | 11,02,060 | 4,86,570 |
| 2000-01 | 34,71,990 | 29,15,220 | 5,17,020 | 11,88,870 | 5,38,830 |
| 2001-02 | 37,73,120 | 31,48,630 | 6,25,060 | 13,80,800 | 5,96,470 |
| 2002-03 | 41,94,500 | 32,25,630 | 6,99,660 | 15,02,640 | 6,23,390 |
| 2003-04 | 55,19,560 | 39,95,410 | 8,37,250 | 17,68,210 | 6,97,620 |
| 2004-05 | 54,28,240 | 41,56,870 | 9,16,480 | 19,90,650 | 8,32,620 |

स्त्रोत - रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया संख्यात्मक विश्लेषण २००३-०४



Scanned by CamScanner

तक्ता क्रमांक 2

राज्यांचे केंद्रावरील अवलंबन

(रूपये दश लक्षामध्ये)

| वर्ष | साधनांचे केंद्राकडून राज्याकडे हस्तांतरण | राज्यांचा एकूण खर्च | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1991-92 | 4,62,010 | 10,79,290 | 42.8 |
| 1992-93 | 5,18,000 | 11,93,350 | 43.4 |
| 1993-94 | 5,84,600 | 13,46,490 | 43.4 |
| 1994-95 | 6,39,440 | 16,15,540 | 39.6 |
| 1995-96 | 7,04,890 | 17,75,840 | 39.7 |
| 1996-97 | 8,26,370 | 20,27,690 | 40.8 |
| 1997-98 | 8,87,290 | 22,81,350 | 38.9 |
| 1998-99 | 8,09,240 | 26,63,610 | 30.4 |
| 1900-00 | 9,47,800 | 31,38,890 | 30.2 |
| 2000-01 | 11,01,190 | 34,71,990 | 31.7 |
| 2001-02 | 12,04,150 | 37,73,120 | 31.9 |
| 2002-03 | 13,01,190 | 41,94,500 | 31.0 |
| 2003-04 | 14,48,060 | 55,19,560 | 26.2 |

स्त्रोत - रिर्झव्ह बँक ऑफ इंडिया संख्यात्मक विश्लेषण २००३-०४

तक्ता क्रमांक 3

राज्यांच्या महसूली खात्यावरील खर्च व प्राप्ती

(रूपये दश लक्षामध्ये)

| वर्ष | राज्यांची एकूण महसूली प्राप्ती | केंद्रातील करात व अनुदानातील वाटा | महसूली खर्च |
|---|---|---|---|
| 1991-92 | 8,05,350 | 3,20,740 | 8,61,860 |
| 1992-93 | 9,10,900 | 3,83,390 | 9,62,050 |
| 1993-94 | 10,55,640 | 4,35,400 | 10,93,760 |
| 1994-95 | 12,22,840 | 4,48,890 | 12,84,400 |
| 1995-96 | 13,68,030 | 5,00,490 | 14,50,040 |
| 1996-97 | 15,28,360 | 5,81,930 | 16,89,500 |
| 1997-98 | 17,03,010 | 6,46,340 | 18,66,340 |
| 1998-99 | 17,64,480 | 6,32,840 | 22,00,900 |
| 1900-00 | 20,72,010 | 7,47,440 | 26,09,980 |
| 2000-01 | 23,79,530 | 8,85,180 | 29,15,220 |
| 2001-02 | 25,56,750 | 9,52,970 | 31,48,630 |
| 2002-03 | 27,73,900 | 10,09,100 | 33,25,630 |
| 2003-04 | 32,73,010 | 12,41,880 | 39,95,410 |
| 2004-05 | 36,74,280 | 13,64,,370 | 41,56,870 |

स्त्रोत - रिर्झव्ह बँक ऑफ इंडिया संख्यात्मक विश्लेषण २००३-०४



Scanned by CamScanner

तक्ता क्रमांक 4

राज्य सरकारांची महसूली व एकूण राजकोषीय तुट

(रूपये दश लक्षामध्ये)

| वर्ष | एकूण राजकोषीय तुट | महसूली तुट | प्रतिशत प्रमाण |
|---|---|---|---|
| 1991-92 | 1,89,000 | 56510 | 29.9 |
| 1992-93 | 2,08,920 | 51140 | 24.5 |
| 1993-94 | 2,05,960 | 38120 | 18.5 |
| 1994-95 | 2,76,970 | 61560 | 22.2 |
| 1995-96 | 3,14,260 | 82010 | 26.1 |
| 1996-97 | 3,72,510 | 1,61,140 | 43.3 |
| 1997-98 | 4,42,000 | 1,63,330 | 37.0 |
| 1998-99 | 7,42,540 | 4,36,420 | 58.8 |
| 1900-00 | 9,14,800 | 5,37,970 | 58.8 |
| 2000-01 | 8,95,320 | 5,35,690 | 59.8 |
| 2001-02 | 9,59,860 | 5,92,330 | 61.7 |
| 2002-03 | 11,67,300 | 6,13,020 | 52.5 |
| 2003-04 | 10,88,610 | 4,90,080 | 45.0 |

References


1) Reserve Bank of India handbook of Statistics on the Indian Economy 2003-04
2) Public Finance - Chakaravarty and others
3) The Indian Economic Association - Deteriorating Fiscal management of state in India - P.K. Bargav
4) The Indian Economic Association - TWEIFTN FINANCE COMMISSION AND TRENDS OF ECNTER AND STATE FINANCES Thakur and Singh
5) राजस्व - सु.रा. ओझरकर


✦✦✦



Scanned by CamScanner

# "मॉल संस्कृतीतील विदेशी गुंतवणूक व भारतीय किरकोळ व्यापार"

नलिनी रामचंद्रराव खडसे
आदर्श विद्यालय व कनिष्ठ
महाविद्यालय कचारी सावंगा

भारतीय लोकांचा आवडता विषय म्हणजे खरेदी. जगातील अनेक देशांचे सर्वेक्षण केल्यानंतर असे आढळले की भारतीय लोकांचा आवडता छंद म्हणजे खरेदी करणे हा आहे. महिन्यातुन एकदा तरी कुटुंबात खरेदी झालीच पाहिजे असा सर्वांचा कटाक्ष असतो. खरेदी करण्यास साधारणत: बाजारात फिरूनच आपल्या आवडी निवडीनुसार खरेदी करण्यात येते. विशेषत: महिलांना बोलण्यासाठी अतिशय जिव्हाळ्याचा विषय जर कोणता असेल तर 'खरेदी' हाच असेल. महिला आणि त्यांच खरेदीशास्त्र यांच्या बद्दल कोणी कितीही बोलले तरी ते कमीच पडेल कारण त्यांना नेमकी कोणती गोष्ट कशा रूपात कोणत्या किंमतीत कुठल्या रंगात खरेदी करायला आवडेल हे सांगणे कठीणच कारण दहा दुकाने फिरून बरेचशे प्रकार बघुन वाजवी किंमत ठरवुनच बाजारात खरेदी होते. परंतु अनेक दुकाने फिरण्याच्या या त्रासापायी वेळ व पेट्रोल खर्च होतो व शेवटी हवी तशी वस्तु जर मिळाली नाही तर अस्वस्थता व पुन्हा चवकशी, चिडचीड तसेच पुरूषांनाही आजच्या (बिझीलाईफ) धकाधकीच्या जीवनात मनाजोगी खरेदी कमी वेळात व मोजक्या पैशात करायला आवडते, म्हणुनच आज ती गरज पूर्ण करण्यास 'मॉल' सुसज्ज होत आहे. 'मॉल' संस्कृतील सर्व गरजा एकाच ठीकाणी, कमी वेळात व कमी पैशात पूर्ण करता याव्या या हेतुनच मॉलची निर्मिती करण्यात आलेली आहे. 'मॉल' म्हणजे जणु स्वर्गच.

सध्या रीटेल क्षेत्रातील धुम लक्षात घेता चहुकडे मॉलच मॉल उभे राहत आहेत. धावत्या जगाची गरज ओळखुन तसेच खरेदिदार व विक्रीदार या दोघांचीही गरज ओळखुन मोठ्यामोठ्या कंपन्यांनी मॉल निर्माण करण्याचे ठरविले आहे. बरेचदा विक्रीदाराला त्याच्या मालाला योग्य भाव न मिळाल्यामुळे माल खराब होतो किंवा व्यापाऱ्याला अतिशय कमी किंमतीत माल द्यावा लागतो तो व्यापारी त्यावर फार मोठ्या प्रमाणात नफा मिळवतो. उत्पादकाला त्यामुळे उत्पादन करणे परवडत नाही तसेच ग्राहकांनाही जास्त किंमत देऊन ती वस्तु खरेदी करावी लागते. मधला व्यापारी वर्ग खुप फायदा उचलतो. या व्यापारीवर्गाची ही अरेरावी संपण्यासाठीच आणि ग्राहकाला प्रत्यक्ष विक्रीदार किंवा उत्पादकाकडुन वस्तु कमीतकमी भावात मिळतील हा उद्देश समोर ठेवुनच मॉलची निर्मिती करण्यात आलेली आहे.

'मॉल' म्हणजे काय ? भारतीय किरकोळ व्यापारात वेळोवेळी मोठ्यामोठ्या कंपन्यांनी उत्पादनाच्या क्षेत्राप्रमाणे जरी क्रांती करायचे ठरविले आहे. देशी व विदेशी अनेक कंपन्यांनी औद्योगिक क्षेत्रात क्रांती घडवुन आणली आहे. कारण देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी 'एसइझेड' विशेष आर्थिक विभाग सुरू करण्याचे धोरण केंद्र सरकारने २००० साली तत्वत: स्वीकारले आणि त्याची अमलबजावणी २००६ सालापासुन सुरू झाली. पूर्वी या धोरणास आयात निर्यात धोरण म्हणुन ओळखले जात होते. आता याकडे 'परकीय व्यापार धोरण' किंवा 'आंतरराष्ट्रीय व्यापार' म्हणुन ओळखले जाते. या धोरणानुसारच आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील अनेक देश विदेश या धोरणात सहभागी होऊन एका आंतरराष्ट्रीय बाजाराची निर्मीती करित आहेत त्यात सर्वच देशातील उत्पादक सहभागी होऊ शकतील व वेगवेगळ्या क्वालिटीचा माल सर्वांनाच कमी भावात मिळेल हेच यामागचे उद्दिष्ट.



Scanned by CamScanner

मॉल मध्ये सर्वच प्रकारच्या जीवनावश्यक व वेगवेगळ्या तऱ्हेच्या वस्तु विक्रीला ठेवल्या जातील. छोट्या पिन टाचणी पासून तर मोठ्या मशीन, कपडे, दागिने, सामान, जोडे. वेगवेगळ्या बॅगस, सुटकेस, कपाटे, अलमारी, शोकेसेस, घरगुती, शेतीची साधने, स्वयंपाकाच्या वस्तु, भांडी, दिवाणखान्याचे समान, स्त्रीपुरुषांचे वेगवेगळे कपडे, फॅशननुसार दागिने, कडधान्य, फळे, भाजीपाला, औषधे, गाड्या, मेवा, हॅटिल्स, किराणा, भाजीपाला, फळे तयार वस्तु, भोजन, मेवा, दुध, दही व त्यापासुन तयार होणारे पदार्थ, आईसक्रिम त्यातील अनेक प्रकार, निरनिराळ्या इलेक्ट्रानिक वस्तु, फर्निचर, मोबाईल, जीन्स, रेस्टॉरेंट, ब्युटी सलुन, इतर साहित्य, क्रिडा साहित्य, पुस्तके, संगीत साहित्य. देशी, विदेशी अशा विविध वस्तुंचा हा भीम बाजार असेल. या बाजारात एकदा गेल्यानंतर दुसरीकडे कोणत्याच वस्तुच्या खरेदीला जावे लागणार नाही. त्यामुळे वेळ व पैसा यांची निश्चितच बचत होईल. जवळजवळ ५ लाख, ६०-७० हजार चौरस फुट आकाराचा हा अवाढव्य बाजार असेल. जवळ जवळ एखादे छोटेसे गावच आहे असे या बाजारात वाटेल. ग्राहकांना हव्या असलेल्या सर्वच वस्तु या बाजारात मिळतील तसेच बाजारातील इतर किरकोळ व्यापाऱ्यांकडे मिळणाऱ्या किंमतीपेक्षा कितीतरी कमी किंमतीत. त्यामुळे निश्चितच लोकांचा वेळ व पैसा वाचेल.

इतर किरकोळ व्यापारापेक्षा 'मॉल' मध्ये खरेदी केल्यास पैसा कसा वाचेल ? याचे समर्थक उत्तर असे की, 'मॉल' ज्या कंपन्यांनी मिळुन तयार केलेला असेल किंवा एखाद्या मोठ्या कंपनीच्या मालकीचा जर तो मॉल असेल तर अशा वेळी कदाचित त्यात सहभागी असणारी कंपनी स्वत: उत्पादकही असु शकेल किंवा इतर उत्पादकाकडुन माल खरेदी करतांना त्यात मध्यस्थ व्यापारी अडते. दलाल यांची कोणतीही भुमिका न ठेवता स्वत:चे कंत्राटदार नेमुन प्रत्यक्ष उत्पादकाकडे संपर्क साधुन तो माल त्यांची बाजारभाव किंमत लक्षात घेवुन त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणावर खरेदी करण्यात येईल. त्यांच्या मालाची योग्य ती किंमत उत्पादन खर्च + नफा मिळुन जी योग्य किंमत आहे ती देण्यात येईल. त्यानंतर ती वस्तु आवश्यक असेल त्या भागात नेण्यात येईल व मॉलमध्ये ठेवुन त्याला योग्य भावात विकण्यात येईल त्या वस्तुला योग्य पॅकिंग ची व्यवस्था सुद्धा करण्यात येईल. त्यामुळे जिथे ती वस्तु निर्माण होते त्या भागातुन ती वस्तु जिथे खरोखर त्या वस्तुची गरज आहे त्या भागात ती पुरवण्यात येईल. उदा. नागपूर, अमरावती, यवतमाळ भागात तयार होणाऱ्या संत्र्याला योग्य बाजारपेठ न मिळाल्याने तो माल खराब होत असे व अत्यंत कमी किंमतीत किरकोळ व्यापारी खरेदी करून त्यावर खुप नफा मिळवित असे. परंतु योग्य पॅकींग करून ज्या भागात खरोखर गरज आहे अशा भागात तो माल विक्रीला ठेवणे म्हणजेच मॉलमध्ये पुणे, मुंबई, चेन्नई, कलकत्ता या भागात विक्रीला ठेवणे किंवा योग्य भाव घेवुन तो बाहेरच्या देशात पाठविणे. यामुळे एक तर शेतकऱ्यांना चांगला फायदा होईल व त्यांच्या मालाला योग्य ती बाजारपेठ मिळेल व जी वस्तु अतिशय महाग घ्यावी लागत असे ती वस्तु कमी किंमतीत मिळेल यातच मॉलचे यश सामावलेले आहे. मॉलमध्ये सर्वच वस्तुच्या किंमती किरकोळ बाजाराच्या भावाने कमी असण्यामागील कारणे हेच आहेत.

एखादी वस्तु उदा. शर्ट जर किरकोळ व्यापाऱ्याकडे किंवा दुकानात त्याची किंमत जर १२० रू. असेल तर मॉलमध्ये तोच शर्ट ७० रू. ला मिळेल याचे कारण काय ? तो शर्ट ज्यावेळी तयार होवुन विक्रीला येईल त्यावेळी त्याची मुळ किंमत व्यापारी ५५ रू. ला घेईल. तो मोठ्या व्यापाऱ्याकडुन लहान व्यापाऱ्याकडे जाईल त्यानंतर तो इतर किरकोळ व्यापाऱ्याकडे जाईल त्यानंतर व नंतर तो दुकानात विक्रीला ठेवण्यात येईल. प्रत्येक व्यापारी आपला ५ रू. याप्रमाणे नफा आकारून शेवटी ग्राहकाला तो शर्ट १२० रू. ला घ्यावा लागेल. पण मॉलमध्ये असणारे कंपनीचे नोकर कंत्राट पद्धतीने जास्त माल घेण्यास तयार असल्याने त्यांना ठोक भावात कमी आकारून तोच एक शर्ट मुळ किंमत ५० रू. ला पडेल कारण ते एकाचवेळी भरपुर माल विकत घेतील



Scanned by CamScanner

खरेदी केलेला तो माल पॅकिंग करून 'मॉल' मध्ये डायरेक्ट विक्रीला ठेवतील. त्यात कोणतेही मधले व्यापारी नसल्यामुळे त्यावर जास्त किंमत न आकारता फक्त पॅकिंग खर्च, वाहतुकखर्च व मजुरी तसेच नफा एवढा खर्च २० रू या प्रमाणे त्या ठिकाणी तो शर्ट आपणास ५०+२०=७० रू. पडेल. त्यामुळे एकाच क्वालिटीचा माल किरकोळ बाजारात १२० रू. ला व मॉल मध्ये तोच माल ७० रू. ला पडेल तेव्हा निश्चितच ग्राहकांचा मॉल मधीलच माल खरेदी करण्याकडे त्याचा कल राहील. त्यामुळे उत्पादक व उपभोक्ता दोघांचाही निश्चितच फायदा होईल. अशाप्रकारे मॉल सर्वांच्याच फायद्याचा ठरेल. तसेच त्यावर विक्रीकर पण एकदाच लागेल. किरकोळ बाजारात अनेक व्यापाऱ्यांच्या हस्तांतरणामुळे प्रत्येकाला त्याचा विक्रीकर भरावा लागत असल्यामुळे त्यांना कमी किंमतीत वस्तु विकणे परवडत नाही.

'मॉल' आंतरराष्ट्रीय बाजारपेठ असल्यामुळे त्या वस्तुंचे योग्य पॅकिंग करणारा विभाग असेल ती वस्तु (फळे, भाजीपाला) खराब होवु नये म्हणुन साठवुन ठेवण्या मोठीमोठी शीतगृहे असतील त्यामुळे त्या वस्तु खराब होणार नाही. तसेच योग्य त्या दळणवळणाच्या सोयी उपलब्ध असल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात म्हणजे इंग्लंड, अमेरिका, फ्रांन्स व इतर देशांना सुद्धा तो माल निर्माण करता येईल व त्यांच्या देशातील इतर इलेक्ट्रानिक साधने, खाण्याचे पदार्थ आपल्याला आयात करता येईल. अशा प्रकारे आयात निर्यात वाढल्यामुळे व मालाला योग्य बाजारपेठ मिळाल्यामुळे निश्चतच उत्पादनाला विशेष चालना मिळुन अधिक उत्पादन करण्याकडे उत्पादकाचा कल राहील व अधिकाधिक उत्पन्न घेण्यास प्रवृत्त झाल्यामुळे त्याच्या उत्पन्नात अधिक भर पडेल. जीवनमान सुधारणा होईल उपभोग प्रवृत्तीत वाढ होईल. वस्तुंची मागणी वाढेल तसा पुरवठाही वाढेल त्याचा परिणाम म्हणुन राष्ट्रीय उत्पन्नात भर पडेल. राष्ट्रीय उत्पन्न वाढल्यामुळे निश्चितच पुन्हा गुंतवणुकीत वाढ होईल व त्यामुळे उद्योगधंद्याचे क्षेत्र पुन्हा विस्तारले जाईल.

भारतात २००० सालापासुन जी औद्योगिक क्रांती सुरू झालेली आहे व नविन आर्थिक धोरणानुसार उत्पादनात वाढ करणे गरजेचे असल्यामुळे औद्योगिक क्षेत्रात कार्गो हब सारखे 'एसइझेड' प्रमाणे लाखो एकर जमीन औद्योगिक क्षेत्रासाठी मागणी होत आहे. त्यानुसार नवनवीन उद्योगधंदे सुरू होत आहेत व त्यांच्या दृष्टिकोनातुन नविन बाजारपेठेची निर्मीती होते ही काळाची गरज आहे त्यानुसार 'मॉल' सारख्या मोठ्या बाजारपेठा निर्माण होणे ही काळाची गरज आहे.

भारतीय किरकोळ व्यापारात जास्तीत जास्त नफा घेण्याच्या उद्देशाने व्यापार केला जात होता. त्यामुळे वस्तुंची किंमत अतिशय वाढवून मोठे मासे छोट्या मास्यांना गिळतात या म्हणीप्रमाणे ते लहान व्यापाऱ्यांचे व ग्राहकांचे शोषण करून अफाट संपत्ती कमवित आहे. मॉलमुळे हा किरकोळ व्यापारच हळुहळु संपुष्टात येईल त्यामुळे उत्पादनकर्ता व उपभोक्ता यांच अगदी जवळचा संबंध राहील. माध्यम फक्त मॉल राहील. प्रत्यक्ष मागणी व विक्री होईल म्हणुनच मॉल संस्कृती आवश्यक आहे. कारण त्यामुळे उपभोक्त्याचा सुद्धा वेळ व पैसा वाचतो यात संशय नाही.

**गुंतवणुक व त्याचे प्रमाण किरकोळ व्यापारातील देशी गुंतवणुक व विदेशी गुंतवणुक.**

'इससे सस्ता ओर अच्छा कही नही' या घोषवाक्यासह अनेक मोठ्यामोठ्या कंपन्या या व्यापारात उतरून मोठेमोठे बिग बाजार निर्माण करीत आहेत. देशातील सर्वात मोठा बिग बाजार म्हणजे 'मॉल' बंगलोर येथे आहे. त्याचबरोबर आता देशातील दुसऱ्या नंबरचा बिग बाजार नागपूर येथे निर्माण होत आहे. १ लाख ६० हजार चौरस फुट एवढी मर्यादा बंगलोर येथील बीग बाजाराची आहे. पॅन्टलुन रिटेल (भारत) लिमिटेड या कंपनीचा तो



Scanned by CamScanner

ब्रीग बाजार आहे. पाच मजली भव्य इमारतीत हा बाजार आहे. त्याचप्रमाणे आता नागपूर वर्धमान नगरलाही असाच बाजार सुरू करण्याची पॅन्टवुन रिटेल इंडिया लिमीटेड (पीआर आय एल) या बाजाराचे प्रमुख आहेत राजन मल्होत्रा व विभागीय प्रमुख सदाशिव नायक आहेत. या कंपन्या आपले भाग भांडवल निर्माण करतात ते अनेक लहान मोठ्या कंपन्या एकत्र येवुन किंवा मोठ्या कंपनीची मोठी गुंतवणुक करण्याची कुवत असते. उदा. रिलायन्स (अंबानी ग्रुप), महेन्द्र ॲण्ड महेन्द्र यासारख्या भारतीय मोठ्याकंपन्या स्वतःची गुंतवणुक करून मॉल निर्माण करीत आहेत कारण त्यापैकी बऱ्याचशा कंपन्या उत्पादक सुद्धा आहेत. तसेच शेअर्सच्या माध्यमातुन सुद्धा हे भागभांडवल उभारू शकतात किंवा सरकारला काही भाग देऊन कर्जाच्या रूपाने मदत देऊ शकतात.

विदेशी कंपन्यात ऐनॉन, बी.टेल, निप्पॉन, कार्गो हव अशा अनेक कंपन्यानी आपले जाळे विणले आहे. विविध देशातील कंपन्या आपले पाय रोवण्यासाठी भारतीय बाजारपेठेच्या उंबरठ्यावर येऊन उभ्या आहेत. त्यांच्या देशातील भांडवल गुंतवणूक त्यांना भारतात करून आपला व्यापार त्यांना वाढवायचा आहे. किरकोळ व्यापारात देशी गुंतवणुक बऱ्याच प्रमाणात सहभागी तत्वावर काही भाग भांडवल गुंतवणुक करून काही सरकारच्या मदतीने गुंतवणुक करून बाजारपेठ तयार झालेल्या आहेत. उदा. कृषी उत्पन्न बाजार समिती, कापूस महापणन संघ, काही दुध डेऱ्या, विकास महामंडळे, बीज महामंडळे अशा प्रकारची व्यापाऱ्यांची व्यापार संकुले लहानमोठ्या प्रमाणात किरकोळ व्यापार करीत होती. बहुतेक व्यापारी आपले स्वतःचे भांडवल व्यक्तिगत स्वरूपात गुंतवुनच अधिक नफा कसा कसा घेता येईल या भावनेने प्रेरित होऊन व्यापारात उतरत असे. त्यामुळे विशेषतः शेतकरी व ग्राहक दोघांचीही पिळवणुक केल्या जात होती. कारण दोन्ही गट संघटित नव्हते. कारखानदार वर्ग थोड्याफार प्रमाणात संघटित असल्यामुळे तो आपला नफा न सोडता व्यापाऱ्यांना माल पुरवित असे. तर कधी कधी कृत्रिम टंचाई निर्माण करून वस्तुंची भाववाढ करून गिऱ्हाईकाची म्हणजेच पर्यायाने जनतेची लुबाडणुक करीत असे. त्यामुळे या आजपर्यंतच्या किरकोळ व्यापारात व्यक्तिगत नफ्याकडे अधिक लक्ष असल्यामुळे त्याचा परिणाम विसंगत बाजारप्रणालीवर होत होता. विक्रीदाराला व उत्पादकाला योग्य बाजारपेठ मिळत नव्हती. वर गिऱ्हाईकाला स्वस्त भावात योग्य माल मिळत नव्हता. विदेशी व्यापाऱ्याच्या बाबतीत विचार केल्यास भारतातुन निर्यात फार कमी होत होती. साखर, चहा, मसाल्याचे पदार्थ या वस्तु सरकारच्या माध्यमातुन इतर देशांना पुरविल्या जात होत्या. प्रत्यक्ष व्यक्तिगत स्वरूपातुन विदेशी व्यापारीची हिंमत किरकोळ व्यापारी करू शकत नव्हता. भारतीय किरकोळ व्यापारास पाहिजे तसा वाव मिळत नाही. कारण सरकारी बंधने कर वाहतुक या गोष्टीचा त्यात अडथळा होता. आयातही सरकारच्या माध्यमातुन तांत्रीक वस्तु धान्य, इलेक्ट्रानिक वस्तु यांची आयात केल्या जात असे. परंतु ती आयात व्यक्तिगत स्वरूपाची न राहता सार्वजनिक सरकारी माध्यमातुन होत असे त्यामुळे एकंदरीत त्याचा देशी व विदेशी व्यापारात व्यक्तिगत व सरकारी तत्वावर आयात निर्यात होत होती. परंतु २१ व्या शतकातील (खा-उ-जा) खाजगिकरण उदारीकरण व जागतिकीकरण या जागतिक तत्वामुळे सर्व जगाने बंधने झुगारून मुक्त व्यापार सुरू केला आहे. जग जवळ आले आहे. दळणवळणाची साधने व अर्निबंध व्यापार यामुळे अनेक व्यक्तिगत व सामुहिक स्वरूपात अनेक कंपन्या या जागतिक बाजारपेठेत उतरल्या आहेत व मुक्तपणे आंतरराष्ट्रीय व्यापार चालत आहे. ग्लोबलायझेशन या काळात देशांच्या सिमारेषा गळुन पडत आहेत व मुक्तपणे आंतरराष्ट्रीय व्यापार चालत आहे व अमेरिकेची गरज आज भारत भागवु शकतो तर भारताची गरज इंग्लंड, अमेरिका भागवु शकते. आजपर्यंत भारताची प्रतिमा मागासलेला बुवाबाजीचा व नर्तिकांचा देश म्हणुन अवहेलना होत होती. परंतु आज २१ व्या शतकात भारत एक विकसनशील राष्ट्र म्हणुन भारताने सर्वच बाबतीत आघाडी मारली आहे. सर्व जग भारताच्या या झेपेमुळे स्तंभीत होऊन आपणहुन भारताशी व्यापाराचे करार करीत आहे. म्हणुनच २००० साली



Scanned by CamScanner

केंद्र सरकारने विशेष आर्थिक विभाग सुरू करण्याचे धोरण स्वीकारले आहे व याच तत्वावर जागतिक व्यापारात भारत उतरला आहे.

**किरकोळ व्यापारातील विक्रीकौशल्य, देशी व विदेशी व्यापाराबाबत क्षमता**

किरकोळ व्यापाऱ्याकडून ग्राहकांना देण्यात येणाऱ्या विविध सेवा व त्यातील बदल अ) स्वयंसेवेचा ब) घरपोच सेवा क) प्रत्ययपत्र ड) सुट, सेल, स्पर्धा नवप्रवर्तन, तंत्र सुधारणा स्पर्धा भांडवली गुंतवणुक, नौकरशाही व मॉलचा देशी व्यापार व उपभोगावरील परिणाम.

१. किरकोळ व्यापारात अनेक प्रकारचे विक्री कौशल्य वापरण्यात येते. आकर्षक पॅकींग, विशेष जाहिराती, सुट यासारखी प्रलोभने देऊन ग्राहकांना आकृष्ट करण्याचे काम करतात त्यातुनच आपल्या मालाचा खप वाढवतात. वेगवेगळी प्रलोभने दाखवतात व ग्राहकांना लुबाडतात. देशातल्यादेशात अंतर्गत व्यापारात ते यशस्वी होतात परंतु विदेशी व्यापार करण्याची क्षमता अजुनपर्यंत भारतीय व्यापारात नव्हती. एक तर आर्थिक कमकुवतपणा, दळणवळणाच्या साधनांचा अभाव व सरकारी कर व निर्बंध अशा अनेक कारणामुळे किरकोळ व्यापारी विदेश व्यापारात उतरत नव्हता. परंतु आता मात्र निर्बंध सैल झाल्यामुळे किरकोळ व्यापारी सहभागी होवु शकतील त्यांच्यात अंतर्गत देशी व्यापाराबरोबरच विदेशी व्यापार करण्याची क्षमता निश्चितच या 'मॉल' संस्कृतीमुळे निर्माण होणार आहे.

किरकोळ व्यापारात ग्राहकांना आकृष्ट करण्याकरिता विविध जाहिराती करून विविध स्वयंसेवा घरपोच सेवा देण्यात येत होत्या. वेळे अभावी फोनवर मोबाईवर लीस्ट दिल्यास व्यापारी स्वत:च नौकर व वाहन घेऊन घरपोच सेवा देत आहे. हॉटेल मधील जेवण, फराळ, किराणा, कापड, दागिने या व अशा अनेक वस्तु घरपोच पोचवुन दुकानदार व किरकोळ व्यापारी आकर्षक रीतीने गिऱ्हाईकाकडुन पैसा काढण्यात व त्यांना जबरदस्तीने माल पुरविण्यात यशस्वी होत असे. कारण आज लोकांना कमी वेळात काम हवे असते. मॉलमध्ये मात्र या सुविधा शक्य होवु शकणार नाही कारण एकतर मॉलचा व्याप मोठा असल्यामुळे व ती व्यापक मोठी बाजारपेठ असल्यामुळे या सर्व गोष्टी शक्य होवु शकणार नाही. तसेच सेलचे आकर्षण, सुट देणे प्रत्यपत्र वापरणे या सर्व सोयी सवलती मॉलमध्ये मिळणार नाहीत. याचा परिणाम काही प्रमाणात मॉलवर होईल कारण जवळ नगदी पैसा असल्याशिवाय मॉलमध्ये खरेदी करता येणार नाही तसेच वेळोवेळी सुट, सवलती, उपहार अशा स्पर्धात्मक सोयी सवलती जाहीर करणे शक्य होणार नाही. त्यामुळे काही प्रमाणात किरकोळ व्यापार सुद्धा यशस्वी होईल परंतु मधले व्यापारी मात्र साठेबाजी, सौदेबाजी, भाववाढ अशा कारामती करून जनतेला लुबाडु शकणार नाही. लोक सरळ मॉल मधुन खरेदी करतील परंतु मॉल शहरापासुन जर लांब असेल तर मात्र किरकोळ व्यापाऱ्याकडुनच माल घेणे ग्राहक पसंत करतील.

किरकोळ व्यापार व मॉल यात निश्चितच स्पर्धा सुरू होईल कारण मॉलमध्ये देशविदेशातील वस्तु विकायला येणार असल्यामुळे त्यात नविन तंत्र भावनावर्तन असेल, आधुनिकता असेल किरकोळ व्यापारी परंपरागत वस्तुच विकायला आणणार त्यामुळे निश्चितच नवीन वस्तुच्या आकर्षणामुळे लोक मॉलकडेच धाव घेणार. तसेच दोन्हीत स्पर्धा निर्माण होऊन किंमत कमी व चांगल्या वस्तु यामुळे लोक मॉलकडे आकर्षित होतील तसेच निरनिराळ्या गावात खेड्यात, शहरात सगळीकडे मॉल निर्माण झाल्यावर किरकोळ व्यापार संपुष्टात येण्याची वेळ येईल परंतु भारतासारख्या देशात ग्रामीण भागात जी जनता आहे ती जनता मात्र मॉलमध्ये सहभागी होण्यास पूर्णपणे तयार नसेल कारण शेतकऱ्याजवळ वेळीच पैसा उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे प्रत्ययपत्र किंवा उधारीचे व्यवहार

Scanned by CamScanner

चालात. मॉलमध्ये उधारीला वाव नसेल.

गुंतवणूक करण्याच्या दृष्टिने लोक किरकोळ व्यापारात जास्त गुंतवणुक न करता काही उत्पादक विक्रेते एकत्र येऊन एखाद्या मॉलची निर्मिती करू शकतात कारण बऱ्याच उत्पादित वस्तु जास्त नफा ... ग्राहकापर्यंत डायरेक्ट पोचविल्या तर ग्राहक खुष होईल कारण कमी किंमतीत वस्तु मिळेल व उत्पादकाला चांगला भाव मिळाल्यामुळे व्यापाऱ्यांना जाणाऱ्या नफ्याची रक्कम त्यांना मिळाल्यामुळे उत्पादकाला ... मिळेल. अधिकाधिक गुंतवणुक केल्या जाईल. समाजातील अनेक लोकांजवळ पडुन असणारा पैसा ... बाजारपेठेत गुंतविल्याने उत्पादनाला वाव मिळुन देशाची प्रगती होईल यात शंका नाही. मॉलमुळे बेरोजगारी ... होईल. नौकरशाही वाढेल कारण अवाढव्य बाजार सांभाळणे त्यात खरेदी, पॅकींग, वाहतुक, विक्री व ... स्टॉल, देश विदेश व्यापार यात अनेक लोकांचा सहभाग असेल त्यामुळे नोकरशाहीचा भरणा अधिक असणार ... किरकोळ व्यापारात जास्त व्यापारी स्वत: लक्ष देऊन काम करून अधिक नफा कमवित असे. तसे मॉलमध्ये ... नाही. नोकशाहीमुळे दिरंगाई येईल परंतु जर योग्य नियोजन असेल व काम करून घेणारे लोक असतील तर ... खाजगी करण असल्यामुळे निश्चितच अधिक काम घेतले जाईल व कामाचा दर्जा वाढविण्यात येईल.

मॉल संस्कृतीमुळे आज असे दिसून येईल की लोकांच्या उपभोग क्षमतेत वाढ होईल. पूर्वीपेक्षा ... उपभोग वाढेल कारण पूर्वीच्यामिळकतीत जी खरेदी होत होती ती भाववाढ झाल्यामुळे कमी वस्तु मिळत ... परंतु तेवढ्याच मिळकतीत जास्त वस्तु मिळत असल्यामुळे निश्चितच उपभोग क्षमता वाढेल. लोकांचे राहणीमान(Standard of Living) उंचावेल. परदेशी वस्तुच्या उपभोगात भर पडेल व निर्मितीमुळे सुद्धा ... संस्कृतीची ओळख होऊन जग अधिक जवळ येईल. वरील प्रकारचे अनेक फायदे या मॉलमुळे होणार असले ... भारतासारख्या देशात ग्रामीण भागात हे शक्य नाही. शहरात पैसा आहे. ग्रामीण भागात पैशाचा अभाव आहे ... ग्रामीण भागातील बेकारी दुर होवून शेतीजमीन योग्य भावात मिळेल तरच त्यांचे जीवन सुखी होईल व ... यशस्वी होईल अन्यथा मॉल शहरापुरतेच मर्यादित राहतील व विदेशी कंपन्यांच्या आगमनाने भारतीय ... संपुष्टात येईल. कारण या स्पर्धेत किरकोळ व्यापारी तग धरू शकणार नाही आणि इस्ट इंडिया कंपनीने ... करता करता भारतावर १५० वर्षे राज्य केले तसा व्यापार जर एकाधिकार पद्धतीने परकीय कंपन्याच आपल्या ... त्यांच्यादेशातील मालाचा मारा करू लागले तर कालांतराने आपल्या देशातील उद्योगधंदे बंद पडतील व ... नौकरशाही वरून देश केवळ कामगारांचा देश म्हणुन ओळखल्या जाईल. म्हणून मॉल हे आर्थिक दृष्ट्या ... असले तरी त्यात स्पर्धा कमी असल्यामुळे कालांतराने एकाधिकार निर्माण होण्याची भिती आहे. म्हणून मॉल ... हवेत नियंत्रण तरच मॉल आपल्या देशाकरता उपयुक्त ठरू शकेल. मॉल गृहिणींच्या दृष्टीने नव्या जगाची देणगी आहे असे म्हणता येईल.

✦✦✦

Scanned by CamScanner

# "मॉल संस्कृती, विदेशी गुंतवणुक आणि किरकोळ विक्रीवर होणारा परिणाम"

प्रा.डॉ. माधुरी प्र. लेले
श्री . बिझाणी नगर महाविद्यालय
नागपूर.

किरकोळ विक्री हा देशांतर्गत व्यापाराचा एक महत्त्वाचा घटक आहे. देशांतर्गत व्यापारात उत्पादकाने निर्माण केलेली वस्तु ग्राहकांपर्यंत पोहचविण्यासाठी एक वितरण साखळी अस्तित्वात असते. या साखळीच्या पहिल्या टोकाला उत्पादक तर दुसऱ्या टोकाला ग्राहक असतो. या दोन्ही टोकांना जोडण्याचे कार्य अनेक घटक करित असतात. त्यामध्ये घाऊक व्यापारी, व्यापारी अभिकर्ते व किरकोळ व्यापारी यांचा समावेश होतो. सर्वच घटक आपापल्या परीने बाजारपेठेत एक महत्वाचीच भूमिका बजावत असतात. परंतु किरकोळ व्यापारी हा एकमेव घटक असा आहे की ज्याचा दैनंदिन व प्रत्यक्ष संबंध ग्राहकांशी येतो. हेच सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्ये हेरून आज जागतिकीकरणाच्या काळात अनेक गुंतवणूकदारांचे लक्ष या घटकाकडे आकर्षित झालेले दिसते.

पूर्वी किरकोळ विक्रेता म्हणजे अतिशय लहान प्रमाणात भांडवल गुंतवून व्यवसाय करणारा ज्यांचे विक्री व नफ्याचे प्रमाण अतिशय कमी असून, केवळ आपल्या उदरनिर्वाहाचे साधन म्हणूनच व्यापाराकडे बघणारा असा बाजारपेठेतील एक दुर्बल घटक होता असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. आपल्या गल्लीतील मोहल्यातील ग्राहक एवढेच त्याचे कार्यक्षेत्र, उदरनिर्वाहापूरते मिळेल एवढाच त्याचा व्यापार, ग्राहकांचा विश्वास व जिव्हाळ्याचे संबंध हेच त्याचे व्यापारी उद्दिष्ट.

परंतु जागतिकीकरणाच्या काळात संपूर्ण जग 'एक बाजारपेठ' म्हणून मान्यता पावल्यानंतर परिस्थितीत आमुलाग्र बदल झालेला दिसून येतो. ग्राहक हा बाजारपेठेचा 'राजा' बनला आणि आपोआपच ग्राहकाला थेट भिडणारा किरकोळ विक्री हा घटकही सर्वांच्याच नजरेत भरला. आता किरकोळ विक्री म्हणजे लहान प्रमाणात भांडवल, नफ्याचे अत्यल्प प्रमाण हे जुने समीकरण मागे पडले आणि कोट्यावधींची गुंतवणुक घेऊन बडे भांडवलदार या क्षेत्रात उतरले आहेत. त्यातही २७%पर्यंत विदेशी गुंतवणुकदारांना भारत सरकारने परवानगी दिलेली आहे. त्यामुळे जगभरातील रिटेलर्स (किरकोळ विक्रेते) भारतात येत आहेत. वॉलमार्ट, पिरॅमिड, मेट्रो या सारख्या मोठ्या बहुराष्ट्रीय रिटेल चेन्सचाही त्यात समावेश आहे.

सी.आय.आय. म्हणजेच 'Confadaration of Indian Industries' या उद्योगजगता तील सर्वात मोठ्या संस्थेने ' Retail Scenario of India-unlimited oppourtunity' नावाचा अहवाल प्रसिद्ध केला आहे. किरकोळ विक्रीच्या व्यवसायात आधुनिकीकरणाने या उद्योगातील पैसा अर्थव्यवस्थेच्या बळकटीसाठी पूरक ठरेल असा या अहवालात नमुद केले आहे.

याच अहवालात नोंदविल्यानुसार ए.टी. केअरनी इंडिया या आंतरराष्ट्रीय ग्लोबल व रिटेल डेव्हलपमेंट संस्थेच्या रँकिंगनुसार सद्यस्थितीला भारतीय उद्योग जगात सहाव्या क्रमांकावर आहे. १००० लोकसंख्येच्या मागे ५.५ किरकोळ विक्रीची केंद्रे किंवा साधने उपलब्ध आहेत. हे दरडोई प्रमाण जगातील कोणत्याही राष्ट्रापेक्षा सर्वात

Scanned by CamScanner

जास्त आहे. भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ७% टक्के लोक हे किरकोळ विक्रीच्या व्यवसायात काम करतात.

बदलत्या ग्राहक मानसिकतेचा आणि राहणीमानाचा अभ्यास करणाऱ्या के.पी.एम.जी. नावाच्या संस्थेने Customer Market in India- The next bigthing या नावाचा एक अभ्यास प्रसिद्ध केला आहे. या अभ्यासानुसार २००८ पर्यंत १५० प्रचंड मॉल्स भारताच्या मोठ्या शहरात उभे राहतील असे प्रतिपादन केले. पण या अहवालाला खोटे पाडत २००५ पर्यंतच भारतात २२० मॉल्स उभे राहिले आहेत. वाढीचा हा दर अनाकलनीय आहे. २००० साली पूर्ण भारतात केवळ ३ मॉल्स होते. २००५ सालापर्यंत २२० मॉल्स उभे राहिले. हा वेग कितीतरी पट अधिक वाढणार आहे. कारण रिलायन्स सारख्या उद्योगसमुहाने किरकोळ विक्रीत रस घेण्यास सुरूवात केली आहे आणि पूर्व भारतात १६०० मॉल्स उभे करण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे.

आंतरराष्ट्रीय रिटेल कंपन्यांना भारतातल्याच ग्राहकाने एवढी भुरळ पाडण्याचे कारण काय ?

Internation Business Leaders Forum.या संस्थेने भारतीय बाजारपेठेच्या अभ्यासावरून काही निष्कर्ष काढलेत. ही संस्था ग्राहकांच्या उत्पनाचा, खर्चाचा सवयींचा मानसिकतेचा अभ्यास करून त्या देशांच्या बाजारपेठेत कोणते ब्रॅण्ड चालतील याचे निष्कर्ष मांडते. त्यानुसार ''' भारतात बदलत्या राहणीमानाचा येत्या पाच वर्षातला वेग इतका प्रचंड असेल की त्या बळावरच भारतीय रिटेल व्यवसायाची प्रचंड भरभराट होईल असा त्यांचा दावा आहे. देशांतर्गत बाजारपेठेतील उत्पन्न व खर्चाची पद्धत बदललेली असेल. शहरी तरुण ग्राहकाचे उत्पन्न भरघोस वाढलेले असेल. त्यातुन त्यांची बदलणारी 'लाईफस्टाईल' आणि वाढणारा खर्च रिटेल व्यवसायाला त्याहीपेक्षा मॉल्स संस्कृतीला पूरक ठरणार आहे.

**मॉल्स म्हणजे नेमके आहे काय ?**

अत्याधुनिक व्यवस्थेअंतर्गत ग्राहकांकरीता एकाच छताखाली अनेक वस्तुंची किरकोळ विक्री करणारे केंद्र म्हणजे मॉल्स बहुविभागीय भांडारे व सुपर मार्केट यांचे संयुक्त स्वरूप म्हणजे मॉल्स, भव्य इमारत, विजेचा झगमगाट, वातानुकूलित वातावरण, प्रफुल्लित चेहऱ्यांचे विक्रेते व सुईपासून टी.व्ही पर्यंत सर्व वस्तू एकाच ठिकाणी रास्त किंमतीला प्राप्त होण्याचे केंद्र म्हणजे मॉल्स. जागतिकीकरणामुळे तरूण वर्गाला भरघोस पगाराच्या नोकऱ्या मिळाल्या आणि खरेदीविषयीची मॉल्स संस्कृती उदयाला आली. मॉल्सकडे आकर्षित होणारा ग्राहकवर्ग सध्या एका विशिष्ट वयोगटातील आहे. परंतु या संस्कृतीची व्याप्ती दिवसेंदिवस वाढतच जाणार आहे हे तर उघड सत्य आहे. मॉल्समधून किरकोळ विक्री करणारे हे बडे भांडवलदार आहेत. भांडवलाची कमतरता नाही त्यामुळे मध्यस्थांच्या साखळीचे उच्चाटन करून थेट उत्पादकाकडून वस्तू घेणे सहज शक्य आहे. मोठ्या प्रमाणात खरेदीचे सर्व फायदे उदा. कमी किंमत, सूट, वाहतूक खर्चात बचत प्राप्त करता येतात. त्यामुळे साध्या किरकोळ विक्रेत्यापेक्षा वस्तू स्वस्त विकता येतात. मॉल्सच्या इमारतीची रचना इतकी सुंदर व आकर्षक असते की काहीही खरेदीची गरज किंवा इच्छा नसलेले लोक सहज म्हणून मॉलमध्ये शिरतात व ग्राहक बनून बाहेर पडतात. तत्पर सेवा, ग्राहकाभिमूखता, दर्जेदार व ब्रॅण्डेड वस्तू, वातानुकुलित इमारत व मनोरंजनाच्या सोयी या सर्व गोष्टी ग्राहकाला भुरळ पाडण्यास पर्यात आहेत.

जागतिकीकरणाच्या पूर्वीही बहुविभागीय भांडारे, सुपर मार्केट्स अस्तित्वाव होतीच. मग आताच किरकोळ विक्रीवर व विक्रेत्यांवर यांचा प्रतिकूल परिणाम होईल अशी भीती का वाटते ?



Scanned by CamScanner

किरकोळ विक्रेते हे परंपरागत व अतिशय लहान प्रमाणात भांडवल गुंतवणुक करून व्यवसाय करित आहेत. त्यांना फार मोठी भीति आणि धास्तीची भावना घेरून राहिली आहे. मोठे मासे लहान माशांना गिळंकृत करतील ही भितीची भावना भेडसावत आहे. आतापर्यंत ही मॉल्ससंस्कृती बड्या शहरांपूरती मर्यादित होती. रिलायन्सने १६०० मॉल्सची घोषणा केल्याबरोबर सर्वच लहान मोठी शहरे आणि त्यांचे सोबत ग्रामीण भागातही हे लोण झपाट्याने पसरणार आहे. रिटेल मार्केटमध्ये रिलायन्स किंवा वॉलमार्ट आले तर कोपऱ्यावरच्या वाण्याचा धंदा बसेल. देशात सव्वा कोटी किराणा मालाची दुकाने आहेत आणि वार्षिक आठ लाख कोटी रूपयांची उलाढाल आहे. महाकाय मॉल्समुळे यावर काय विपरीत परिणाम होईल अशी चिंता व्यक्त केली जात आहे.

उत्पादक, वितरक, घाऊक व किरकोळ विक्रेता ही वितरणाची साखळी नष्ट होईल आणि या साखळीत काम करणाऱ्या अनेक घटकांवर विपरीत परिणाम होईल. परंतु त्याचबरोबर ग्राहकांच्या दृष्टिकोनातून विचार केला तर वितरणाची साखळी तुटली, नष्ट झाली तर स्वस्त वस्तू मिळतील.

मॉल्सच्या आक्रमणाचा परिणाम अनेक क्षेत्रावर होणार आहे त्यात किराणा दुकानदारा बरोबरच जनरल स्टोअर्स, पुस्तके स्टेशनरी, रेडीमेड कपडे, गृहोपयोगी व शोभेच्या वस्तु यांचा समावेश आहे.

**उपाययोजना**

मॉल्स संस्कृती सध्यातरी केवळ शहरी भागातच आहे. त्यामुळे ही काही एवढी गंभीर समस्या नाही असे म्हणून दुर्लक्ष केल्यास फार उशीर झालेला असेल. कारण हे केवळ शहरी भागापुरते मर्यादित राहणार नाही हे निश्चित आहे.

यामुळे अनेकांचे व्यवसाय बंद पडतील, त्यांच्या रोजगारावर गदा येईल. छोट्या विक्रेत्यांना अस्तित्वासाठी टिकून राहण्यासाठी झगडावे लागेल हे सर्व खरे आहे आणि अपरिहार्यही आहे. त्यामुळे आपल्याला विचार करावा लागेल तो या आधुनिक व्यवस्थेत टिकून राहण्यासाठी काय करता येईल या गोष्टीचा. ग्राहक मॉलसकडे कां वळला ?या प्रश्नाचा विचार केला तर असे स्पष्ट होईल की आपला परंपरागत किरकोळ व्यापारी व त्याची दुकान कळकट, अस्वच्छ, त्याची ग्राहकांशी उद्धट व उर्मट वागणुक, फसवणुक्या गोष्टी अनुभवाला येतात. याउलट मॉल्समध्ये आनंददायक खरेदीचा अनुभव येतो. त्यामुळे सर्वप्रथम किरकोळ विक्रेत्यांना स्वत:मध्ये बदल घडवून आणावा लागेल. बदलाची ही प्रक्रिया जगभरात सुरू आहे. बदलांचा स्वीकार करून जे स्वत:ही त्यासोबत बदलतात तेच टिकतात. मात्र त्यासाठी कल्पकता, सर्जनशीलता, नाविन्य यांची आवश्यकता आहे.

मॉल्समुळे काही नवीन रोजगाराच्या संधीही निर्माण होणार आहेत. त्यांच्या विचार होणे गरजेचे आहे. मॉल्ससाठी मालाचा पुरवठा करणारे पुरवठादार प्रशिक्षित, तरूण व उमद्या विक्रेत्यांची गरज निर्माण होईल. याशिवाय व्यवस्थापन, स्टोअर किपींग, पॅकींग, लेखापाल असे अनेक नविन नविन रोजगार संधी देखील निर्माण होणार आहेत.

प्रत्येक लहान सहान खरेदीसाठी काही ग्राहक मॉल्समध्ये जाणार नाही. किमान सध्यातरी तशी परिस्थिती नाही. आपल्या परंपरागत किरकोळ विक्रेत्याजवळ सर्वात महत्वाचा एक उत्कृष्ट संधी असते. (Plus Point) ती म्हणजे प्रत्येक ग्राहकांशी प्रत्यक्ष जिव्हाळ्याचे मैत्रीचे संबंधप्रस्थापित करणे. यामुळे तो आपले कायमचे ग्राहकवर्ग जोपासू शकतो आणि येणाऱ्या आव्हानाला समर्थपणे तोंड देऊ शकतो. नीटनेटकेपणा, स्वच्छता, नम्रता, उधारीची

सवलत आणि योग्य वजनमाप किंमत याआधारे तो मॉल्स संस्कृतीवर मात करू शकतो.

मल्टिप्लेक्स आले म्हणून जुनी थिएटर्स बंद पडली नाहीत. मॅकडोनाल्डस आणि पॉश हॉटेल्स आले तरी छोटी मोठी मराठमोळी व उडपी हॉटेल्स चालूच आहेत. त्याप्रमाणेच मॉल्ससोबतच परंपरागत किरकोळ व्यापारीही टिकून राहतील परंतू आधीच म्हटल्याप्रमाणे बदलत्या काळानुसार सुधारणा होणे आवश्यक आहे. आधी म्हणत असत की Think global act local पण आजचा नारा मात्र Think global act global हा आहे.


संदर्भसूची

१. Economic Times - 2006 July 18th

२. दै. लोकमत शुक्रवार पुरवणी 'ऑक्सिजन' दि. २००६ ऑगस्ट १८,२५

३. डॉ. उदय निरगुडकर यांचा लेख - दै. लोकमत दि. २००६ ऑगस्ट २५ (व्यवस्थापन आणि माहिती तंत्रज्ञान तज्ञ, जागतिकीकरणाच्या परिणामाचे अभ्यासक).

४. विविध संशोधन संस्थाचे अहवाल - (वर्तमानपत्रातील प्रसिद्ध झालेल्या माहितीच्या आधारे)


✦✦✦

## सहसंपादकाचे दोन शब्द

आदरणीय, प्रतिनिधी बंधू भगिनींनो

मार्कंडादेव चर्चासत्र २००६ या निमित्ताने मी माझ्या भावना आपणा समोर व्यक्त करू इच्छितो. विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक मंडळाने ८ वर्षाचा टप्पा आज पूर्ण केला आहे. ग्रामीण पातळीवर चर्चासत्र आयोजित करावे व अशा भागातील कार्य करणाऱ्या शिक्षक बंधूशी संवाद साधून त्यांना अपले विचार व्यक्त करण्यास एक सन्मान्य व्यासपीठ उपलब्ध करून द्यावे. ही मंडळाची इच्छा या चर्चासत्राच्या आयोजनाने पूर्ण होत आहे. प्रा. रत्नाकर बोमीडवार यांनी गडचिरोली जिल्ह्याचे तर प्रा. विजय मसराम यांनी चंद्रपूर जिल्ह्याचे नेतृत्व स्विकारले आहे. मंडळाचे सर्व प्रकारचे शैक्षणिक कार्यक्रम यापुढे तीन्ही जिल्ह्यात एकाचवेळी व एकाच दिवशी सादर व्हावेत अशी इच्छा अनेकांनी व्यक्त केली. ही इच्छा पूर्ण होण्याकरीता आपणा सर्वांच्या सहकार्याची नितांत गरज आहे. या जिल्ह्याध्यक्षांना आपण तन,मन,धनाने मन:पूर्वक सहकार्य करावे अशी आपणा सर्वांना नम्र विनंती आहे. आपणास आपल्या भागात पुढील चर्चासत्र घ्यावे असे वाटत असल्यास प्रा. राजाभाऊ दुरगकर यांच्याशी संपर्क साधावा व आपल्या भागाचे नेतृत्व स्विकारावे.

मित्रांनो आपण सर्वांनी संघटित होणे व राहणे ही आजचीच नव्हे तर नेहमीचीच गरज आहे. हे चर्चासत्र यादृष्टिने आपणास एक उत्तम संधी आहे.मंडळाच्या या कार्याविषयी आपणास काहीही सूचना करावयाच्या असतील तर आपले सहर्ष स्वागत आहे. शक्य आहे आमच्या आयोजनात निश्चितच काही त्रृटी असतील. आपण त्या संदर्भात माझ्याशी संपर्क साधू शकता.आपण सर्व मिळून त्या दूर करू. आपणा सर्वांना या चर्चासत्राच्या शुभेच्छा.

दिनांक : २४/११/२००६ आपला

संपर्क : ९३२६०५२२८२ दत्तात्रय

निवास : ०७१२-२७४५९३८

Scanned by CamScanner

# "भांडवल बाजारातील परस्पर निधीची भूमिका"

प्रा. राजाभाऊ दुरूगकर
नवप्रतिभा कनिष्ठ महाविद्यालय,
सक्करदरा, नागपूर.

समाजातुन निर्माण होत असलेली बचत काळजीपूर्वक रित्या, संशोधनात्मक अभ्यास केल्यानंतर व वैज्ञानिकक विश्लेषणानंतर गुंतवणूकीकरीता उपलब्ध असलेल्या विविध साधनामध्ये गुंतविल्या जाते. उदा. सरकारी निक्षेप, ऋणपत्र, अंश, इत्यादी होय. यामधून गुंतवणूक करणाऱ्या व्यक्तींना किंवा समुहाला योग्य लाभांश व भांडवली मुल्यातील वाढ, (Capital Appreciation) भांडवल बाजारातील आर्थिक उलाढालीतून प्राप्त होते. हे दोन्ही ग्राहकाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने व तरलतेच्या दृष्टीने अधिक उपयुक्त ठरते.

**सकंल्पना**

परस्पर निधीची संकल्पा ही भारतीय भांडवल बाजाराकरीता असलेली नवीन संकल्पना होय. परंतु आंतरराष्ट्रीय भांडवल बाजारात याचा उपयोग अनेक वर्षापासून होत असलेला दिसून येतो. परस्पर निधी यासंकल्पनेची सुरूवात १९ व्या शतकात इंग्लडमध्ये सुरू झालेली दिसून येते. २०व्या शतकामध्ये अमेरिकन भांडवली बाजारात परस्पर निधीच्या कार्याला सुरूवात झाली. लॅटीन अमेरिकेमध्ये ,१०० पेक्षा जास्त परस्पर निधी विकसीत झाल्या. त्याच बरोबर अतिपूर्वेकडे व युरोप मध्ये याचा प्रचार व प्रसार झाला.

**भारतातील सार्वजनीक क्षेत्रातील परस्पर निधी**

भारतामध्ये, भांडवली बाजारातील परस्पर निधीची सुरूवात १९९० च्या दशकात झालेली दिसून येते. तथापी भारतीय भांडवली बाजारात प्रथमत: परस्पर निधीची सुरूवात १९६४ मध्ये व २६ वर्षानंतर म्हणजे १९९० मध्ये तिचा भांडवली बाजारात शिरकाव झालेला दिसून येतो. अनेक सार्वजनिक उपक्रमातून परस्पर निधीच्या माध्यमातून बचतदाराकडून भांडवल गोळा करून त्याचा गुंतवणूकीसाठी उपयोग करायला सुरूवात झाली. मागील पाच वर्षात स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक, कॅनराबँक, जीवनविमा निगम, साधारण विमा निगम यांनी परस्पर निधीच्या कार्याला आरंभ केलेला दिसून येतो. १९९०-९१ च्या काळात परस्पर निधीतून गुंतवणूकीकरीता सात हजार करोड रूपये उपलब्ध झाले होते.

**खाजगी क्षेत्रातील परस्पर निधी**

सार्वजनीक क्षेत्रातील परस्पर निधीची गुंतवणूक क्षमता विचारात घेता, खाजगी क्षेत्रातील कंपन्यांनी देखील परस्पर निधीतून भांडवली गुंतवणुक करण्यासाठी सरकारकडून परवानगी मागायला सुरूवात केली. १९९१ मध्ये केंद्रातील तत्कालीन अर्थमंत्री डॉ मनमोहन सिंग यांनी आपल्या अंदाजपत्रकीय भाषणातून खाजगी क्षेत्रांना व संयुक्त क्षेत्रांना परस्पर निधीतून भांडवल गुंतवणूकीची परवानगी देण्यात येत आहे असे स्पष्ट केले होते. परिणामत: १९९२ च्या फेब्रुवारी महिन्यानंतर अनेक खाजगी उपक्रमाद्वारे परस्पर निधीची सुरूवात करण्यात आली. या सर्व



Scanned by CamScanner

खाजगी कंपन्यांना सेबीच्या अंतर्गत कार्यकरण्यास नियंत्रीत करण्यात आले. खाजगी क्षेत्रात १०० पेक्षा जास्त कंपन्याद्वारे परस्पर निधीचे कार्य पूर्ण केल्या जात असल्याचे दिसून येत आहे. सेबी द्वारा परस्पर निधीची प्रक्रिया नियंत्रीत ठेवण्याकरीता एक विस्तारीत व प्रमाणबद्ध पद्धतीचा उपयोग करण्याचे निश्चित केले आहे. खाजगी कंपन्यामध्ये, टाटासमुह, आरपीजी समुह, एस्कॉटर्स, सिटीबँक, स्टॅन्डर्ड चार्टर बँक, ग्रिन्डलेस यांनी परस्पर निधीची सुरूवता केली आहे. सिटी बँकेची योजना परस्पर निधीच्या पुढे जाऊन ''आंतरराष्ट्रीय पेन्शन व गुंतवणूक योजना'' भारतात सुरू करण्यासाठी प्रयत्नशील आहे.

**परस्पर निधीचे प्रकार**

अंमलबजावणीच्या दृष्टिने व कार्यप्रणालीच्या दृष्टिने परस्पर निधीचे विश्लेषण प्रामुख्याने दोन प्रकारे केले जाते.

**अ) बंदसमाप्त निधी (Closed Ends Funds)**

बंदसमाप्त निधीमध्ये, मंडळाची स्थिती व कार्यक्षेत्र निश्चित केले जाते. यामध्ये गुंतवणूक करणाऱ्या सभासदांच्या अंशदानाच्या संदर्भात सुरू होणाऱ्या व बंद होणाऱ्या तारखांचा स्पष्ट उल्लेख केला जातो. ज्यामुळे बंद समाप्त निधी मध्ये '' परस्पर निधीसाठी '' निश्चित व अधिकृत भांडवल गोळा करणे शक्य होते. जर परस्पर निधीचे सुचीकरण भांडवल बाजारात झाले असेल तर अशा अंशाचे खरेदी व विक्रीचे कार्य, स्वतंत्र्यपणे भांडवली बाजारात होते. अशा स्थितीत भांडवल आधार स्थिर असतो. या संदर्भात यु.टी.आय, मास्टर्स शेअर्स एल.अय.सी. धन्य, कॅनबँकस शेअर्स. हे बंद निधीचे उदाहरण होय.

**(ब) खुला बंद निधी (Open End Funds)**

यामध्ये पूर्वीच मंडळाचे कार्यक्षेत्र निश्चित केलेले नसते व यामध्ये अंशदान देखील खुले ठेवण्यात आलेले असते. अंश किंवा एकक (Share or Units) पुन्हा कालांतराने घोषीत केलेल्या पुन्हा खरेदीच्या दरात क्रय केले जाते. खरेदी केलेली किंमत व पुनश्च क्रय केलेली किंमत हे NAV (Net Asset Value) च्या निधीच्या आधारे नियमीतपणे घोषीत केले जाते. यामध्ये युनीटस स्किम १९६४ युलीप, चिल्ड्रेन ग्रोथ फंड, कॅनबँकस, कॅनशी कॅनसीगो हे खुला बंद विधीचे उदाहरण होय.

गुंतवणूक व प्राप्तीच्या आधारावर परस्पर निधीचे वर्गिकरण खालील प्रमाणे केले आहे.

| | निधीचा प्रकार | उद्देश |
|---|---|---|
| १) | उत्पन्न निधी | अधिक प्राप्ती - औद्योगिक ज्योती, कॅन स्टॉक, कॅन लि. एस.बी.आय. मॅग्नम |
| २) | विकास निधी | अधिकतम भांडवल, कॅन अंश, एस.बी.आय. मॅग्नम |
| ३) | संतुलीत निधी | उत्पन्न व विकास |
| ४) | विशेष निधी | विशेष अशा उद्योगात गुंतवणूक |
| ५) | क्षेत्रीय निधी | विशेषत: एखाद्य देशात विशेष भौगोलीक क्षेत्रात गुंतवणूक |



Scanned by CamScanner

### मुद्रा बाजार व परस्पर निधी

भारतीय रिझर्व्ह बँकेने अलिकडील काळात मुद्राबाजार व परस्पर निधी करीता काही मार्गदर्शक सुचना सुचविल्या आहेत. या सुचनेद्वारे या क्षेत्राकडे येणाऱ्यांची संख्या मर्यादित केली आहे. ज्यामध्ये केवळ नियमीत वाणिज्य अधिकोष व त्यांच्या साह्यक शाखा यांना मुभा देण्यात आली आहे. ते यामध्ये विशेष अशा अल्पकालावधीसाठी मुद्राबाजारातील विविध साधनामध्ये गुंतवणूक करू शकतात. मुख्यत्वे गुंतवणूकीचे प्रमाणपत्र, वाणिज्य पत्र, १८२ दिवसांचे ट्रेझरी बिल्स, इत्यादी मध्ये होय.

### विदेशी परस्पर निधी

विदेशी तरल परस्पर निधी ही विदेशातून देशात गुंतवणुक करण्यासाठी उपलब्ध होत असलेली सर्वात मोठी उपलब्धता होय. मंडळाद्वारे विदेशातील परस्पर निधीच्या माध्यमातून उपलबध होत असलेले भांडवल देशात एखाद्या विशिष्ट क्षेत्रात गुंतवणूक करण्यासाठी आणले जाते. विदेशातून आणलेल्या या परस्पर निधीच्या मुल्याला दोन प्रकारच्या जोखीमी असतात. ज्यामध्ये चलन जोखीम (मुख्यत्वे विनिमयदरतील घसरण) व देश जोखीम (युगोस्लोव्हीया सारखे विभाजन) हे गुंतवणूक करणाऱ्या समोर नेहमीच असतात. अशा प्रकारे यु.टी.आय ने विदेशात विदेशी परस्पर निधी द्वारे इंडिया फंड व इंडिया ग्रोथ फंड निर्माण केले आहे.

### परस्पर निधीची कार्यप्रणाली

परस्पर निधीद्वारे मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेल्या बचती विविध गुंतवणूकदाराकडून प्राप्त करून परस्पर निधीने ठराविक व निश्चित केलेल्या उद्देशानुसार विविध क्षेत्रात गुंतवणूकी करीता उपयोगात आणल्या जातात. परस्पर निधी मुख्यत्वे गुंतवणूक ही मोठ्याप्रमाणावर विस्तारीतपण तारणपत्राच्या स्वरूपात (Securities) करीत असतात व परस्पर निधीचा कल अशाच गुंतवणूकीकडे जास्त असतो. खाजगी क्षेत्राच्या व्यवस्थापणे मध्ये ते ५% पेक्षा जास्त गुंतवणूक करीत नाही.

### परस्पर निधीचे संघटन व व्यवस्थापन

भारतामध्ये परस्पर निधीची व्याख्या केल्यास त्याला विश्वस्त म्हणून संबोधावे लागले. यु.टी.आय. वगळल्यास अन्य सर्व निधी हे भारतीय विश्वस्त १८८१ च्या कायद्यानुसार अस्तित्वात आले आहे. विश्वस्ताचे कार्य हे प्रामुख्याने बचती, गुंतवणूकदाराकडून स्विकारणे व विहीत केलेल्या उद्देशानुसार त्याची गुंतवणूक ही, संपत्ती व्यवस्थापन कंपनीद्वारे केली जाते.

भारतात प्रामुख्याने परस्पर निधी मध्ये मुख्यत्वे तिन घटक कार्यरत आढळून येतात.

(१) हमी घेणारा (२) विश्वस्त (३) वित्तप्रबंधक

### हमी घेणारा

हमी घेणारा कंपनीच्या स्वरूपात असतो व त्याद्वारे परस्पर निधीची स्थापना केली असते व त्याद्वारे परस्पर निधीच्या विकासाला चालना देण्यासाठी प्रयत्न केले जातात. सेबी ने ठरवून दिलेल्यानिकषाचा उपयोग परस्पर निधीतून गुंतवणूक करीत असतांना करावा लागतो. सेबी चे स्वतंत्र्य असे निकष याकरीता तयार करण्यात आलेल आहे. जे खालील प्रमाणे स्पष्ट केले आहे.



Scanned by CamScanner

१) ज्या कंपनीची किंवा कंपनी स्वरूपात एखाद्या संस्थेची वित्तीय व्यवस्था व पूर्व इतिहास अधिक आहे, उत्तम सुदृढ आहे, वित्तीय क्षेत्रात ज्याचे नाव आहे व जे पाच वर्षापेक्षा जास्त या सेवेत कार्यरत आहे सर्वांना परस्पर निधी मध्ये गुंतवूणक करण्यासाठी स्वातंत्र्यता व सवलत दिली जाते.

२) ज्याचे नावलौकीक आहे व ज्यांच्या व्यवसायात पारदर्शकता, प्रामाणीकपणा व सचोटी आहे, परस्पर निधी करीता मान्यता दिली जाते.

२) विश्वस्त

विश्वस्त म्हणजे, वास्तविक स्वरूपात परस्पर निधीद्वारा संपतीचे धारण करणे होय. जे स्वरूपात धारण करण्याकरीता लाभप्रद असेल. यातील सर्वात महत्त्वाचा दुवा म्हणजे, कार्यरत परस्पर निधी गुंतवणूकदार व निधी व्यवस्थापक होय. याकरीता विश्वस्ताचे पंजीयन होणे गरजेचे आहे. सर्व प्रशासन मंडळाद्वारे किंवा विश्वस्त कंपनीद्वारे चालविले जाते. परिणामत: विश्वस्त मंडळ केल्या गेलेल्या गुंतवणूक पूर्णत: जबाबदार असतात. सेबीद्वारा विश्वस्त मंडळ नियंत्रीत असतात.

३) वित्तप्रबंधक

संपती व्यवस्थापन कंपनी ही हमी घेणाऱ्या कंपनीद्वारा कंपनी पंजीयकाकडे पंजीत केली जाते व सेबीची मान्यता मिळविली जाते व विश्वस्ताद्वारे यांची नेमणूक विविध वित्तीय योजनासाठी केली जाते. सर्व कार्यरत व्यक्ती हे गुंतवणूकीतील क्षेत्रात, व्यावसायिक व संशोधनकार्यात निष्णात असतात. परस्पर निधी व्यवस्थापनात यांची भूमीका अत्यंत मोलाची व महत्वाची असते. विश्वस्तांनी आखुन व नेमुन दिले मार्गदर्शनाखाली यांचे कार्य सुरू असते. नवीन सुचीयनाच्या संदर्भात व निव्वळ संपत्तीच्या मुल्यांकना (NAV) भांडवली बाजारातील उद्यावत व अचुक माहिती प्रामुख्याने यांचेकडे उपलब्ध असते. याकरीता लेखाकर्माशी संबंधीत विविध पुस्तके या कार्याकरीता उपयोगात आणली जातात. अशा या कंपनीचे संपत्ती मुलयांकन दहा करोर किंवा त्यांपेक्षा जास्त असावयास पाहिजे. जर सेबीच्या दृष्टीकोणातून ठरवून दिलेल्या मार्गदर्शनानुसार किंवा गुंतवणूकदाराच्या हिताचे नसेल तर अशा स्थितीत वित्त प्रबंधका गुंतवणूकीचे सर्व अधिकार काढून घेतले जातात.

रक्षक (Custodian) रक्षक म्हणून त्याला संबोधले जाते. जो सर्वच कागदपत्राचे एका ठिकाणा दूसऱ्या ठिकाणी व समाशोधनासाठी ग्राहकाच्या वतीने हस्तांतरणाचे कार्य करतो तो म्हणजे रक्षक होय. थोडक्यात रक्षकाचे कार्य पुढील प्रमाणे आहे.

१. समायोजन घडून आणणे , शोधण करणे, पावती स्विकृत करणे व हस्तातंरण करणे.

२. हमी पत्राचे संग्रहण व जतन करणे

३. कागद पत्राचे पंजीयन करणे.

४. लाभ गोळा करणे, व्याज, बोनस व अन्य अधिकाराचे एकत्रीकरण करणे.

५. लेखाकर्मीय पद्धतीद्वारा मुद्राबाळगणे व कागद पत्राचे जतन करणे.

६. योग्य विमाधारण करून व्यवहारातील जोखीम कमी करणे.



Scanned by CamScanner

७. अहवाल तयार करणे व सादर करणे ज्यामध्ये

अ. भौतिक स्वरूपात, कागदपत्र व हमीपत्र धारण केलेल्यांची संख्या

ब. अयोग्य हस्तांतरण

क. पूर्ण करावयाची खरेदी

ड. पूर्ण करावयाची विक्री

**नोदणी अधिकारी**

नोंदणी अधिकारी गुंतवणूक करणाऱ्या लेखाकर्माचे कार्य सांभाळीतत असतो. या संदर्भात काही सुचना क्रारी, जो विशेषत: लाभवितरण क्रय व विक्रयाच्या बाबतीतील असेल तर नोंदणी अधिकाऱ्याद्वारे याकडे विशेष लक्ष दिल्या जाते. यामुळे ग्राहकांना खालील प्रकारे लाभ होतो.

**(१) जोखीम कमी करणे -** लहान गुंतवणूकदार जे स्वत:हून कोणताही निर्णय घेऊ शकत नाही व जोखीम कमी करू शकत नाही. अशा स्थितीत परस्पर निधी ही जोखीम कमी करून लाभप्रद क्षेत्रात गुंतवणूक करीत असते.

**(२) विविध क्षेत्रात गुंतवणूक -** परस्पर निधीद्वारे लहान गुंतवणूकदार, मोठ्या गुंतवणूकीच्या क्षेत्रात गुंतवणूक करीत असतो. त्यात, अशं, ऋणपत्र,हमीपत्र इत्यादींचा समावेश असतो. परस्पर निधीद्वार हे कार्य होत असल्यामुळे, गुंतवणूक करणाऱ्याला कोणत्याही लेखाकर्माची गरज राहात नाही. याशिवाय कर व कराचा भरणा या कार्याच्या पूर्ततेची देखील गरज भासत नाही.

**(३) डोक्यावरील ताण -** परस्पर निधीद्वारा गुंतवणूक होत असल्यामुळे, गुंतवणूक करणारा पूर्णपणे मोकळा असतो, गुंतवणूकीची चिंता किंवा काळजी करण्याचे कोणतेही कारण नसते.

**(४) गुंतवणूकीकरीता वेळ व निवड -** भांडवल बाजारातील निष्णात द्वारा योग्य त्य.ठिकाणी योग्य त्या वेळी व योग्य त्या क्षेत्रात गुंतवणूक होत असल्यामुळे गुंतवणूक दारासमोर निवड व वेळेचा प्रश्नच शिल्लक राहात नाही.

**(५) मोठ्या प्रमाणावर गुंतवणूकीच्या संधी -** परस्पर निधी द्वारा गुंतवणूक होत असल्यामुळे गुंतवणूकदाराला आपोआपच मोठ्याप्रमाणावर गुंतवणूकीच्या संधी प्राप्त होतात. सर्वच साधने तरल स्वरूपात धारण करीत असल्यामुळे गुंतवणूकदारांना पाहीजे त्या प्रमाणात व पाहीजे तेंव्हा त्याचे रोक रकमेत रूपांतर करण्यात येते.

**(६) गुंतवणूकीची काळजी -** परस्पर निधीद्वारे गुंतवणूक करणाऱ्यांची काळजी करूनच गुंतवणूक केली जाते व त्या संदर्भात आवश्यक त्या सर्व नियमाचे पालन केले जाते.

**परस्पर निधीची सेवा**

वित्तीय परस्पर निधीद्वारा भिन्न भिन्न गुंतवणूक दाराकरीता वेगवेगळ्या प्रकारच्या योजना राबविल्या जातात, या योजनेचा लाभगुंतवणूकदारापर्यनत पोहचविण्यासाठी या निधीद्वारे प्रयत्न केले जातात. यामध्ये काही सेवा विशेष आकर्षित स्वरूपाच्या असतात अशा योजनेचा अभ्यास करून गुंतवणूकदार त्यामध्ये गुंतवणूक करीत

Scanned by CamScanner

असतात.

यामधील काही महत्वपूर्ण सेवांचे विश्लेषण खालीलप्रमाणे केले आहे.

**१) बचत योजना -** गुंतवणूकदाराचे हे नेहमीचे असे साधन होय की ज्याद्वारा आपली बचत अधिक व्हावी यासाठी त्यांचेद्वारे प्रयत्न केले जाते. ऐच्छिक बचत योजनामध्ये परस्पर निधी द्वारा प्रत्येक महिन्याला किंवा त्रैमासिक तो बचत करू शकतो व अशा प्रकारे बचतीची योग्य रक्कम जमा झाल्यावर तो परस्पर निधी द्वारा पाहिजे त्याठिकाणी किंवा सममागात, हमीपत्रात, गुंतवणूक करू शकतो.

**२) स्वयंचालीत पूर्ण गुंतवणूक योजना -** अमेरीकेमध्ये अशा प्रकारची गुंतवणूक करण्यासाठी व्यवस्था उपलब्ध आहे. भारतातही यु.टी.आय द्वारे अशी सुरूवात करण्यात आली आहे. परस्पर निधीच्या माध्यमातून गुंतवणूदारांना जी काही मिळकत प्राप्त होते ती पूर्ण गुंतवणूकीकरीता उपयोगात आणली जाते.

**३) नियमीत उत्पन्न योजना -** गुंतवणूकदारांना त्यांनी परस्परनिधीमध्ये, गुंतविलेल्याच्या स्वरूपात जे नियमीत स्वरूपात मिळकत प्राप्त होते. उदा. लाभ, व्याज, यातून व्यवस्थितरित्या प्रत्येक एक महिन्याला किंवा त्रैमासिक स्वरूपात त्याला या योजनेतून पैसे परत मिळविता येतात व त्यातून त्याला आपली वित्तीय गरज पूर्ण करता येते.

**४) स्थानंतरीत लाभ -** अनेक परस्पर निधी संस्था वेगवेगळ्या प्रकारच्या गुंतवणूकीवर योजना गुंतवणूकदारां समोर ठेवतात व काही संस्था द्वारा एका क्षेत्रातून दूसऱ्या क्षेत्रात गुंतवणूक करण्याचे प्रयत्न करतात किंवा त्या गुंतवणूकीचे स्थानांतरण करतात व त्यापासून लाभ प्राप्त करतात.

**५) निवृत्त वेतन योजना -** अलीकडील काळात परस्पर निधीद्वारा निवृती वेतन योजना, चे कार्य अधिक महत्वाचे होय. याअतंर्गत व्यक्ती व प्रमंडळ यांना सुलभता व्हावी या करीता कर प्रलबिंत निवृत्त योजना स्वत:करीता किंवा त्यांच्या सेवाकरीता राबविली जाते. भारतातील प्रतिमाह नियमीत उत्पन्न योजना ही यु.टी.आय द्वारा व अन्य परस्पर निधीच्या स्वरूपात उपलब्ध होत आहे. ज्यामध्ये अन्य राष्ट्रीयकृत वाणिज्य अधिकोषाचा समावेश आहे.

**६) विमा योजना -** यु.एस.ए. मध्ये परस्पर निधी द्वारा नविन सेवा विम्याच्या स्वरूपात उपलब्ध करून दिल्या जात आहे. परस्पर निधी मधील केल्या गेलेली गुंतवणूक दिर्घकाळासाठी याद्वारे संरक्षीत केली जाते. संरक्षणाचा कालावधी १० ते १५ वर्षापर्यंतचा असतो. ज्यामध्ये एकूण रक्कम ही ३,००० डॉलर ते २०,००० डॉलर पर्यन्त असते व त्यावरील दर दहा दिवसाकरीता ६% इतका असतो.

**७) धनादेश लिहिण्याची सुलभता -** यु.एस.ए. मध्ये गुंतवणूकदारांना परस्पर निधीतून पैसे काढण्यासाठी गुंतवणूकदाराना धनादेश लिहीण्याची सुलभता निर्माण करून दिली आहे. या धनादेशाचे पैसे अधिकोषामार्फत गुंतवणूक दारांना परत दिले जाते. परंतु भारतात मात्र अशा प्रकारची सुविधा परस्पर निधी संस्थानी सुरू केलेली दिसत नाही.

**सारांश**

अलीकडील काळात खाजगी क्षेत्रातून अनेक संस्था परस्पर निधीचे कार्य करण्यासाठी समोर येत आहे. या संस्थाद्वारे स्पर्धेत वाढ होत आहे व ही स्पर्धा, मुख्यत्वे करून यु.टी.आय व त्यांच्या सात वेगवेगळ्या विभाग



Scanned by CamScanner

जीईसी., एल.आय.सी, जी.आय.सी, एस. बी. आय बँक, कॅन बँक, इंडियन बँक, बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक इत्यादी होय.

स्पर्धा वाढल्यामुळे ग्राहकांना परस्पर निधीद्वारा उत्तमप्रकारच्या सेवा प्राप्त होत आहे. नॅशनल हाऊसिंग बँक द्वारा रिअल इस्टेट परस्पर निधी करीता प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. ज्यामुळे घरबांधणी वितीय क्षेत्राचा विकास करणे शक्य होईल तरी परंतु आज या दिशेने पाहिजे त्या प्रमाणात कार्य पूर्ण झाले आहे असे दिसून येत नाही.

References -


1) A Project, Report on Tata Mutual Funds Project Submitted by - Pallavi Mykel MUMBAI-Universety.
2) Banking and Financial System Dr. Nirmal Prasad, J-Charandus.
3) India Financial Sector for the Twenty First Century James A. Hanson, Sanjay Kuthuriya.
4) Financial entermediaries, Economic development and monetary Policy - M. Madiah.


✦✦✦


हार्दिक शुभेच्छा

मे. राजा गोपीचंद किराणा स्टोअर्स

बस स्टॅण्ड जवळ

मेन रोड, चामोर्शी , जि. गडचिरोली.

सर्व प्रकारचा किराणा, मातीचे तेल, ठोक व चिल्लर किफायतशीर भावात मिळण्याचे एकमेव स्थान

प्रोप्रा. प्रफुल्ल गजानन भांडेकर

फोन न. : (दु.) २३५३२३, (नि) २३५०८८

हार्दिक शुभेच्छा

श्री लक्ष्मीनारायण जनरल ॲण्ड बुक डेपो

बसस्टॅण्ड जवळ

मेनरोड चामोर्शी, जि. गडचिरोली.

सौंदर्य प्रसाधने, स्टेशनरी, शालेय पुस्तके माफक दरात मिळण्याचे एकमेव स्थान

प्रोप्रा.

गजानन लहुजी भांडेकर




Scanned by CamScanner

# गडचिरोली जिल्ह्यातील नैसर्गिक संपदा व आर्थिक विकास

प्रा. अशोक गव्हाणकर
रावसाहेब ठवरे क. महा.,
नागपूर.

२६ ऑगस्ट१९८२ रोजी चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन होऊन गडचिरोली हा स्वतंत्र जिल्हा अस्तित्वात आला. हा जिल्हा वैनगंगा नदीच्या पूर्वे कडील दक्षिणोत्तर २५० कि.मी. लांब पसरलेला असून त्याचे क्षेत्रफळ १५ हजार ४३४ चौरस किलोमिटर असून त्यात क्षेत्रफळापैकी १० हजार ७७ चौरस कि.मी. क्षेत्र पूर्णपणे जंगलाने व्यापलेले आहे. जिल्ह्यातील ७० टक्के जमीन वरदान ठरली असली तरी महत्वाच्या विकास योजना राबविण्याच्या मार्गात हीच बाब अडसर ठरली आहे. करोडो रूपये खर्च करून वन संवर्धन कायद्यामुळे अडलेले महत्वाचे सिंचन प्रकल्प हे त्याचे ज्वलंत उदाहरण आहे. आज हा जिल्हा रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे. या प्रदिर्घ कालावधीत राज्याच्या पूर्व टोकाकडील जिल्ह्याने कितपत विकास साधला याचा शोध घेण्याचा प्रयत्न केल्यास यात निराशा पदरी पडते. यांला जिल्ह्याची भौगोलिक स्थिती, नक्षलवाद्याच्या कारवाया, केंद्र सरकारचा वनसंवर्धन कायदा, अंतर्गत भागातील निरक्षरता, अंधश्रद्धा, दारिद्रय, परंपरा इ. गोष्टी सुद्धा कारणीभुत आहे हे देखील मान्य करावे लागते. देशातील २५ अतिमागास जिल्ह्यामध्ये गडचिरोली जिल्ह्याचा समावेश असून या जिल्ह्याला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी गेल्या काही वर्षापासून समविकास योजनेची अंमलबजावणी केंद्रसरकारने सुरू केली आहे. महाराष्ट्र शासनाने या जिल्ह्याच्या जलद विकासासाठी १९८९ मध्ये १३४ कोटी खर्चाचा विशेष कृती कार्यक्रम लागू केला. त्याचे प्रतिक म्हणून जिल्ह्यात डांबरी रस्ते, पुल व इमारती उभारणी, आश्रमशाळा इ. निर्माण झाले आहेत. शैक्षणिक क्रांती घडविण्याचे ध्येय समोर ठेवून जिल्ह्याचा गुणात्मक विकास घडविण्याच्या दृष्टीने सरकार, लोक प्रतिनिधी व जनता पूर्णपणे अपयशी ठरली आहे हे खेदाने म्हणावेसे वाटते. विपुल नैसर्गिक संपदा लाभली असतांना देखील अंतर्गत भागातील स्थिती व आदिवासीची अवस्था बघितली तर दारूण व विदारक चित्र डोळ्यासमोर उभे होते. विकासासाठी आवश्यक असलेल्या इच्छाशक्तीचा अभाव हे त्यामागील प्रमुख कारण आहे. विकास ही एक प्रक्रिया आहे. जी सातत्याने सुरू असते. कितपत विकास झाला याचे मोजमाप करणे कठीण असते. परंतु अन्य जिल्ह्याशी विकासाबाबत तुलना केल्यास हा जिल्हा विकासाच्या बाबत निश्चितच मागे राहिला हे सूर्य प्रकाशा इतके सत्य आहे. विपुल वन संपत्ती बारमाही वाहणाऱ्या नद्या, भात पिकासाठी सुपिक जमिन, विविध खनिज संपत्ती एवढी समृद्धी असलेला श्रीमंत जिल्हा मात्र दारिद्र्यात नांदत आहे. या जिल्ह्याच्या नावासमोर असलेली अतिमागास, अविकसित उद्योगविरहीत ही विशेषणे आज रौप्य महोत्सवी वर्षात देखील कायम आहे ही एक शोकांतीकाच आहे.

गडचिरोली जिल्ह्यात एकूण १२ तालुके आहेत. जिल्ह्यात एकूण १६७५ गांवे असून त्यापैकी ११३ गांवे आदिवासी क्षेत्रात समाविष्ट केली आहे. आदिवासी गांवाचे एकूण क्षेत्रफळ १३ हजार २५ चौ.कि.मी. एवढे आहे आणि आदिवासी लोकसंख्या १९९१ च्या जनगणनेनुसार ३ लाख ५ हजार असून तिचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण ३८.७० टक्के एवढे भरते. या जिल्ह्यातील शेतीलायक क्षेत्र २ लाख ६९ हजार ७०० हेक्टर असून एकूण जमीन क्षेत्रफळाच्या १७.४७ टक्के एवढे आहे. त्यापैकी तांदुळ (भात पिक) पिकाचे क्षेत्रफळ १ लाख ४३ हजार



Scanned by CamScanner

हेक्टर असून गडचिरोली जिल्ह्यातील ६३ टक्के भाग वैनगंगा व प्राणहिता खोऱ्यात ३५ टक्के भाग इंद्रावती खोऱ्यात तर २ टक्के भाग गोदावरी खोऱ्यात येतो. या जिल्ह्यातिल प्रमुख नद्या गोदावरी, वैनगंगा, प्राणहिता, इंद्रावती असून त्यांच्या उपनद्या सती, गाढवी, खोब्रागडी, कराणी व दिना या नद्या आहेत. जिल्ह्यात बारमाही नद्या असल्याने सिंचनाकरिता मुबलक पाण्याचा साठा या भागात उपलब्ध आहे.

जून२००२ अखेर पाटबंधारे प्रकल्प मंडळाअंतर्गत प्रकल्पाद्वारे १७ हजार ६६७ हेक्टर तर लाभक्षेत्र विकास प्राधिकरण मंडळांतर्गत गोंदिया जिल्ह्यातील इटियाडोह या प्रकल्पाद्वारे आरमोरी तालुक्यातील १७ हजार ७८० हेक्टर, चामोर्शी तालुक्यातील दिना प्रकल्पाद्वारे ११ हजार ३५६ हेक्टर सिंचन-क्षमतेची निर्मिती झालेली आहे. याशिवाय राज्य आणि जिल्हा परिषदांचे मालगुजारी तलाव तसेच कोल्हापूरी बंधारे यांच्याद्वारे जिल्ह्यात एकूण ५८ हजार २६६ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे. परंतू जिल्ह्याच्या उर्वरित भागातील अंदाजे १लाख हेक्टर शेतजमीन ही पूर्णतः निसर्गावर अवलंबून असल्याने शेतकऱ्यांना वेळोवेळी दुष्काळाची झळ सोसावी लागते. चामोर्शी तालुक्यात दिना नदीवर बांधलेला एकमेव दिना प्रकल्प सोडल्यास शेतीला पाणीपुरवठा करणारे कोणतेही मोठे वा मध्यम प्रकल्प जिल्ह्यात नाहीत. दिना प्रकल्पामुळे चामोर्शी तालुक्यातील ११ हजार३५६ हेक्टर शेतजमीन सिंचनाखाली आली आहे. या धरणाची उंची०.७५ मीटर वाढविण्याची घोषणा १० वर्षापूर्वीच करण्यात आली. अखेर फेब्रुवारी २००१ मध्ये या प्रस्तावाला मंजुरी मिळाली. परंतू अनुदान न मिळाल्याने त्याचेही काम रखडले आहे. उंची वाढविल्यास या धरणाची १३०० हेक्टर सिंचन क्षमता वाढू शकते.

गडचिरोली जिल्ह्यातील भात पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना आणि आदिवासी समाजाच्या जीवनात हरितक्रांती घडवू शकणाऱ्या व सध्या विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडे असलेल्या आरमोरी तालुक्यातील तुलतुली, धानोरा तालुक्यातील कारवाफा, चामोर्शी तालुक्यातील चेन्ना या मध्यम व मोठ्या सिंचन प्रकल्पांना तसेच चंद्रपूर पाटबंधारे प्रकल्प मंडळातर्गत असलेल्या गडचिरोली तालुक्याती पोहारनाला, गडचिरोली तालुक्यातील पिपरी रिठ इत्यादी लघुसिंचन प्रकल्पांना जिल्हा निर्मितीच्या पूर्वीच प्रशासकीय मंजुरी मिळाली. जिल्हा निर्मितीनंतरही धानोरा तालुक्यातील डुरकान, गुड्डा, एटापल्ली तालुक्यातील डुम्मीनाला, कुरखेडा तालुक्यातील सती, कोरची तालुक्यातील खोबरागडी, चामोर्शी तालुक्यातील हलदीपुराणी, आरमोरी तालुक्यातील कोसरी, कुरखेडा तालुक्यातील येंगलखेडा इत्यादी लघु प्रकल्पांना प्रशासकीय मंजुरी मिळाली. वरील काही प्रकल्पांच्या कामाला सुरूवातही झाली तर काही प्रकल्प निधीअभावी रखडले असतानाच केंद्र सरकारचा वनसंवर्धन कायदा या जिल्ह्यासाठी आडवा आला आणि या जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पाहिलेल्या हरितक्रांतीच्या स्वप्नाचा संपूर्ण भंग झाला. सध्या १९८० च्या वनसंवर्धन कायद्यामुळे गडचिरोली जिल्ह्यातील जवळजवळ सर्वच प्रकल्प रखडले गेले असून त्यावर खर्च झालेले करोडो रूपये पाण्यात गेले आहेत. सद्यस्थितीत तुलतुली हा मोठा प्रकल्प तसेच कारवाफा मध्यम या प्रकल्पामुळे जास्त वन जमीन बुडीत होईल या कारणास्तव केंद्र सरकारच्या वन व पर्यावरण मंत्रालयाने नामंजूर केले आहे. वन विभागाच्या अडवणूकीच्या धोरणामुळे जमिन हस्तांतरणाचे प्रस्ताव वन विभाग ते पाटबंधारे विभाग यांच्यातच फिरत आहेत तर काही प्रकल्पांची प्रशासकीय मान्यता अवधीमुळे व्यपगत झालेली आहे. तर नामंजूर करण्यात आलेल्या प्रकल्पाचे सुधारीत प्रस्ताव शासनाच्या दरबारी धूळ खात पडलेले आहेत. विदर्भाबाबत राज्य सरकारचे उदासीन धोरण कारणीभूत आहे. राज्यामध्ये जंगल एकूण जमीनपैकी ३३ टक्के आवश्यक असल्याने शासनाने पश्चिम भागातील विकासाकरिता गडचिरोली जिल्ह्याचा बळी दिल्याचे हे स्पष्ट दिसत आहे. त्यामुळे या जिल्ह्याचा नैसर्गिक संपदा असून देखील विकास केव्हा घडून येईल हे आज तरी निश्चित सांगता येत नाही.



Scanned by CamScanner

गडचिरोली जिल्ह्याच अस्तित्वात येऊन फार काळ लोटलेला नाही. शतकापासूनचा वारसा असलेले विदर्भातील अनेक जिल्हे अजूनही मागास अवस्थेत आढळून येतात. एकूणच विदर्भातील सर्वच जिल्ह्याचा विविध दृष्टिकोनातून विचार केल्यास स्वातंत्र्यानंतर ज्या सोयी व सुविधा या जिल्ह्यांना देण्यात आल्या त्या व या जिल्ह्यात उपलब्ध असलेल्या नैसर्गिक संपतीचा विचार करता नैसर्गिक संपदा अधिक परंतू त्याचा वापर कमी यामुळे विदर्भातील सर्वच जिल्हे अन्य जिल्ह्यापेक्षा कमी विकसीत राहिलेले आढळतात.

गडचिरोली जिल्ह्यात कृषी आधारीत किंवा वनसंपदाआधारीत एकही उद्योग नाही. केवळ राइस मिल्सचा विकास करून जिल्ह्यातील आर्थिक विकास व रोजगाराची प्रश्न सोडविता येत नाही. अतिदाट जंगल असलेल्या गडचिरोली जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक कमी आहे. यामध्ये प्रामुख्याने धुळे, यवतमाळ व गडचिरोली जिल्ह्याचा अंर्तभाव दिसून येतो. या तिन्ही जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक हा केवळ ०.२९ इतका आहे. नॉर्वे देश महाराष्ट्रापेक्षाही लहान आहे. जगात आज प्रथम क्रमांकाचा मानव विकास निर्देशांक नॉर्वेचा आहे. तेथील प्रतिव्यक्ती उत्पन्न ४२,००० हजार डॉलर इतके आहे. थोडक्यात मानव विकास निर्देशांक आर्थिक विकास निर्देशांक वर अवलंबून असतो. गडचिरोली जिल्ह्यात वनसंपदा, जलसंपदा, मनुष्यसंपदा विपूल प्रमाणात आहे. मात्र विपूल संपदा असलेल्या जिल्ह्याचा आर्थिक विकास न्यूनतम प्रमाणात झाला आहे असे दिसत नाही. जिल्ह्यात बेरोजगारी, सामाजिक विषमता गरीबी यासारखे प्रश्न आजही कायम आहे. हे प्रश्न सर्वसामान्य व सर्वत्र असले तरी गडचिरोली जिल्ह्यात नैसर्गिक संपत्तीची विपुलता असूनही हे प्रश्न कायमस्वरूपात दिसावे ही चिंतेची बाब होय.

कृषीवर आधारीत प्रक्रिया उद्योग, वनसंपदा वर आधारीत वनप्रक्रीया उद्योग ज्यामध्ये लाकडी संवेष्टन तयार करणारा कारखाना, फर्निचर तयार करणारे लहान व्यवसायातील उद्योग, लाकडाचा निर्यात व्यापार विकसीत करणे गरजेचे आहे हे जेव्हा साध्य होईल तेव्हांच नैसर्गिक संपदाचा विकास होऊन आर्थिक विकासाचे चित्र पलटविणे शक्य होईलव त्यातून रोजगार निर्माण होऊन लोकांच्या उत्पन्नात व उत्पन्न लवचिकतेत बदल घडून आणणे शक्य होईल.

जिल्ह्यातील साक्षरतेचे केवळ प्रमाणवाढून चालणार नाही तर गुणात्मक शिक्षणाचा विकास होणे गरजेचे आहे. सर्वच ठिकाणची शैक्षणिक स्थिती व त्याचा दर्जा खालावलेला आहे. हे दरवर्षी लागणाऱ्या विभागीय मंडळाच्या १० वी १२वीच्या घोषित होणाऱ्या निकालावरून स्पष्ट होते. अनेकदा गडचिरोली जिल्हाचा निकाल सर्वात कमी लागतो. याचाच अर्थ याठिकाणी गुणात्मक मनुष्य बळ निर्माण होत असलेले दिसून येत नाही. शिक्षणाने गुणवत्तेत वाढ होते व पर्यायाने श्रमशक्तीतील उत्पादकता व कार्यक्षमता विकसित होते. या जिल्ह्याबाबत याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे.

एकूण आर्थिक विकासाचा विचार केला असता शेवटी आर्थिक विकास हा त्याठिकाणी उपलब्ध असलेले उत्पादनाचे घटक, त्याची गुणवत्ता, त्याचा स्तर व कार्यक्षमता, नैसर्गिक संपदा, तंत्रज्ञान खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील एकूण गुंतवणूक बाजारपेठेचा विकास, पायाभूत सोयी व सवलती, सामान्यता यावर अवलंबून असते हे सर्व कारक परिणामकारकरीत्या उपभोगात आणण्यास्तव विकासाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून बघितल्यास भविष्यात गडचिरोली जिल्ह्याचा आर्थिक विकास घडून आणणे शक्य होईल.

✦✦✦

Scanned by CamScanner

# गडचिरोली जिल्ह्यातील नैसर्गिक संपदा व आर्थिक विकास

प्रा. विठ्ठल गीरडकर
नव प्रतिभा ज्यू. कॉलेज, नागपूर.

महाराष्ट्र राज्य १ मे १९६० रोजी अस्तित्वात आले. तेव्हा महाराष्ट्रास मध्यप्रांतातून विदर्भ आणि हैद्राबाद प्रांतातून मराठवाडा हे जोडले गेले. आता महाराष्ट्रात कोकण, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा असे चार विभाग येतात. यातील विदर्भात अति पश्चिमेकडे असणार गडचिरोली जिल्हा अनेक दृष्टीने अनुपमेय आहे. २६ ऑगस्ट १९८२ ला चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन होऊन गडचिरोली जिल्हा अस्तित्वात आला.

नैसर्गिक दृष्ट्या अतिसुंदर असलेला हा जिल्हा नैसर्गिक साधनसंपत्तीनेही अतिशय समृद्ध आहे. पाणी, जंगले आणि खनिजे मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. लोखंड, कोळसा, चुनखडी, अभ्रक मॅंगनिज खनिजांचा खजिनाच निसर्गाने या प्रांताला मुक्तहस्ताने बहाल केली आहे. जगातील सर्वोत्कृष्ट सागवान याच जिल्ह्यात उपलब्ध आहे. आर्थिक व औद्योगिक विकासासाठी आवश्यक असणारे सर्व घटक येथे उपलब्ध असले तरी अतिशय दूर्गम प्रांत असल्याने व लोकसंख्येतील आदीवासींचे प्रमाण जास्त असल्याने पाहिजे त्या प्रमाणात या जिल्ह्याचा विकास होऊ शकला नाही.

गडचिरोली जिल्ह्यात एटापल्ली तालुक्यात सुखागड आणि कुरखेडा भागातील मसोली भागात लोखंड फार मोठ्या प्रमाणात सापडते आणि महत्वाचे म्हणजे हे लोखंड उच्च प्रतीचे आहे.आरमोरी भागात मॅंगनिज सापडते. या जिल्ह्यात ७०% भागात निबिड जंगले आहेत. रेऑन झाडाच्या सालीपासून उत्तम प्रतीचे कापड तयार होऊ शकते. तसेच मध, वनौषधी, तेलबिया, डिंक इ वनसंपत्तीवर आधारित अनेक उद्योगधंदे अस्तित्वात येऊ शकतात. ताडोबासारखी घनदाट जंगले असल्याने पर्यटन व्यवसायाचाही विकास होऊ शकतो. अद्याप अनेक पर्यटन स्थळे अज्ञात व अविकसित आहेत. चंद्रपूर व गडचिरोली भागात लहानमोठे अनेक तलाव आहेत. त्यामुळे मासेमारी, मत्स्यपालन प्रकल्प राबविता येतात. या भागात मोठ्या लोहपोलाद कारखाने, कागद सिमेंट उद्योगांपासून, पर्यटन व्यवसाय आणि त्याअनुषंगाने हॉटेल व्यवसाय, नैसर्गिक साधनांवर आधारित लघु उद्योगापर्यंत अनेक प्रकारचे उद्योगांची स्थापना होण्यासाठी पोषक वातावरण नक्कीच उपलब्ध आहे.

ही सर्व अनुकूल व पोषक परिस्थिती असूनही गडचिरोली जिल्हा औद्योगिक व आर्थिक दृष्टिने अद्यापही मागासलेला आहे. यामागील कारणे शोधतांना पुढील बाबी प्रामुख्याने जाणवल्या.

१. अतिशय दूर्गम प्रांत असल्याने वाहतुकीची वेगवान व कार्यक्षम साने उपलब्ध होण्यात अडचणी येतात. राजमार्ग व राष्ट्रीय मार्ग यांच्या साह्याने जर वाहतुकीची योग्य साधने उपलब्ध झाली तर योग्य वेगाने आर्थिक विकास होईल. नागपूर, चंद्रपूर-गडचिरोली मार्ग जागतिक बॅंकेच्या अर्थसहाय्यातून पूर्ण करण्यात आला.तसाच नागपूर हैद्राबाद हा राष्ट्रीय महामार्ग तयार झाल्यास उद्योगाच्या विकासाला चालना मिळू शकते.

२. लोकसंख्येतील आदीवासीचे प्रमाण जास्त असल्याने शिक्षणाचा अभाव ही दुसरी समस्या आहे. शैक्षणिक दृष्ट्या हा जिल्हा अतिशय मागस आहे.त्यामुळे उद्योगधंद्यांन आवश्यक असणारे कुशल श्रमिक उपलब्ध होत नाहीत.बाहेरून श्रमिक आणून उद्योगधंदे स्थापन केल्यास उत्पादन खर्च वाढतो. सद्यपरिस्थितीत यात बदल होण्याची सुचिन्हे दिसत आहेत. अनेक शैक्षणिक संस्था येथे शिक्षणप्रसाराचे कार्य करीत आहेत. नागपूर विद्यापीठानेही आपले अधिकृत कार्यालय येथे सुरू केलेले आहे.

३. झालेले उत्पादन विकण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मोठ्या बाजारपेठांचाही विकास येथे झालेला

Scanned by CamScanner

आढळून येत नाही. त्यामुळे उद्योगांना प्रोत्साहन मिळत नाही. विशेषतः नाशवंत वस्तूंना तावडतोब बाजारपेठा मिळणे आवश्यक असते. वाहतूक, गोदामे व इतर पायाभूत सोयीउपलब्ध झाल्यास बाजारपेठांचा विस्तार होण्यास मदत होईल. तसेच वेगवान व कार्यक्षम वाहतूकीच्या मदतीने दूरवरच्या बाजारपेठाही काबीज करता येतील.

४. या जिल्ह्यात एक अतिशय चांगल्या प्रकारे विकसित होऊ शकणारा व्यवसाय म्हणजे पर्यटन. पर्यटन हा असा उद्योगव्यवसाय आहे की त्याच्या विकासाने इतर अनेक अनुषंगिक व्यवसाय विकसित होऊ शकतात. यामुळे रस्ते, लोहमार्ग, हॉटेल, रिसोर्टस इत्यादींचाही विकास होईल.

५. कोणत्याही भागाच्या औद्योगिक व आर्थिक विकासासाठी आवश्यक असतात ती सरकारची पूरक ध्येयधोरणेगडचिरोली भागाच्या विकासाबाबत शासनाची उदासीन भूमिकाही बऱ्याच अंशी कारणीभूत आहे. महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्याच्या विकासासाठी 'जिल्हा नियोजन व विकास मंडळ (D.P.D.C.) स्थापन करण्यात आलेले आहे. हे मंडळ आपल्या ध्येयधोरणानुसार प्रत्येक जिल्ह्यांसाठी विकास योजना आखतात. य योजना संपूर्णतः सरकारी योजना असतात. त्या त्या प्रदेशाच्या गरजा आणि साधनसंपत्ती याचा विचार करण्यापेक्षा आपल्या राजकीय लाभाचा विचार अधिक असतो.

मुंबई पुणे आणि ठाणे या भागाचा जसा औद्योगिकविकास करण्यासाठी विशेष प्रयत्न झाले, योजना राबविण्यात आल्यात तसेच विशेष प्रयत्न, योजना गडचिरोली जिल्ह्यासाठी करण्याची नितांत गरज आहे. त्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे. विदर्भातील नेते मंडळी आपल्या भागाच्या विकासापेखा आपल्या आपसातल भांडणात मशगुल असतात. पश्चिम महाराष्ट्रातील नेते विकासाच्या प्रश्नावर पक्षभेद विसरून एकत्र येतात.

**उपाययोजना**

गडचिरोली जिल्ह्याच्या विकासात काही प्रमाणात अडथळे, अडचणी असल्या तरी परिस्थिती अगदी निराशाजनक नाही. समाज हळूहळू का होईना पण जागृत होत आहे. कोळसा खाणी, सिमेंट उद्योग, कागद उद्योगांची या जिल्ह्यात स्थापना झालेलीच आहे. समाजसेवी संस्थांनी देखील या भागाच्या सामाजिक व आर्थिक विकासाकडे विशेष लक्ष पुरविल्याचे स्पष्ट होते. नागापल्ली आणि हेमलकसा भागात श्री. बाबाआमटे व डॉ. विकास आमटे यांनी आर्थिक व समाजिक विकासाचे आदर्श प्रारूप उभे केले तर भामरागड परिसरात डॉ. अभय व राणी बंग यांचे अद्वितीय कार्य सुरू आहे.

औद्योगिक विकासासोबतच येथे राहणारे जे प्राथमिक नागरिक आहेत त्या आदिवासींच्या विकासाकडेही लक्ष पुरविण्याची गरज आहे. त्यांची जीवनपद्धती नागरी जीवनपद्धतीपेक्षा अतिशय भिन्न आहे. त्यांच्या जीवनपद्धतीत अनावश्यक ढवळाढवळ करण्यापेक्षा त्यांना त्यांच्या जीवनमानात आर्थिक निर्भरता कशी प्राप्त होईल हे पहाणे आवश्यक आहे. त्यांच्या अज्ञानाचा व अशिक्षितपणाचा फायदा घेऊन काही सावकार मंडळी त्यांना कर्जबाजारी बनवितात. हे आदिवासी उदरनिर्वाहासाठी जंगलावर अवलंबून असतात. त्यासाठी त्यांना वनशेती करण्याची, जंगलातील वनौषधी, मध, फळेफुले, डिंक गोळा करण्याची परवानगी दिली पाहिजे. त्यावर आधारित प्रक्रिया करण्यचे उद्योग करण्याचे प्रशिक्षण त्यांना दिल्यास त्यांच्या उदरनिर्वाहाची सोय होईल.

नविन औद्योगिक धोरणाप्रमाणे मागासलेल्या भागाच्या विकासासाठी 'विशेष आर्थिक क्षेत्र'(SEZ) निर्माण करण्यात येत आहे. महाराष्ट्रात जर गडचिरोली जिल्ह्यामध्ये असे SEZ करण्यात आले तर खाजगी क्षेत्राच्या प्रयत्नांनी गडचिरोली जिल्ह्याचा वेगाने औद्योगिक व आर्थिक विकास होईल. देशी व विदेशी आर्थिक गुंतवणुकीला वाव मिळेल. जागतिकीकरण व उदारीकरणाच्या या नवीन युगात खाजगीकरणामुळे आर्थिक प्रगतील चालना मिळेल आणि गडचिरोली हा नैसर्गिक साधनसंपत्तीने युक्त जिल्हा महाराष्ट्रातील एक प्रगत जिल्हा म्हणून पुढे येईल.



Scanned by CamScanner